नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २८ * * अकोला * सोमवार, दिनांक २८ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

### अनिल अंबानींच्या कंपन्यांवर ईडीची कारवाई

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :

अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपशी संबंधित ३५ हून अधिक ठिकाणी अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) छापे रविवारी पूर्ण झाले. ही कारवाई २४ जुलै रोजी सुरू झाली आणि तीन दिवस चालली. या छाप्यात सुमारे ५० कंपन्या सहभागी आहेत. २५ हून अधिक लोकांची चौकशीही करण्यात आली आहे. रिलायन्स ग्रुपच्या कंपन्या रिलायन्स पॉवर आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने रविवारी एक्सचेंज फाइलिंगद्वारे ही माहिती दिली. दोन्ही कंपन्यांनी स्टॉक एक्सचेंजला सांगितले की, या कारवाईचा त्यांच्या व्यवसायावर, आर्थिक कामगिरीवर किंवा शेअरधारकांवर कोणताही परिणाम होणार नाही.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## ऐक्याचा पोवाडा

आज उद्धवजींच्या वाढदिवसा निमित्ताने राजसाहेब मातोश्रीमध्ये आले. त्या निमित्ताने दुरावा दूर झाला स्नेहबंध जवळ आला. बाळासाहेब ठाकरे यांची ठाकराई किंवा ठाकरी शैलीने दोन सख्ख्या चुलत आणि मावसबंधूंच्या चुकांना दुरुस्त करण्याची संधी घेऊन उज्वल भविष्यकाळाच्या अपेक्षेने मनोमालिन्य दूर केले आहे. या भेटीमुळे मनोमालिन्य मनोमिलनात परिवर्तित होऊन महाराष्ट्राच्या मराठी जनांच्या आणि भारतीय मानसाच्या अंतरंगात प्रवाही होत राहो. हीच या दोघांची कामना असेल. आपण जेव्हा मराठी मराठी म्हणतो, तेव्हा इतर भाषेविषयी आपल्या मनात अनादर आहे असे अजिबात नाही. मात्र या राज्यात राहणाऱ्या परप्रांतीयांनी राज्यात फक्त प्रवासी म्हणून येऊ नये?. तर वर्षानुवर्ष राहिल्यावर खरे निवासी म्हणून रहावे आणि खऱ्या अर्थाने निवासी म्हणून राहायचे असेल. तर या राज्याची भाषा आत्मसात केली पाहिजे अशी अपेक्षा असली तर त्यात गैर आहे काय आहे. याचे उत्तर शोधायला गेले तर ते अजिबात गैर नाही असे सगळेच जण म्हणतात. आमचे अनेक नातलग तामिळनाडू मध्ये राहतात. तीस ते चाळीस वर्षांपूर्वी मराठी भाषेत शिकलेल्या आमच्या दोन बंधूंनी त्यावेळच्या मद्रास शहरात आपली दुकाने थाटली. शाळेत फारसे हुशार नसलेले आमचे दोन्ही बंधू एका वर्षाच्या आत अस्खलित तामिळमध्ये बोलू लागले. याचा अर्थ असा आहे की, ज्या ठिकाणी आपण राहतो तेथील भाषा शिकणे अशक्य अजिबातच नाही, इच्छा किंवा सदिच्छा असली तर सर्व काही शिकता येते. मात्र विनाकारण मुजोरी करायची असेल तर आम्ही स्थानिक भाषा शिकणार नाही आणि बोलणारही नाही अशा बेमुवर्तखोरी मुजोऱ्या करता येतात. अशाच बेशरम आणि बेमुवर्तखोर असणाऱ्या माणसांविरुद्ध महाराष्ट्राचा, मराठी माणसाचा आणि मराठी अस्मिता जपणाऱ्यांचा प्रचंड विरोध आहे. मुंबई किंवा महाराष्ट्रात जितक्या खुल्या मनाचे लोक राहतात. तितक्या खुल्या मनाची माणसे केवळ भारतातच नाही, तर जगात सुद्धा फारच कमी असतात. साधी हिंदी भाषा शिकण्याची गोष्ट घेतली तरी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या शिक्षणक्रमात पाचवीपासून हिंदी भाषा सर्व विद्यार्थी शिकतच होते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरात पाच-सहा वर्षाच्या मुलाला शालेय अभ्यासक्रमात भाषा नसली तरी हिंदी शिकवण्याची गरजच नसते. ग्रामीण भागात तेव्हाही आणि आताही मराठी बोलल्याशिवाय पर्याय नसतो. आपल्या महाराष्ट्रातील जेवढे जेवढे बिगर मराठी भाषिक खेड्यापाड्यात राहतात, त्या सर्वांना मराठी भाषा अस्खलितपणे बोलता येते. भाषेबाबत अत्यंत कडवे आणि जागृत असलेले कन्नडीसुद्धा महाराष्ट्रात गेल्या पंचवीस वषार्पासून मराठीत बोलतात. म्हणजे ते त्या ठिकाणी स्थायिक झालेले असतील, त्यामुळेच मराठीत बोलतात. ते सगळेजण महाराष्ट्राचे सणही साजरे करतात आणि कधीही आपल्या मातृभाषेचा दुराग्रह करीत नाहीत. हे निरीक्षण आम्ही अत्यंत बारकाईने नोंद करून घेतलेले आहे. महाराष्ट्रातील अतिशय पराक्रमी मराठी माणसे जेव्हा जेव्हा इतर राज्यांमध्ये गेली. त्या ठिकाणी मोठा पराक्रम करून त्यांनी त्या राज्यात मराठा राज्य स्थापले. परंतु राज्यकारभाराची भाषा मराठी केली नाही, ही गोष्ट सुद्धा अवश्य सर्वांनीच लक्षात ठेवावी. बडोद्याचे गायकवाड गुजराती भाषा आत्मसात करते झाले. इंदूरचे होळकर इंदोरी-हिंदी म्हणजेच माळव्याची भाषा बोलू लागले. ग्वाल्हेरच्या शिंदे यांनी तर आपले आडनावच बदलून शिंदे ऐवजी सिंदीया करून टाकले. याचाच अर्थ मराठी मानस सर्वसमावेशी आहे. हेच यातून अगदी परिपूर्ण सिद्ध होते. खुद्द बाळासाहेब ठाकरे यांनीही मराठी आणि हिंदुत्वाची मशाल हाती घेतल्यावरती अनेक हिंदी भाषिक आणि अगदी मुसलमानांनाही अनेक मोठमोठी पदे दिली. जे मराठीचे चाहते होते आणि महाराष्ट्राच्या सौख्याची भाषा करीत होते, त्या सर्वांना बाळासाहेबांनी न्याय दिला. आताच्या उद्धव आणि राज यांच्या मनोमिलनानंतर या दोन्ही बंधूनी आणखी शब्दच्छल न करता किंवा वेगळे आळोखपिळोखे न देता किंवा पुनश्च रहस्यमय भाषा न वापरता आम्ही आता एक होत आहोत आणि एकत्रच राहू, अशी घोषणा करावी. त्यातूनच 'बहु असोत तर सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे दोघांनीही जाहीर करावे. हाच ऐक्याचा पोवाडा पुढील कितीतरी दशके दुमदुमत राहील. मग आता विनाकारण वेळ न दवडता आरपारची लढाई लढण्यासाठी ऐक्याच्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या मनातील मराठी बाणा यथार्थ करावा. हीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी

## ६ जणांचा मृत्यू
## २९ जण जखमी

■ वृत्तसंस्था, हरिद्वार, दि. २७ :

हरिद्वारमधील मनसा देवी मंदिरात आज एक मोठी दुर्घटना घडली. सकाळी मंदिराच्या पदपथावर झालेल्या चेंगराचेंगरीत सहा भाविकांचा मृत्यू झाला आणि सुमारे ३६ जण जखमी झाले. सावन आणि रविवार असल्याने आज मनसा देवी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. मंदिराच्या पायऱ्यांवर लोकांची गर्दी होती, तेव्हा अचानक चेंगराचेंगरी झाली. काही लोकांचे म्हणणे आहे की मंदिरात वीज प्रवाहित झाल्याच्या अफवेमुळे घबराट पसरली आणि पायऱ्यांवरून पडून लोकांचा मृत्यू झाला. हरिद्वार पोलिसही मंदिरात वीज प्रवाह पसरल्याच्या वृत्ताला अफवा म्हणत आहेत. मंदिरात गर्दी जमल्यामुळे हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले.



फूटपाथवर प्रसाद दुकान चालवणारे अवधेश म्हणाले की, वृद्ध महिला पडली आणि त्यानंतर गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी सुरू झाली. त्यांनी सांगितले की कोणताही वायर तुटलेला नाही आणि विजेचा धक्काही लागला नाही, ही फक्त एक अफवा होती. आज गर्दी वाढल्यानंतरही प्रशासनाने ये-जा करण्यासाठी फक्त एकच मार्ग ठेवला, त्यामुळे फूटपाथवर पाय ठेवायलाही जागा नव्हती. कावड काळात, भाविक पायऱ्यांवरून मंदिराकडे जात असत आणि मागच्या मार्गाने खाली येत असत, म्हणजेच येण्याचा मार्ग वेगळा होता आणि परत जाण्याचा मार्ग वेगळा होता. एका दुकानदाराने सांगितले की, लोक जीव वाचवण्यासाठी दुकानात घुसले. एका छोट्या दुकानात ५०-६० लोक घुसले ज्यामुळे दुकानदारही बेशुद्ध पडला. चेंगराचेंगरीच्या खुणा पुसण्यासाठी प्रशासनाने तुटलेल्या तारा आणि विखुरलेल्या चप्पल काढून टाकल्या, परंतु प्रसाद दुकानांखाली अजूनही चेंगराचेंगरीच्या खुणा दिसतात.

मनसा देवी मंदिरात पाणी अर्पण करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होती आणि संपूर्ण मार्ग भाविकांनी खचाखच भरलेला होता. त्यानंतर विजेचा धक्का बसल्याची अफवा पसरली आणि चेंगराचेंगरी झाली. मनसा देवी मंदिरात बसवलेल्या विजेच्या खांबात ठिणगी पडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मंदिरात वीज पडल्याची अफवा पसरली. वरच्या मंदिरात उपस्थित असलेले भाविक खाली धावले आणि मधून जाणारे लोक एकमेकांवर पडले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यापैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर काही वेळातच मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी हरिद्वारला पोहोचले आणि त्यांनी रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी सांगितले की या प्रकरणाची चौकशी एका दंडाधिकाऱ्यांकडून केली जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आणि सांगितले की, या दुःखाच्या वेळी राज्य सरकार पीडितांसोबत आहे. जखमींना लवकर बरे व्हावे अशी शुभेच्छा देत धामी म्हणाले की, त्यांनी अधिकाऱ्यांना जखमींना योग्य उपचार देण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना घटनेची माहिती दिली जात आहे. त्यांनी सांगितले की, जखमींना आणि मृतांच्या नातेवाईकांना हरिद्वारहून त्यांच्या गावी पाठवण्याची व्यवस्था उत्तराखंड सरकारकडून केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## राज ठाकरे ६ वर्षांनी मातोश्रीवर
### उद्धव ठाकरेंना दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे रविवारी ६ वर्षांनी उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी मातोश्रीवर पोहोचले. यावेळी राज यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मिठी मारली आणि नंतर त्यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



याआधी राज ठाकरे यांनी शेवटचे ६ वर्षांपूर्वी २०१९ मध्ये मातोश्रीला भेट दिली होती. त्यांनी त्यांचा मुलगा अमित ठाकरे यांच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी उद्धव कुटुंबाला आमंत्रित केले होते. राज यांनी २०१२ मध्ये औपचारिकपणे मातोश्रीला भेट दिली होती. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे आजारी होते.

५ जुलै रोजी २० वर्षांनंतर मुंबईतील वरळी डोम येथे झालेल्या सभेत उद्धव आणि राज एकत्र दिसले. यावेळी दोघांनीही भविष्यात एकत्र राजकारण करण्याचे संकेत दिले. उद्धव यांना शिवसेनेचे प्रमुख बनवल्यानंतर राज यांनी मनसे हा वेगळा पक्ष स्थापन केला होता. त्यावेळी दोघांमधील संबंध चांगले नव्हते.

## महाराष्ट्राच्या मनात काय आहे
### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसेल : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे विधानसभा निवडणुकीत दिसले, पुढे होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही ते दिसेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधतांना म्हणाले.



शिवसेना (ठाकरे गट) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मातोश्रीला जाऊन उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे दिसेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. याकडे फडणवीस यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले दोन्ही भाऊ वाढदिवसाला भेटले याचा आनंदच आहे. पण, त्याचे राजकारण होऊ नये, महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे विधानसभा निवडणुकीत दिसले. आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही दिसेल.

मात्र, काही राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे सांगता येणार नाही तसेच त्यांच्या मनात जे आहे तेच महाराष्ट्राच्या मनात आहे असे म्हणणेही योग्य नाही. मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांशी संवाद ठेवावा, सामंजस्य दाखवावे, काही अडचणी असेल तर मला सांगाव्या, पण पत्र लिहून नाराजी व्यक्त करणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी महायुती सरकारमधील शिवसेना आणि भाजप मधील मंत्र्यांमधील वादावर व्यक्त केली. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात खात्याच्या बैठकांवरुन जुंपली आहे.

## तीन वर्षाच्या मुलाचा वाहून गेल्याने मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २७ :

सकाळी सहा वाजताच्या सुमारास चिमुकला घराजवळील नाल्याच्या काठावर शौचास बसलेला असताना त्याचा तोल जाऊन तो थेट नाल्यात पडून वाहत जात असताना मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (ता.२७ जुलै) घडली असुन, सुशांत ईश्वर उपरीकर (वय ३ वर्षे) रा. कुडेगाव असे घटनेत मृत्यू झालेल्या चिमुकल्याचे नाव आहे.



प्राप्त माहितीनुसार, कुडेगाव येथील ईश्वर उपरीकर यांचे मांदेड कुडेगाव रस्त्यावर नाल्या शेजारी घर असून सकाळी ईश्वर उपरीकर यांच्या पत्नीने त्यांचा मुलगा सुशांतला सकाळीच नाल्याच्या काठावर शौचास बसवून पाणी आणण्यासाठी गेली. दरम्यान सुशांत तोल जाऊन तो पाण्यात पडला. नाला तुडुंब भरून असल्याने तो जवळपास २०० मीटर वाहत गेला.

यादरम्यान, आईने येऊन बघितले असता त्या ठिकाणी बाळ न दिसल्याने तिने आरडाओरड केली. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी धाव घेतली आणि शोधमोहीम सुरू केली.

दरम्यान, गावातीलच तरुणांनी त्या नाल्यात शोध मोहिमेला सुरुवात केली. अखेर तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बाळाचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच लाखांदूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी लाखांदूर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

यावेळी लाखांदूरचे तहसीलदार वैभव पवार तसेच लाखांदूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सचिन पवार, पोलिस हवालदार लोकेश वासनिक, सतीश सिंगनजुडे महसूल विभागाचे मंडळ अधिकारी कौरवार, तलाठी खामणकर, तलाठी वाघमारे घटनास्थळी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनात पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पडत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण कुडेगाव गावात शोककळा पसरली असून, परिसरातील नागरिकांनी कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला आहे.

## बिहारमधील मतदार यादीतून ६५ लाख नावे वगळली

■ वृत्तसंस्था, पटना, दि. २७ :

निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीच्या पहिल्या टप्प्याचा डेटा जारी केला आहे. त्यानुसार, बिहारमध्ये आता ७.२४ कोटी मतदार आहेत. पूर्वी हा आकडा ७.८९ कोटी होता. मतदार यादी पुनरावृत्तीनंतर, ६५ लाख नावे यादीतून वगळण्यात आली आहेत.

काढून टाकलेल्या नावांमध्ये अशा लोकांचा समावेश होता जे आता हयात नाहीत, किंवा कायमचे इतरत्र राहत आहेत, किंवा ज्यांची नावे दोन मतदार यादीत नोंदलेली आहेत. यापैकी २२ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. ३६ लाख मतदार स्थलांतरित झाल्याचे आढळून आले आहे, तर ७ लाख लोक आता दुसऱ्या भागात कायमचे रहिवासी झाले आहेत. ही मोहीम २४ जून रोजी सुरू करण्यात आली.

## रेव्ह पार्टीत एकनाथ खडसेंच्या जावयाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २७ :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते आमदार एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. रेव्ह पार्टीतून ही अटक करण्यता आली आहे. प्रांजल हे शरद पवार गटाच्या महिला प्रदेश अध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती आहेत. प्रांजल खेवलकर यांना पुणे शहरातील खराडी परिसरातील एका सोसायटीमध्ये रेव्ह पार्टी केल्या प्रकरणी गुन्हे शाखेकडून करण्यात आलेल्या कारवाई दरम्यान अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडी परिसरातील एका सोसायटीमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास प्रांजल खेवलकर हे त्यांच्या मित्रा सोबत पार्टी करीत होते. याबाबत माहिती मिळाली असता, आमच्या टीमने छापा टाकला. त्यावेळी त्या कारवाईमध्ये दारु, गांजा आणि हुक्का हा साठा आढळून आला आहे. तर या कारवाईमध्ये प्रांजल खेवलकर यांच्यासह पाच पुरुष आणि दोन महिलांना ताब्यात घेतले आहे. रेव्ह पार्टी प्रकरणात जावयावर कारवाई झाल्याने आता एकनाथ खडसेंवर टीका केली जाते आहे.

एकनाथ खडसेंचा जावई प्रांजल खेवलकरला फ्लॅटमधे पार्टी करताना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. पुण्यातील खराडी भागातील एका सोसायटीतील फ्लॅटमधे पार्टी सुरु होती. या पार्टीत दारु, हुक्का आणि काही प्रमाणात अंमली पदार्थांचे सेवन होत असल्याचा पोलिसांचा दावा आहे.

# आयुष्याची सजावट करणाऱ्या उपकृतांप्रती ऋणानुबंधाचा भाव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

अनेक यशपयशातून ध्येयाकडे आगेकुच करीत असताना, मार्ग आपले असतात, पाऊले आपली असतात पण या मार्गातून चालत असताना आप्तजनांच्या उदार भावनेतून मिळणाऱ्या मदतीच्या हातांनी आपण उपक्रम होत असतो. यामुळे मानवाचे जीवन सजत असते आणि या सजावटीप्रती केवळ ऋणानुबंध हाच अनुभाव असू शकतो असा भाव डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांनी त्यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभाला उत्तर देताना व्यक्त केला.

सामाजिक शैक्षणिक आरोग्य अशा सर्व क्षेत्रात अग्रणी व मानाचे स्थान असणारे व वक्ता म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची मान उंचावणारे वक्ता दशहस्त्रेषु डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याविषयी अभिमान व्यक्त करण्यासाठी त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम वनामतीमध्ये आयोजित करण्यात आला होता. हा सत्कार नागपूर शहराचे अग्रणी व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम व डॉ. अशोक अढाउ डॉ.फिरदोस मिर्झा यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गिरीश गांधी यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले.



### वक्तादशसहस्त्रेशु डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे सत्काराला उत्तर

यावेळी डॉ. मिश्रा पुढे म्हणाले की, स्वकीय यांच्या प्रेरणेतून माणूस हा सजतो, सवरतो व पुरस्कृत होत असतो. या प्रेरणेतून येणारी प्रामाणिकता, उदार मार्गदर्शन, निर्देशांक यातून जीवनाचे दिग्दर्शन होत असते. यावेळी त्यांनी सांगितले की देशाच्या वैद्यकीय व्यवस्थेला स्थायीभाव देण्याचे कार्य नितीन गडकरी यांनी केले आहे. यावेळी त्यांनी जीवनाची मार्गदर्शक त्यांची आई व गुरु उषा मिश्रा यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दत्ता मेघे, गिरीश गांधी, अटलबहादुर यांच्यासारख्यांचे मार्गदर्शन लाभले नसते तर जीवन सर्वसाधारण बनवून राहिले असते असाही भाव त्यांनी व्यक्त केला.

लहानपणापासूनच रामायण, महाभारत, वेद, उपनिषद, साहित्य याचे बाळकडू त्यांना मिळाले आणि यातूनच त्यांच्या बुद्धीला अलौकिकता प्राप्त झाली. त्यांच्या वक्तृत्वात तत्व,तंत्रज्ञान व तत्वज्ञान याची उत्तम सांगड दिसून येते. प्रसंगावधान, अनुरूप मांडणी व अमोघ वाणी त्यांच्या वकृत्वाची खासियत आहे. देशातील हॉस्पिटलचे रूपांतरण मेडिकल कॉलेज व पॅरामेडिकल कोर्सेस मध्ये करण्याकरिता ॲक्ट प्रस्तावित करण्यात आला त्याची पार्श्वभूमी डॉक्टर वेद प्रकाश मिश्रा यांनी लिहिलेले आहे.

यावेळी नितीन गडकरी म्हणाले की नागपूरची प्रतिष्ठा, नागपूरचा नावलौकिक सातासमुद्र पार नेणाऱ्या थोड्या थोडक्यांमध्ये मिश्रा यांचे नाव येते. श्रद्धांजली पासून तर सत्कारापर्यंतचे सर्व कार्यक्रम ते यथाचित पार पाडू शकतात. यावेळी पद्मश्री डॉक्टर चंद्रशेखर मेश्राम म्हणाले की, विद्यालय व शालेय जीवनात अनेक पुरस्कार प्राप्त व आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती प्राप्त डॉ. वेदप्रकाश मिश्रा सारखे मित्र लाभणे ही मानाची गोष्ट आहे.

यावेळी त्यांनी प्लास्टिकच्या प्रदूषणावर भाष्य करत म्हटले की आज प्लास्टिकचे प्रदूषण ही मोठी गंभीर समस्या आहे. या प्रदूषणामुळे अनेक अल्झायमर सारखे व पॅरालिसीस सारखे आजार मानवाला होत आहे यावर जनजागृती होणे आवश्यक आहे. डॉ.गिरीश गांधी यांनी आपल्या भाषणामध्ये म्हटले की जगात केवळ ज्ञानी असून उपयोगाचे नाही तर या ज्ञानाचा जगाला उपयोग झाला पाहिजे.

विद्वत्ता, वकृत्व, कर्तुत्व एका ठिकाणी सापडणे फार कठीण आहे. पण ही अलौकिक गोष्ट यांच्यामध्ये दिसून येते. त्यांनी युनो व युनेस्कोचे प्रतिनिधित्व केले आहे. याशिवाय डब्ल्यू. एच.ओ. आयोजित वर्ल्ड हेल्थ असेम्ब्ली मध्ये संबोधित करण्याचा मानही त्यांना मिळाला आहे. आरोग्य क्षेत्रातील बी.सी.रॉय हा मानाचा पुरस्कार मिळवून त्यांनी देशाची प्रतिष्ठा उज्वलित केलेली आहे. यावेळी डॉक्टर अशोक आढाऊ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यांप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गिरीश गांधी, संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. सभागृहात सांस्कृतिक, साहित्यिक, वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## जावयाला पुण्यात रेव्ह पार्टीतून अटक

### त्यांना अडकवण्याचा प्रयत्न होतोय : एकनाथ खडसे



**जळगाव** : पुणे शहरातील खराडी परिसरात सुरु असलेल्या रेव्ह पार्टीवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर रंगेहाथ पकडले गेले आहेत. गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर खडसे यांच्या जावयाची अटक झाल्याने चर्चेला आणखी उधाण आले आहे. हे होणारच होते, मला आधीच माहीत होते. अनेक दिवसांपासून विरोधात बोलणाऱ्यांना अडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे हा देखील त्याचाच एक भाग असू शकतो, असा संशय एकनाथ खडसे यांनी व्यक्त केला आहे. खराडीमधील उच्चभ्रू वसाहतीतील एका महागड्या फ्लॅटमध्ये ही रेव्ह पार्टी सुरू होती. ऑनलाईन बुकिंगद्वारे घेण्यात आलेल्या या ठिकाणी दारू, हुक्का आणि अमली पदार्थ आढळल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी या पार्टीत सहभागी असलेल्या पाच जणांना अटक केली असून, त्यात तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. यात प्रांजल खेवलकर यांचे नाव असल्याने प्रकरण अधिक गाजू लागले आहे. या घटनेनंतर एकनाथ खडसे यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना आपल्या पहिल्या प्रतिक्रिया दिल्या. यासंदर्भातील माहिती मला तुमच्याकडूनच मिळते आहे आणि हे होणारच होते, हे मला आधीच माहीत होते, असे सांगत खडसे यांनी या कारवाईमागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, अनेक दिवसांपासून विरोधात बोलणाऱ्यांना अडवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी : संजय राऊत



**मुंबई** : पुण्यातील खराडी भागात सुरू असलेल्या हाय-प्रोफाईल रेव्ह पार्टीवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्यासह सहा जणांना ताब्यात घेतल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ माजली आहे. या घडामोडीवर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट भाजपवर घणाघात केला आहे. संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे. अशा पद्धतीने पार्टी केल्याशिवाय हनीट्रॅप करता येत नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे. जेव्हा तुमच्यावर उलटेल तेव्हा महाग पडेल, असा इशाराही संजय राऊत यांनी दिला आहे. संजय राऊत यांनी नुकताच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी संजय राऊत यांना पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी थेट भाष्य केले. तुमचा संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे, असा आरोप संजय राऊतांनी केला.

## खडसे बोलले म्हणून जावयावर कारवाई?

### विरोधकांचा आवाज दाबला जातो– सुषमा अंधारे



**मुंबई** : रेव्ह पार्टीचा बनाव करत एकनाथ खडसे यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा आम्ही निषेध व्यक्त करतो. जो सरकारविरोधात बोलतो त्यांच्या मागे चौकशी लावली जाते. देवेंद्र फडणवीस साहेब स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर किती करावा यासाठी काही मर्यादा आहेत की नाही असा सवाल ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकरवर आज झालेली कारवाई म्हणजे स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर करत बोलणाऱ्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न आहे. खडसे आणि खडसेंसारखा बोलणाऱ्या अनेक लोकांच्या साठी हा एक संदेश आहे, चुप बैठो नही तो रेड करुंगा असे म्हणत ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या की, स्वायत्त यंत्रणांचा किती आणि कसा गैरवापर करावा हे भाजपकडून शिकले पाहिजे. मागच्या काही वर्षांपासून हे सर्व देशाला सर्वश्रूत आहे. संजय राऊत सरकारविरोधात बोलत होते म्हणून त्यांच्या मुलीच्या लग्नातील मेहंदीच्या खर्चापर्यंत ईडी यंत्रणा पोहोचली आणि त्यांच्यावर कारवाई झाली. त्यानंतर नवाब मलिकांनी बोलायला सुरवात केली आणि त्यांच्यासह जावयावर कारवाई करण्यात आली.

## एकनाथ खडसेंना ट्रॅपची माहिती होती तर जावयांना अलर्ट करायचे ना : गिरीश महाजन



**मुंबई** : मला पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल काही माहिती नव्हते. पण अनेक फोन आल्याने मी बातम्या पाहिल्यावर मला लक्षात आले की आमचे नेते नाथाभाऊ यांचे जावई हे एका रेव्ह पार्टीमध्ये पकडले गेले आहेत. त्यांनीच ह्या पार्टीचे आयोजन केल्याची माहिती देखील मला मिळाली, असे म्हणत मंत्री गिरीश महाजन यांनी रेव्ह पार्टी प्रतिक्रिया दिली आहे. गिरीश महाजन पुढे बोलताना म्हणाले की, या रेव्ह पार्टीमध्ये दारु, हुक्का आणि ड्रग्ज मोठ्या प्रमाणात मिळून आले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी एकनाथ खडसे यांच्या जावयांना ताब्यात घेतल्याचे मी बातम्यामध्ये पाहिले आहे. या प्रकरणी मी काही माहिती अजून घेतलेली नाही.

# लाडकी बहीण योजनेतून २६ लाख बहिणी अपात्र

## जूनपासूनचे पैसे येणे बंद होणार : अदिती तटकरे यांची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २७ :**

लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल १४ हजार २९८ पुरुषांनी घेतल्याचे उघड झाले असून, यामुळे योजनेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणावर आता विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेत भ्रष्टाचाराचे आरोप सरकारवर केले आहेत. सरकारनेही या प्रकाराची गंभीर दखल घेत योजनेत अपात्र ठरलेल्या या सर्व पुरुषांना योजनेतून वगळले आहे. केवळ इतकेच नाही, तर २६.३४ लाख महिलाही या योजनेतून अपात्र ठरण्याची शक्यता असल्याची माहिती राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. या महिलांचे अर्ज तपासणीअंती अयोग्य आढळले असून, त्यांची शहानिशा सुरू आहे.






राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अल्पावधीतच लोकप्रिय झाली. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यात दरमहा थेट १५०० जमा होतात. या योजनेला राज्यभरातील महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. मात्र, याच योजनेच्या लाभात गैरवापराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबद्दल माहिती दिली आहे. त्या म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिला व बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली होती. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली आहे.

यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. या माहितीच्या आधारे जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त पात्र असलेल्या सुमारे २.२५ कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्यात आला आहे.

तात्पुरत्या स्वरूपात लाभ स्थगित केलेल्या २६.३४ लाख लाभार्थ्यांच्या माहितीची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून शहानिशा करून त्यापैकी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांचा लाभ शासनातर्फे पुन्हा सुरू करण्यात येईल.

## तरुणीला धमकावून मोटारीत सामूहिक बलात्कार

■ **महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २७ :**

लोणावळा परिसरात पादचारी तरुणीला धमकावून तिच्यावर मोटारीत सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. याप्रकरणी पोलिसांनी तीन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके तयार केली आहेत.

याबाबत पीडित तरुणीने लोणावळा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणावळ्यातील तुंगार्ली गाव परिसरातून तरुणी शुक्रवारी सायंकाळी निघाली होती. पीडित तरुणीला मोटारीतून आलेल्या तिघांनी धमकावले. तिला धमकावून मोटारीत बसण्यास सांगितले. तिचा मोबाइल संच हिसकावून घेतला. त्यानंतर तरुणीचे हात-पाय बांधले. तरुणीला मोटारीतून वेगवेगळ्या भागांत नेण्यात आले. मोटारीत तिच्यावर तिघांनी बलात्कार केला, असे पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तरुणीला नांगरगाव परिसरात सोडून मोटारीतून आरोपी पसार झाले. तेथे घाबरलेल्या अवस्थेत तरुणी थांबली होती. स्थानिक रहिवाशांनी तरुणीला जवळच्या एका मंदिरात सुरक्षित नेले. त्यानंतर रहिवाशांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पीडित तरुणीची वैद्यकीय तपासणी करून जबाब नोंदवला.

## म्हाडाच्या उपनिबंधकाच्या पत्नीची गळफास घेत आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**

म्हाडाच्या उपनिबंधकाच्या पत्नीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मुंबई येथील कांदिवली आकुर्ली परिसरात ही घटना घडली आहे. म्हाडाचे उपनिबंधक बापू कटरे यांच्या पत्नीने पतीच्या जाचाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे समजते. 44 वर्षीय रेणु कटरे यांनी राहत्या घरी गळफास लाऊन आपले जीवन संपवले. शनिवारी रात्री उशिरा ही घटना घडली असून पैशांच्या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाल्यानंतर हा प्रकार घडला असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रेणु कटरे या शिक्षिका होत्या आणि पती बापू कटरे यांच्यासोबत त्या आकुर्ली येथे राहत होत्या. दोघांमध्ये आर्थिक कारणावरून नेहमीच वाद व्हायचे. शनिवारी रात्री देखील दोघांमध्ये वाद झाल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. त्यानंतर काही वेळाने रेणु यांनी राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेने कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. परंतु, रेणु यांचे भाऊ वकील नितीन शेवाळ यांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यांनी थेट पती बापू कटरे यांच्यावर गंभीर आरोप करत बहिणीचा छळ केल्याचे म्हटले आहे.

वकील नितीन शेवाळ यांनी समतानगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, समतानगर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे. तसेच त्यांनी पुढील तपास देखील सुरू केला आहे. घटनास्थळी जाऊन पोलिसांनी पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. रेणु कटरे यांच्या मृत्यू मागील कारण नेमके काय आहे, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. मात्र, रेणु यांच्या कुटुंबीयांनी जो संशय व्यक्त केला आहे, त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. त्यानुसार पोलिस तपास करत आहेत.

## दाऊद टोळीशी संबंधित गुंडाला गुजरातमधून अटक

■ **महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २७ :**

दाऊद टोळीशी संबंध असल्याचा संशय असलेला आरोपी सरवर खानला शस्त्र पुरवणाऱ्याला गुजरातमधून अटक करण्यात आली. दीपक नंदकिशोर शर्मा (३२) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपीविरोधात यापूर्वीही नऊ गुन्हे दाखल आहेत. गुन्हे शाखेच्या तपासानुसार, आरोपी शर्मा याची ठाणे कारागृहात सरवर खानसोबत ओळख झाली होती. सरवर खानने अपहरण करण्यासाठी वापरलेले पिस्तुल शर्माने दिल्याचा आरोप आहे.

गुन्ह्यात आधीच अटकेत असलेल्या आरोपींच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी शर्माला गुजरातमधून शोधून काढले आणि त्याला मुंबईत आणण्यात आले आहे. अमली पदार्थ तस्करीचा गुन्हा असलेल्या साजिद इलेक्ट्रिकवाला आणि त्याचा साथीदार शब्बीर सिद्दीकी यांचे मुंबईतून अपहरण करण्यात आले होते.

सरवर खानने खंडणीची मागणी करताना इलेक्ट्रीकवाला यांच्या कपाळावर पिस्तूल ठेवले होते. ती पिस्तूल शर्मा याच्याकडे सापडली असून त्याच्याकडून पाच जिवंत काडतूसांसह ती जप्त करण्यात आली आहे. शर्माला यापूर्वी २०२१ मध्ये दहिसरमधील गोळीबार प्रकरणात अटक करण्यात आली होती. तो ठाणे कारागृहात सुमारे सात महिने होता. त्याचदरम्यान त्याची सरवर खानसोबत ओळख झाली होती. शर्मा हा एक सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर मुंबई, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत.

इलेक्ट्रिकवाला व त्याचा साथीदार शब्बीर यांना मुंबईत जबरदस्तीने मोटरगाडीत बसवून त्यांचे अपहरण करण्यात आले होते.

# मोरा बंदरात बोट बुडून खलाशाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी,
उरण, दि. २७ :**

शनिवारी (२६ जुलै) ला अलिबागच्या खांदेरीच्या परिसरात करंजा येथील एक बोट बुडाल्या नंतर रात्री उशिरा मोरा बंदरात खालाशाना घेऊन येणाऱ्या छोट्या बोटीला अपघात झाला असून यात एकाचा बुडून मृत्यू झाला आहे. सुरेश गौतम(२२) असं या खलाशाच नाव असून तो उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे.

या संदर्भात मोरा सागरी पोलिसात नोंद करण्यात आली आहे. तर मृत खलाशाचा मृतदेह उरणच्या इंदिरा गांधी रुग्णालयात नेण्यात आला आहे. शनिवारी रात्री ओहटीच्या वेळी मोरा बंदराच्या नजीक असलेल्या मोरा मुंबई रो रो च्या जेट्टी जवळ मोठी मासेमारी बोट उभी करण्यात आली होती. या बोटीच्या दुरुस्ती साठी काही कारागीर छोटी बोट घेऊन गेले होते. ते रात्रीच्या वेळी परतत असतांना समुद्राला आलेली भरती आणि वादळी वाऱ्याने ही सहा ते सात जणांना घेऊन किनाऱ्यावर येणारी बोट उलटली.

त्यातील पाच जण पोहून किनाऱ्यावर आले. मात्र एकाला पोहतांना दम लागल्याने तो भरतीच्या मोठ्या लाटेत बुडाला. त्याचा मृतदेह रविवारी सकाळी किनाऱ्यावर लागल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी हा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला आहे. मोरा बंदरातील बोट दुर्घटनेतील मृत हा सुतार काम करणाऱ्याच्या हाताखाली काम करणारा मजूर होता.

त्याला जास्त पोहता येत नसल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास मोरा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बबन सोनवणे हे करीत आहेत.

## कोल्हापुरी चप्पल विकल्या जातील क्युआर कोडसह

■ **महासागर प्रतिनिधी,
कोल्हापूर, दि. २७ :**

भारतातील सर्वात प्रतिष्ठित पारंपारिक हस्तकलेपैकी एक असलेल्या कोल्हापुरी चप्पलला केवळ देशांतर्गत फॅशन जगातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही लोकप्रियता मिळत आहे. इटालियन ब्रँड प्राडावर या चप्पलचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. त्याच्या गुंतागुंतीच्या कारागिरी आणि सांस्कृतिक वारशासाठी प्रसिद्ध आणि भौगोलिक निर्देशक दर्जा असलेले हे हस्तनिर्मित चामड्याची चप्पल आता क्युआर कोडच्या स्वरूपात सुरक्षा आणि प्रामाणिकपणाच्या अतिरिक्त थरासह उपलब्ध राहणार.

याचे श्रेय अलीकडील तंत्रज्ञान आणि कायदेशीर नवोपक्रमाला जाते. महाराष्ट्राच्या लेदर इंडस्ट्री डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनया अधिकाऱ्यांनी सांगितले की, बनावट कोल्हापुरी चप्पलची विक्री थांबवणे, प्रत्येक उत्पादनामागील कारागिराची ओळख दर्शविणे, ग्राहकांचा विश्वास वाढवणे आणि पारंपारिक कारागिरांची बाजारपेठेतील स्थिती मजबूत करणे हे या पावलाचे उद्दिष्ट आहे. अलिकडेच, कारागिरांनी इटालियन लक्झरी फॅशन ब्रँड प्राडाच्या नवीन संग्रहात कोल्हापुरी चप्पलसारखे



दिसणारे पादत्राणे समाविष्ट करण्याविरुद्ध निषेध केला होता आणि GI अधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला होता.

या वादानंतर, प्राडाने कबूल केले की २०२६ च्या पुरुषांच्या फॅशन शोमध्ये प्रदर्शित केलेले सँडल पारंपारिक भारतीय हस्तकला पादत्राणांपासून प्रेरित होते. तथापि, ब्रँडने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सला दिलेल्या उत्तरात स्पष्ट केले आहे की प्रदर्शित केलेले सँडल डिझाइन टप्प्यात आहेत आणि त्यांचे व्यावसायिक उत्पादन अद्याप निश्चित झालेले नाही. प्राडाच्या तज्ञांच्या पथकाने या महिन्याच्या सुरुवातीला कारागिरांशी संवाद साधण्यासाठी आणि स्थानिक शू-स्लिपर उत्पादन प्रक्रियेचे मूल्यांकन करण्यासाठी कोल्हापूरला भेट दिली.

१२ व्या शतकातील, ही चप्पल प्रामुख्याने महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यात तयार केली गेली आहे.

नैसर्गिकरित्या टॅन केलेल्या चामड्याने आणि हाताने विणलेल्या पट्ट्यांपासून बनवलेली, त्यांची विशिष्ट रचना कारागिरांच्या पिढ्यांनी जतन केली आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा दूरदर्शी शासक छत्रपती शाहू महाराजांनी स्वावलंबन आणि स्वदेशी अभिमानाचे प्रतीक म्हणून याचा प्रचार केला तेव्हा त्याला मोठी चालना मिळाली. त्यांनी या चप्पलांच्या वापराला प्रोत्साहन दिले, ज्यामुळे ग्रामीण हस्तकला एक आदरणीय कुटीर उद्योगात विकसित होण्यास मदत झाली.

या सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यासाठी आणि कारागिरांना योग्य मान्यता मिळावी यासाठी, महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारने २०१९ मध्ये संयुक्तपणे चप्पलसाठी जीआय दर्जा मिळवला. लिडकॉमने प्रत्येक चप्पलच्या जोडीसाठी क्यूआर-कोडेड प्रमाणपत्र सुरू केले आहे, असे निवेदनात म्हटले आहे. कोड स्कॅन करून, खरेदीदार कारागीर किंवा उत्पादन युनिटचे नाव आणि स्थान, महाराष्ट्रातील उत्पादन जिल्हे, हस्तकला तंत्र आणि वापरलेला कच्चा माल, जीआय प्रमाणपत्राची वैधता आणि स्थिती यासारखी माहिती मिळवू शकतात.

## मराठवाड्यात मुसळधार पावसाचा धुमाकूळ

■ **महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. २७ :**

मराठवाड्यात पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. विभागातील तब्बल 44 महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 15, नांदेड जिल्ह्यातील 10, हिंगोली जिल्ह्यातील 9, जालना जिल्ह्यातील 9 आणि लातूर जिल्ह्यातील 1 महसूल मंडळांचा समावेश आहे.

मागील सलग तीन दिवस मराठवाड्यात जोरदार पाऊस बरसला. त्याआधी जवळपास वीस दिवस पावसाने मराठवाड्याकडे पाठ फिरवली होती. तसेच मराठवाड्यातील लहान-मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्येही पुरेसा जलसाठा होऊ शकला नव्हता. 24 जुलैपासून पावसाला पुन्हा सुरुवात झाली आणि संपूर्ण मराठवाडा ओलाचिंब झाला. अनेक छोटे प्रकल्प पाण्याने भरून गेले. काही जिल्ह्यांत नदी, नाले आणि ओढ्यांना पूर आला.

शनिवारी सकाळी 8 वाजेपासून रविवारी 8 वाजेपर्यंतच्या चोवीस तासांत मराठवाड्यात सरासरी 32.9 मिमी पावसाची नोंद झाली. हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक 52.4 मिमी पाऊस बरसला. त्यापाठोपाठ जालना जिल्ह्यात 47.1 मिमी पावसाची नोंद झाली. सर्वात कमी 15.5 मिमी पाऊस परभणी जिल्ह्यात झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 39.2 मिमी, नांदेड जिल्ह्यात 38.5 मिमी, लातूर जिल्ह्यात 25.7 मिमी, बीड जिल्ह्यात 19.6 मिमी आणि धाराशीव जिल्ह्यात 16.9 मिमी पावसाची नोंद झाली.

## तेराव्या माळ्यावरून पडून रंगारीचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी,
कल्याण, दि. २७ :**

कल्याण पश्चिमेतील चिकनघरमध्ये एका इमारतीच्या तेराव्या माळ्यावरील सदनिकाच्या खिडकीच्या बाजुला रंगकाम करत असलेला एक ४६ वर्षीय रंगारी तोल जाऊन इमारती खालील खोल खड्डयात पडला. या रंगारीला रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी जाहीर केले. मणकेश सिताराम चव्हाण (४६) असे रंगाऱ्याचे नाव आहे. ते रंगारी म्हणून काम करतात. या मजुराच्या मृत्युप्रकरणी कामगार ठेकेदार गुड्डुकुमार कसौधन (३५) यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात माहिती दिली. पोलिसांनी तपास करून भारतीय न्याय संहितेच्या २०२३ कलम १९४ प्रमाणे अपमृत्युची नोंद केली आहे.

# अखेर सुनील बागूल आणि मामा राजवाडेंचा भाजपमध्ये प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २७ :**

शिवसेना ठाकरे गटाचे माजी उपनेते सुनील बागूल आणि माजी महानगरप्रमुख मामा राजवाडे यांनी आज नाशिकमध्ये मोठ्या शक्ती प्रदर्शनासह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत या पक्षप्रवेश कार्यक्रमात बागूल, राजवाडे यांच्यासोबत शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस राज्यभर ठिकठिकाणी साजरा केला जात असतानाच, नाशिकमध्ये भाजपने ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे. विशेष म्हणजे, पक्षप्रवेशावेळी गिरीश महाजन यांनी सुनील बागूल यांना काहीशा कडक शब्दांत तंबी दिल्याचेही पाहायला मिळाले.

या पक्षप्रवेश सोहळ्यात बोलताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले, सुनील भाऊ यांचा हा शेवटचा प्रवेश आहे. परत आता इकडे-तिकडे जाऊ नका.



मागच्या वेळी बडगुजर आले, सर्वांना भाजपमध्ये यावे, असे वाटते आहे. नरेंद्र मोदी नावाचे वादळ राज्यात देशात नाही तर जगभर आहे. जगात कुठेही जा मोदी, इंडीया, भारत याच नावाची चर्चा आहे. पोपटपंची करणारे खूप लोक आहेत. सकाळ पासून काही लोक सुरू होतात, असे म्हणत संजय राऊत यांच्यावर महाजन यांनी निशाणा साधला.

पुढे बोलताना गिरीश महाजन म्हणाले, त्यांच्याकडे कोणी राहिले नाही. बडगुजर होते, नंतर मामा राजवाडे होते, ते ही आता आले आहेत. आता कोण आहे गिते. त्यांना आपल्याला घ्यायचे नाही. आता, भाजप हाऊसफुल्ल झाले आहे. आता कोणाला घ्यायचे नाही, असे म्हणत महाजन यांनी माजी आमदार वसंत गीते यांच्यावर अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

गिरीश महाजन म्हणाले, कोट्यवधी घरात मोदींनी गॅस दिला. लाडकी बहीण योजना सुरू आहे, काहींना भांडे वाटप केले जात आहे. कोरोना काळात संकट आले, त्याचे रूपांतर संधीत केले आणि औषध निर्माण केले. पाकिस्तान, चीन किती त्रास देत होते. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर सर्वांनी धडकी घेतली आणि भारताच्या नादी लागायचे नाही, असे ठरवले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अनोखी मानवंदना

## पुण्यातील साई मित्र मंडळाचा गणेशोत्सवात महिलांच्या हाती सर्व कारभार देण्याचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २७ :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या जयंतीचे यंदाचे ३०० वे वर्ष आहे. विविध कार्यक्रमातून, उपक्रमातून त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. एकीकडे गणेशोत्सवाला यंदा महाराष्ट्र सरकारने राज्य उत्सव म्हणून मान्यता द्यायचा निर्णय घेतला असताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या साई मित्र मंडळाने यंदाच्या वर्षी मंडळाचा सर्व कारभाराची दोरी महिलांच्या हातात देण्याचा औचित्यपूर्ण निर्णय घेतला आहे. यंदा महिलांच्या हाती कारभार देत मंडळ वेरुळ येथील कैलास मंदीर साकारणार आहे. या देखाव्याच्या कामाचे कळसपूजन मंत्री




चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले, यावेळी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी ही घोषणा केली.

कोथरूड परिसरातील केंद्रीय मंत्री मोहोळ संस्थापक असलेले श्री साई मित्र मंडळ हे भव्य व देखण्या प्रतिकृती गणेशोत्सवात सादर करण्यासाठी प्रसिद्ध आहे. यंदाच्या वर्षी ३० वा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी, अशीच भव्य, आकर्षक आणि कलात्मक प्रतिकृती सादर करताना मंडळाची धुरा महिलांच्या हातात त्यांनी दिली आहे. यंदाच्या उत्सवाचे सर्व संयोजन महिला भगिनी करणार आहेत. त्यांना सहाय्यक म्हणून पुरूष कार्यकर्ते काम करणार आहेत. भारतीय शिल्पकारांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका पाषाणात कैलास लेणीची केलेली निर्मिती हे जगभरासाठी आश्चर्य ठरले आहे. ही लेणी बघण्यासाठी लाखोंच्या संख्येने परदेशी पर्यटक दरवर्षी वेरूळला भेट देतात. या सजावटीच्या कामाच्या कळस पूजनाचा शुभारंभ यावेळी प्रसिद्ध मूर्ती आणि मंदिर अभ्यासक गणेश धालपे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. गेल्यावर्षी अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती मंडळाने केली होती.

याबाबत केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, गणेश मंडळांचा मुख्य कारभार पुरूष मंडळींच्याच हातात असतो. मंडळातील महिला भगिनी काम करतातच, मात्र त्यांना खुले व्यासपीठ मिळत नाही. मात्र हे चित्र बदलायचे असून यंदाचे अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीचे ३०० वे वर्षे आपण साजरे करत आहोत. त्यानिमित्ताने आमच्या मंडळातील महिला भगिनी अनोखी आदरांजली वाहतील. अहिल्यादेवींच्या चरित्रापासून महिला वर्गाला स्फूर्ती मिळावी आणि त्यांचा सार्वजनिक कामातील माताभगिनींचा आत्मविश्वास, सहभाग वाढवण्यासाठी आम्ही सर्वांनी ही निर्णय घेतला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळात समावेश होणे ही संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब

## मन की बात कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उल्लेख अकोला जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये ९२२ ठिकाणी सामूहिक रित्या कार्यक्रमांमध्ये २२२७ कार्यकर्त्यांचा सहभाग






■अकोट,दि.२७ (प्रतिनिधी) : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळात समावेश होणे ही केवळ महाराष्ट्राच्या दृष्टीने नव्हे तर संपूर्ण देशाच्या दृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ जुलै रोजी झालेल्या मन की बात कार्यक्रमात केले. हा कार्यक्रम अकोला जिल्ह्यामध्ये आमदार रणधीर सावरकर, आमदार खासदार अनुप धोत्रे पालकमंत्री नामदार एडवोकेट आकाश पुंडकर संघटन मंत्री डॉक्टर उपेंद्र कोठेकर आमदार प्रकाश भारसाकले, आमदार हरीश पिंपळे आमदार वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर तेजराव थोरात किशोर पाटील यांच्या मार्गदर्शनात, ९२२ ठिकाणी बूथ प्रमुखांनी कार्यक्रम आयोजित केला आणि बैठक घेऊन मन की बात आणि विविध कार्यक्रम संदर्भात चर्चा विनिमय केला जिल्ह्यात २२ २७ कार्यकर्ते विविध पदाधिकारी यांनी सहभाग घेतला लोकप्रतिथीसह सगळ्या पदाधिकारी या कार्यक्रमांमध्ये ग्रामीण भागामध्ये भाग घेतला अशी माहिती संघटन सरचिटणीस माधव मानकर अंबादास उमाळे एडवोकेट रूपाली काकडे, राजेश नागमते यांनी दिली.

याच कार्यक्रमात पंतप्रधान श्री. मोदी यांनी पैठण तालुक्यातील पैठणी निर्मिती उद्योग चालविणाऱ्या कविता ढवळे यांच्या कामाचेही कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमात म्हणाले की, आपल्या सर्वांना अभिमान वाटावा, अशी बातमी युनेस्कोकडून आली आहे. युनेस्कोने मराठा साम्राज्याच्या १२ किल्ल्यांना 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून मान्यता दिली आहे. या प्रत्येक किल्ल्याच्या इतिहासाचे एक - एक पान जोडले आहे. किल्ल्याच्या बांधकामासाठी वापरलेला प्रत्येक दगड, प्रत्येक चिरा हा ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार आहे. साल्हेरच्या किल्ल्यामध्ये मुघलांचा पराभव झाला होता. शिवनेरी, या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. काही किल्ले असे आहेत की, त्यांना जिंकणे शत्रूला शक्य झाले नाही. खांदेरीचा किल्ला तर समुद्रामध्ये बनविण्यात आलेला अद्भूत किल्ला आहे. हा किल्ला तयार होऊ नये, यासाठी छत्रपती शिवाजी राजांना रोखण्याचे अनेक प्रयत्न शत्रूंकडून झाले. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी अशक्य ते शक्य करून दाखवले. प्रतापगडच्या किल्ल्यामध्ये अफजल खानाला पाणी पाजले होते. विजयदुर्ग या किल्ल्यामध्ये गुप्त बोगदे होते. छत्रपती शिवाजी महाराज किती दूरदृष्टीचे राज्यकर्ते होते, याचे प्रमाण या किल्ल्यामध्ये सापडते. काही वर्षांपूर्वी मी रायगड ला गेलो होतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावरील पुतळ्यासमोर मी नतमस्तक होऊन वंदन केले होते. त्यावेळी आलेल्या अनुभूतीचा क्षण अगदी आयुष्यभरासाठी माझ्या मनामध्ये कोरला गेला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथील कविता ढवळे यांनी प्रारंभी एका लहानशा खोलीमध्ये व्यवसाय सुरु केला. त्यांच्याकडे जागा नव्हती की, इतर काही सुविधा नव्हत्या. सरकारकडून मिळालेल्या मदतीमुळे त्यांच्यातील कलेला भरारी घेण्याचं बळ मिळालं. आता त्या या व्यवसायातून तिप्पट कमाई करतात.

# अकोल्यात कॅफे'च्या नावावर मोकळ रान

## २९ वर्षीय तरुणाचे ३३ वर्षीय महिलेवर अत्याचार...



**■अकोला,दि.२७ (प्रतिनिधी) : अकोला शहरात एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. लग्नाचं आमिष दाखवून एका २९ वर्षीय तरुणाने ३३ वर्षीय विवाहित महिलेवर वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शहरातील जीएमडी मार्केटमधील एका कॅफे मध्ये हा अमानुष प्रकार घडला आहे. याप्रकरणी आरोपी शुभम गजानन टाले याच्याविरोधात सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचा पती दारू पिऊन मारहाण करत असल्याने ती वेगळी राहत होती. याच काळात तिची शुभम टालेसोबत सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली, जी पुढे मैत्रीत बदलली. शुभमने तिच्यासोबत लग्न करण्याचे आमिष दाखवून तिला पतीपासून विभक्त होण्यास सांगितले. काही दिवसांनंतर शुभमने या महिलेला अकोल्यातील एका कॅफेत नेले आणि तिथे तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर त्याने त्याच कॅफेत वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. नंतर मात्र, शुभमने लग्नाला नकार दिला आणि महिलेला शिवीगाळ करत मारहाण केली. यानंतर पीडित महिलेने सिव्हिल लाईन पोलिसांत शुभम टालेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेमुळे अकोल्यातील कॅफेमधील वाढत्या गैरप्रकारांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. यापूर्वी शहरांतील अनेक कॅफेमध्ये अल्पवयीन मुले-मुलींचे अश्लील चाळे सुरू असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. त्यांनी काही कॅफेंना भेट देऊन तपासणीही केली होती, जिथे त्यांना अनेक आक्षेपार्ह गोष्टी आढळल्या होत्या. त्यांनी यावर कारवाईची मागणी महापालिका आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांकडे केली होती. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील अनेक कॅफेमध्ये तरुणाईला बसण्यासाठी पडदे लावलेल्या 'प्रायव्हेट केबिन'ची व्यवस्था पुरवली जाते. यासाठी ग्राहकांकडून २ ते ३ हजार रुपये अतिरिक्त शुल्क घेतले जाते. विशेष म्हणजे, या केबिनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसतात, ज्यामुळे गैरप्रकारांना वाव मिळतो. महिला संघटनांनी या विरोधात आवाज उठवला असला तरी अद्याप यावर ठोस उपाययोजना झालेली नाही. या घटनेनंतर अकोला महापालिका, पोलीस प्रशासन आणि संबंधित विभाग या कॅफेमधील गैरप्रकारांवर काय भूमिका घेतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलीसांची जुगार अड्यावर धाड

## ३ लाख २४ हजार ५६० रु चा मुददेमाल जप्त



■अकोट,दि.२७ (प्रतिनिधी) : अकोट ग्रामीण पोलीसांची जुगार अड्यावर अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदयांचे उच्चाटन करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात आले.२६/०७/२०२५ रोजी अकोट ग्रामीण पोलीसांना माहीती मिळाली की, अकोट बोर्डी रोडवरील अब्दुल सलीम अब्दुल जलील यांच्या शेतालगत असलेल्या खोपडी जवळील झाडाखाली काही इसम पैशाचे हारजीतवर जुगार खेळत आहेत. अशा मिळालेल्या माहितीवरून दोन पंचासमक्ष सदर ठिकाणी जुगार रेड केला असता त्या ठिकाणी १) शेख अक्रम शेख मुस्तफा वय ४६ वर्षे रा. इक्तेखार प्लॉट अकोट २) अन्वर अली खुर्शीद अली वय ५० वर्षे रा. ताहपुरा, अकोट ३) समीर खान शेर खान वय ३५ वर्षे रा. खतीब पुरा अकोट ४) मोहम्मद सलीम मोहम्मद अकबर वय ३३ वर्षे रा. टेकडीपुरा, अकोट ५) शेख अयुब शेख सत्तार वय ४२ वर्षे रा. गाजी प्लॉट, अकोट ६) मोहम्मद अकील मोहम्मद मुजेदार वय ४० वर्षे रा. बडा अलावा अकोट ७) फिरोज अली जमीर अली वय ४१ वर्षे रा. गाजी प्लॉट, अकोट असे इसम पैशाचे हारजीतवर जुगार खेळतांना मिळून आले.

# भाजपाच्या प्रसिद्धी प्रमुख पदावर सर्वाधिक काळ राहणारे गिरीश जोशी यांनी नोंदविला इतिहास



■अकोला,दि.२७ (प्रतिनिधी) : भारतीय जनता पक्षाच्या इतिहासामध्ये एकाच पदामध्ये सर्वाधिक कार्यरत राहण्याचा विक्रम भाजपा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांच्या नावाने नोंदला गेला आहे. सातत्याने १९८९ पासून भाजपाचा प्रसिद्धी प्रमुख पद स्वर्गीय वसंतराव देशमुख, विजयराव जाधव, माजी केंद्रीय मंत्री संजय भाऊ धोत्रे, नारायणराव गव्हाणकर, विठ्ठलराव साल पीकर ,, मदनलालजी खंडेलवाल, प्रमिलाताई टोपले, मनोहरराव रहाणे, तेजराव थोरात, किशोर पाटील, आमदार रणधीर सावरकर, अशा अकरा जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली त्यांनी काम केलं आहे आणि आता संतोष शिवरकर यांच्या कार्यकारणी मध्ये सुद्धा यांचा समावेश झाला आहे अनेक लोकसभा विधानसभा महानगरपालिका नगरपालिका निवडणुकीमध्ये प्रसिद्धी प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिला आहे.भारतीय जनता युवा मोर्चा मध्ये अनेक पद काम कामे केले असून कोषाध्यक्ष सचिव महासचिव प्रसिद्धी प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिला आहे.

## थोडक्यात

### बार्शीटाकळी येथे पोलिसांचा रूट मार्च

**बार्शीटाकळी:** श्रावण महिना सुरू झाला आहे. येथे कावड यात्रा काढण्यात येते. पुरातन काळातील महादेवाची मूर्ती असून दर्शनाकरिता दुरून दुरून लोक येतात. सण, उत्सव काळात शांतता राखण्यासाठी रूट मार्च काढला. शांततेचे आवाहन करण्यात आले. कालंका माता मंदिर पुरातन काळाची असून येथे श्रावण महिन्यामध्ये एक जणू यात्रा भरते श्रावण महिन्यात भाविकांची गर्दी जास्त असून या ठिकाणी एक उत्साह असते श्रावण महिन्यात बार्शीटाकळी येते कावळ यात्रा निघत असून येथे मोठमोठ्या महादेवाची मूर्ती येत असून येथे जवळपास खेडे कान्हेरी सराफ आळंदा पिंपळखुटा एरंडा परंडा गौरव कातखेडा पिंजर काजळेश्वर महान या सगळे गावातील लोक श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारला पालखीच्या महादेवाच्या दर्शनासाठी सामील होतात या कावळ्यातील मध्ये विविध प्रकारचे उपहार नाष्टा फळ वाटप करण्यात येते आगामी या कावळ यात्रा चौक बंदोबस्त असून २७ रोजी येथे पोलीस प्रशासन यांनी रूट मार्च केले आहे व सगळं रस्त्याची पाहणी केली आहे.

### सततच्या पावसाने घराची भिंत कोसळली



**वाडेगाव:** बाळापूर तहसील अंतर्गत येत असलेल्या ग्राम वाडेगाव येथे सततच्या पावसाने घराची पडझड झाल्याची घटना बुधवार २३ जुलै रोजी मध्य रात्रीच्या सुमारास घडली असून सुदैवाने जीवितहानी टळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार बुधवार रात्री सततच्याच्या पावसाने भीम नगर येथील सुनिता अतिश डोंगरे यांच्या घराची भिंत पडली असून यामध्ये घरातील साहित्य दाबून हजारो रुपयाचे नुकसाना झाले असून कुटुंब उघड्यावर आले आहे. या घटनेबाबत ग्रामप्रशासन महसूल अधिकारी यांनी घटनास्थळी पोहचून पंचनामा करण्यात यावा वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे पाठवून आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी क्षतीग्रस घरकुल लाभार्थी सुनिता डोंगरे यांनी केली आहे.

# दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या राखी उपक्रमाला प्रभात किड्सचा प्रतिसाद



■अकोला,दि.२७ (प्रतिनिधी) : स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबविले जात आहेत.रक्षाबंधना निमित्त दिव्यांगांनी तयार केलेल्या राख्यांना महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून मागणी येत आहे. प्रभात किड्स स्कूल, अकोला चे संचालक डॉ.गजानन नारे व संचालिका सौ.वंदना नारे यांनी सदर राखी उपक्रमाला दि. २६ जुलै २०२५ रोजी आमंत्रित केले होते. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी दिव्यांगांनी तयार केलेल्या राख्या, तुपाची फुलवात,धूप , उदबत्ती पर्यावरणपूरक पेन-पेन्सिल व क्रोशाच्या वस्तूंची खरेदी करून दिव्यांगांच्या शिक्षण रोजगार व आरोग्यासाठी आपले भरीव योगदान दिले.

# महावितरण कार्यकारी संचालकाची अचानक भेट देत




■अकोला,दि.२७ (प्रतिनिधी) : महावितरणचे प्रादेशिक संचालक श्री परेश भागवत यांनी बाळापूर आणि शेगाव उपविभागाला अचानक भेट दिली. वीज पुरवठा खंडित होण्याची कारणे,करण्यात आलेले उपाय-योजना,देखभाल दुरूस्तीची कामे,वीज बिल वसूली आणि उपविभागात सुरू असलेल्या विविध योजनाचा आढावा घेतला.यावेळी मुख्य अभियंता राजेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. आढावा घेतांना प्रादेशिक संचालक म्हणाले की,वीज सेवा केवळ वीज ग्राहकांच्या घरातीलच नाही तर त्यांच्या जीवनातील अंधार दुर करणारी सेवा आहे. वीज ग्राहकांना अखंडित सेवा द्या,त्यांच्या तक्रारी सोडविण्याला प्राधान्य द्या, ग्राहकांशी सौजन्याने वागा. महावितरणच्या ऑनलाईन सेवेचा वीज ग्राहकांना लाभ देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा.ग्राहकांशी जवळीक साधून ग्राहकांमध्ये महावितरणप्रति विश्वास निर्माण करणारी सेवा देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सुचना यावेळी त्यांनी केल्या.महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसूलावरच अवलंबून आहे. गेल्या तीन चार महिन्यांमध्ये महसूलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसूली झालेली नाही, ही गंभीर बाब आहे. महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसूलीशिवाय अन्य पर्याय नाही. थकबाकी व चालू वीजबिलांचे उद्दिष्ट दरमहा पूर्ण करावे. तसेच जुन्या नादुरुस्त किंवा सदोष वीज मीटरमुळे महावितरण व ग्राहकांना आर्थिक फटका बसतो. असे जुने मीटर तातडीने बदलविण्याच्या निर्देश यावेळी त्यांनी दिले.

# राणी सती धाममध्ये जल्लोषात झाला तीज उत्सव



■अकोला,दि.२७ (प्रतिनिधी) : राजस्थानी समाजात सौभाग्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या श्रावण मासातील हिरवळीचा तीज उत्सव स्थानीय राणी सती धाम येथे हर्षोल्लासात संपन्न झाला.रविवारी संपन्न झालेल्या या महिला उत्सवात धाम येथे महिलांनी एकच गर्दी करीत झोपळ्यांचा आनंद घेतला.समितीच्या वतीने परिसरात ३१ झोपाळे निर्माण केले होते. उत्सवात परिसरात विविध साहित्याचे स्टाल लावण्यात आले होते.यावेळी महिलांनी आकर्षक व पारंपरिक वेषात उपस्थित होऊन अनेक रंगारंग कार्यक्रम करीत झोपाळ्यावर झोके घेत श्रावण मासातील गीत म्हणत आनंद व्यक्त केला. तर अनेक महिलांनी तीजचे महत्व सांगितले. यावेळी मातृशक्ती ने दादीची पूजा अर्चना केली. धामचे अध्यक्ष जगदीश बाछुका यांच्या अध्यक्षतेत संपन्न या तीज महोत्सवाच्या सफलतेसाठी मेहनत घेत आहेत.

# लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठ अकोटच्या विद्यार्थ्यांना खा. अनुप धोत्रेकडून कौतुकाची थाप



■अकोट,दि २६ (प्रतिनिधी) : ला.ब. शा. ज्ञा.अकोट यांच्यावतीने नेहमीच मुलांमध्ये देशप्रेम रुजवण्याचे कार्य करते. सोबतच विद्यार्थ्यांच्या भावना उपक्रमामध्ये उत्सुकतेने सहभागी होऊन दर्शवितात. जून २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात, सुध्दा देशाभिमान दाखवत सैन्याच्या शौर्याला नमन म्हणून Red for Love - Red for War Oeration Sindoor या शीर्षकाखाली विविध उपक्रम राबवले. या सर्व बाबींची माहिती विद्यमान खासदार श्री. अनुपजी धोत्रे यांना दिली असता त्यांनी विद्यार्थ्यांच्या देशप्रेमाला दाद दिली. व सोबतच ह्या उपक्रमाची माहिती संरक्षण खात्यास पाठविण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक श्री. नंदकिशोर पनायकार सर व श्री अक्षय शेंदुरकर सर यांनी अथक प्रयत्न केले.

# कावड यात्रा मिरवणुक उत्सवानिमित्ता शांतता समीती बैठक सपंन्न



■हिवरखेड,दि २६ (प्रतिनिधी) : येथे सालाबादप्रमाने श्रावन मासातील कावड यात्रा नागपंचमी पोळा सन ऊत्सवाच्या पार्श्वभूमीवर ठानेदार गजाननजी राठोड यांचे अधीपत्याखाली आज रोजी सकाळी गावातुन कावडयात्रा बंदोबस्ता निमीत्त शांतता व सूव्यवस्था अबाधीत राहावी यासाठी रुट मार्च काढन्यात आला तर सध्यांकाळी शांतता समीती सदस्य व पत्रकार बाधवाच्या ऊपस्थीतीत बैठक सपंन्न झाली या वेळी पहील्या सोमवारी निघर्नाया कावड यात्रे मधे महाकालेर्श्वर मित्र मंडळ कावड यात्रा श्रिराम सेना कावड यात्रा फत्तेपुरी सस्थान शिवभक्त कावड मंडळ अशा तीन मंडळाच्या कावड यात्रा निघत असून कावड यात्रेचा मार्ग माजी आमदार स्वर्गीय डॉ का शा तिडके प्रवेश द्वार ते मेनरोड रोडने निघून महादेव सस्थान गोर्धावेस भवानी मदीर मार्गे स्व देश भक्त संपतराव भोपळे गेट ते ईतीहास कालीन सदाशिव सस्थानवर भोलेनाथाला जल वाहन्यास जात असतात शांतता समीती बैठकी मधे बाजाराचा दिवस असल्यामुळे शातंता समीती कडून बॅरीकेट लावन्याच्या सूचना तसेच सर्व शिवभक्ताना त्रास होनार नाही तसेच गुण्या गोवीदांने ऊत्सव शाततेत पार पडन्यासाठी हिंदु मुस्लीम बांधव एकत्रीत पणे सहभाग घेत असतात असे शातता समीती बैठकीत सदस्यानी सांगीतले.

VASTU HOUSING FINANCE

**वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि**

युनिट २०३ आणि २०४, दुसरा मजला, ए विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई ४०००१५. महाराष्ट्र.

CIN No.: U65922MH2005PLC272501

**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरीदार हे सिक्युरिटायझेशन अंतर्गत वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आहेत आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंमलबजावणी आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना संबंधित नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी डिमांड नोटीस जारी केली आहे. रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झालेल्या कर्जदारांनी, खाली नमूद केलेल्या तारखेला नमूद केलेल्या नियमांच्या कलम १३(४) अंतर्गत मला दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा खाली स्वाक्षरीने घेतला आहे.

कर्जदार आणि जामीनदार विशेषतः आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणतेही व्यवहार खाली नमूद केलेल्या रकमेसाठी वास्तू हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखेच्या शुल्क आणि त्यावरील व्याज, खर्च इ. च्या अधीन असतील.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव, सह-कर्जदार आणि लेन क्र. | डिमांड नोटिसची तारीख आणि रक्कम | मालमत्तेचे वर्णन | तारीख आणि ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | अशोक लोटू इवनाते, मुकेश लोटू इवनाते, मुन्नीबाई लोटू इवनाते, HL0000000177005 | १५ मार्च-२५ रोजी ६९४०५१ रुपये ९ मार्च-२५ | एकूण जमिनीचा तो सर्व तुकडा आणि तुकडा सुमारे ५४२ चौरस फूट भूखंड क्षेत्र आणि प्रस्तावित बांधकाम क्षेत्र ५४२ चौरस फूट मालमत्तेचा पत्ता मालमत्ता क्रमांक ५५०, अनु क्रमांक ५५०, वॉर्ड क्रमांक ०३, मौजा आणि ग्रामपंचायत-धानोडी, वरुड, वरुड, अमरावती, महाराष्ट्र, ४४४९०६, भारत. उत्तर-मार्ग, दक्षिण-शेत, पूर्व-रामप्यारी युवानाते, पश्चिम-मार्ग | २४-जुलै-२५ रोजी घेतलेला प्रतीकात्मक ताबा |

तारीख: २८.०७.२०२५
ठिकाण: अमरावती

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि
अधिकृत अधिकारी

# अष्टपैलू व्यक्तिमत्व ...!



आयुष्याच्या सोनेरी आकाशात उत्तुंग भरारी घेऊन यशस्वीपणे वाटचाल करणारे चिकाटी, अदम्य इच्छाशक्ती, सातत्य, प्रामाणिकपणा, किर्ती, इच्छित ध्येय गाठणारे, स्पष्टवक्ता मनात अनेक इच्छा, आकांक्षा असणारे विकासाचा महामेरू, विकासपुत्र, कोणत्याही पदाचे कर्तृत्वपण समजणारे अष्टपैलू व्यक्तितत्व म्हणजेच श्रीमान आदरणीय नितीनजी गडकरी साहेब यांचे नाव समोर येते. आतापावेतो देषातील सर्वच भागात रस्त्याचे सुरू असलेले कामे बघता, येत्या वर्षात लवकरच भारत देषाचे नाव प्रगत देषाच्या तुलनेत बरोबरी करू शकेल, यात मुळीच शंका नाही. अर्थातच, आणखी सांगावयाचे असे की, या समवेत शेतकायांच्या अनेक समस्याकडे ते आर्वजून लक्षही देण्याचे कार्य करतात. योग्य तंत्रज्ञान कसे देता येईल, याकडे पण सातत्याने शोध घेत असतात. परिणामतः इतक्यावर कुठेही थांबुन न राहता आपल्या समाजाचा, सामान्य मानवी जीवनाचा विकास कसा होईल, याकडे नेहमी लक्ष देतात. विकासाच्या दृष्टीने कोणत्याही शहराचा विकास व चेहरामोहरा कषा रितीने बदलेल, असा आग्रही ध्येय मनाषी ठेवुन पुढे मार्गक्रमण करीत असतात. इतकेच नव्हे तर सारखकारखाने, सामान्य माणसाची सोय म्हणुन त्यांच्या आरोग्याची समस्या उत्पन्न होणार नाही, यांची पण सातत्याने काळजी घेतात. हे धोरण राबविण्याचे ते प्रयत्न करतात. इच्छित मनोधर्याचे ध्येय गाठण्यासाठी अहोरात्र झटत असतात. अषा पसरलेल्या आवाक्यात स्वतः कसलीही उसंत न बाळगता सतत कामाची आखणी सर्वधर्मसमभाव या न्यायानी करीत असतात. हे केवळे मोठे औदार्य! नाही काय? ज्यांच्याजवळ स्वतःची बुध्दी वापरण्याच आणि ठाम निर्णय घेण्याच कौषल्य व तंत्र असत, तो कधीच दुसायाच हातच बाहुले बनत नाही. म्हणून अषा व्यक्तीला नेहमीच यष मिळत असते. अर्थातच, जीवनात अषी अष्टपैलू व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने लाभणं. हे आपल्याला समजायला जास्त भाग्य लागत. चांगले कर्म करणारी व्यक्ति ही तुकोबाच्या गाथेप्रमाणे असते. तिला कुणी कितीही बुडविण्याचा प्रयत्न केला तरी, तो जीवनात तरून जाते व यषस्वी होते. किंबहुना, मानवी जीवन प्रवासात सर्वांगीण विकास होणे महत्वाचे असते. पण, त्यासाठी आपल्या शहराचे लोकप्रतिनिधी, लोकनेते, प्रमाणीत प्रभावी राजकारणी असणे, हे सुध्दा तितकेच अगत्याचे आहे, त्यानुसार अषा लोकप्रतिनिधीमध्ये प्रगतीचे सोपान निस्वार्थपणे पार पाडण्याची शक्ती असावी लागते. त्यासाठी लोकप्रतिनिधीमध्ये स्वभावातील गोडीने आणि जीभेवरील माधुर्याने खुप माणसे जोडली जातात....... हेच चार्तुय श्रीमान गडकरी साहेबां जवळ आहे म्हणुनच म्हणावेसे वाटते कि, संयम आणि माफ करण्याची ताकद मनुष्यामध्ये असली की सर्वकाही साध्य होते. अर्थातच, आनंदी दिसणाया व्यक्तिंना दुःख नसतेच असे नाही. फक्त त्यांना दुःखांषी किंवा प्रगतीच्या अडथळयांना दोन हात करण्याची संपुर्ण कला श्रीमान गडकरी साहेबांना जमलेली आहे म्हणुनच राजकारणामध्ये समाजकारण करण्याची उर्मी नेहमीच त्यांच्या अंगातच भिनलेली आपल्याला दिसुन येते. विकासाची कला कितीही कठीण भासत असली तरी ही एक गोष्ट अषीच असतेच की त्यात साहेबांना यष हे मिळतेच, असे म्हणणे यानिमित्याने रास्त ठरावे.! साहेबांना काम करण्याची चिकाटी हा छोटा शब्द आयुष्याला चिकटलेला आहे म्हणुन साहेब प्रत्येक गोष्टीत त्याच सोनं करून दाखवितात याचं ज्वलत उदाहरण म्हणजे आपल्या संत्रानगरीतील विकासाच्या निमित्याने परिवर्तनषील सुंदर नागपूर वर्तमानात जवळुन बघावयास मिळते, हे मात्र खरे! आपल्याला क्षणभर टोचणारी सूई सगळयांच्या लक्षात राहते, पण सर्वांगीण विकासाच्या दूर दृष्टीने जोडुन ठेवणारा धागा मात्र कोणालाच दिसत नाही, हे केवढे मोठे अवभाग्य म्हणता येईल. यावर स्वतःच्या कल्पनेतुन विचार करण्याची खाया अर्थाने गरज आहे. सत्याला जिंकायला थोडा उषीर लागतो पण सत्य कधीच हारत नाही. आणखी तिकतेच महत्वाचे असे की, सत्यातुनच विष्वप्रेमाचा उगम होतो. अर्थातच या विष्वप्रेमाणी मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास होत असतो हे मात्र खरे ठरावे! मनाला मानवी जीवन विकासाच्या माध्यमाची सवय जडली असता उचित कृति ही लोकप्रतिनिधीकडून आपोआप घडत असते. पण यासाठी स्वच्छचारित्र, लोककल्याणकारी, चांगले समाजकारण, निस्वार्थपणे सेवा, सतत विकासाचे ध्येय, स्वतःच्या शब्दावर ठाम असणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व असणे गरजेचे आहे, असला विकासाचा ध्यास म्हणजेच श्रीमान गडकरी साहेब होय, असे या निमित्याने म्हणणे महत्वाचे ठरते.

जो पावसाच्या पाण्याने भिजतो, तो कपडे बदलवितो पण जो विकासाच्या घामाने भिजतो तो लोकप्रतिनिधी इतिहासच बदलवितो हे मात्र खरे. त्यात देषातच नव्हे, तर महाराष्ट्र विदर्भाच्या आजु–बाजुला आपल्याला विकासाच्या माध्यमातुन अनेक उद्योगधंदे बघावयास मिळते जसे, आयआयएम, मेट्रो, समृध्दी महामार्ग, नविन कॅन्सर हॉस्पीटल, कृषी प्रदर्शने, क्रिडा महोत्सव, खासदार महोत्सव, सायन्स महोत्सव, तंत्र विज्ञान कॉलेज अषा अनेक विविधांगी विषयावर होत असलेली कार्यशाळा, रेल्वेचे विस्तारीकरण इत्यादी. यासमवेत कोव्हीड काळात (सगळे जग थांबले असतांना) रस्ते बांधणी करण्याचा रेकॉर्ड स्थापीत करावा व कोव्हीड काळात इतर गरजेच्या सोयी निर्माण करून देण्यात व महाराष्ट्रसाठी अहोरात्र झटत राहीले. यासंकल्पनेतुन अनेकांना दिलासा मिळाला. या कठीण दिवसात साहेब सामान्य लोकांच्या पाठीमागे एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणुन उभे राहीले व अनेक समस्यांचे सर्वोपरीने निराकरण करून स्वतःचा चांगुलपणा दाखविला हे सत्य कधीही विसरता कामा नये. मोगरा कुठेही ठेवला तरी सुगंध हा येणारच आणि साहेबासारखी विकासपुरूष लोकप्रतिनिधी, लोकनेते कोठेही, कुठेही असली तरी विकास हा होणारच.... सृष्टी कितीही बदलली तरी माणुस पुर्णतः सुखी होत नाही, पण लोकप्रतिनिधीची लोकनेत्याची दृष्टी बदलली तर समाज नक्कीच सुखी होतो. हेच कार्य श्रीमान गडकरीने विकासाच्या माध्यमाने आवर्जुन करून दाखविले आहे. लोकप्रतिनिधीनी लक्षात ठेवण्यासारखे आहे ते म्हणजे जीवनात जे मिळवायचे ते मिळवा. फक्त एक गोष्ट नक्कीच लक्षात ठेवा की, तुमच्या ध्येयाकडे जाणारा मार्ग कधीही लोकांची मने तोडून जाणारा नसावा. म्हणुन विकासाची कामे करतांना अंतःकरण जो पर्यंत शुध्द आहे, तोवर या विष्वातील कोणत्याही गोष्टीची भीती बाळगण्याची गरज नाही. फक्त नीतीमत्ता साफ ठेवण्याची खाया अर्थाने गरज आहे.

साहेवांनी जात, पात, धर्म, पंथ याचा विचार कधीही केलेला दिसुन येत नाही. मनानी स्वच्छ पण, माणसाला माणुस म्हणुन जगण्याचा अधिकार आहे असा विचार नेहमीच करीत असतात. जगात कोणतीही गोष्ट साध्य करता येते. त्याकरीता प्रबळ इच्छाशक्ती, जिद्द, चिकाटी, विकासाची तळमळ इत्यादी विविधांगी गोष्टी स्वतःच्या मुळात असावी लागते. तरच आपण कोणत्याही पदाची गरिमा सार्थकी लावु शकतो. अशा कार्यतत्पर, सकारात्मक दृष्टीकोण, देशाला प्रगतीशिल वनविणारा व जागतिकीकरणाकडे वाटचाल करणारा या समवेत कोणत्याही परिस्थितीत स्वतः कटीबध्द गहणारा अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजेच 'विकासाचा महामेरू म्हणणे अजिवात वावगे ठरू नये. राजकारणातुन समाजकारण यातुन देशाचा सर्वांगीण विकास हे ध्येय उराशी बाळगुन जो देशासाठी कार्य करतो तोच नेता या भुस्थलावर नेहमी यशप्राप्त होतो. तोच लोकप्रतिनिधी सोसायटी, समाज, राज्य, राष्ट्र आणि देशासाठी अखेरपर्यंत आधारस्तंभ ठरतो. जोपर्यंत स्वतःवर विश्वास आहे आणि जिंकण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती आहे तोवर यशश्री साहेबांना नाकारू शकत नाही. असे विन्स्टन चर्चीलचे म्हणणे यानिमित्याने रास्त ठरावे. साहेवाजवळ असलेले अदम्य, प्रवळ इच्छाशक्तीमुळेच जीवनातील अनेक स्वप्ने लोकप्रतिनिधी म्हणुन अनेक पदे, विकासाचे मोठे ध्येय उदिष्टे कमी वर्षात उतुंगाने गातू शकले. पण, यासाठी माणसाजवळ अतिविश्वास, उत्साह, ध्येय, साहस व स्वतःवर आत्मविश्वास असावा लागतो. स्वतःच्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर आळशी, निरूत्साही माणूस सुध्दा फार कमी वेळात शिस्तप्रिय बनु शकतो. पण, यासाठी नैसर्गिक नियमाचे काटेकोर पालन करणे फारच गरजेचे आहे. 'विश्वासाला शक्तीची जोर मिळाली तरच महान कार्य उभे राहते. असे आदरणीय वल्लभभाई पटेल सांगुन गेले. जीवनात चांगल्या माणसांना शोधु नका. तुम्ही चांगले बना. जग तुम्हाला शोषत येईल. समाजकरणामध्ये किंवा राजकारणामध्ये स्वतःच्या वचनाशी प्रत्येकजण प्रामाणिक राहील्यास देशाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी कुणीही रोखु शकत नाही व कोणताही वाद विकोपाला जाणार नाही. देशाला सर्व गुणांनी अतिशय सुंदर बनवावयाचे असेल तर तो नेता, लोकप्रतिनिधी अतिशय हुशार, संयमी, जाणकार, मनमिळावू, लोकसेवेसाठी तत्पर, प्रवळ इच्छाशक्ती असलेले दृग्दृष्टी, स्पष्टवक्ता, लोककल्याणाची जाण, देशासाठी स्वाभीमान, कर्तुत्ववाण, उदारमतवादी स्वभाव, विलक्षण आकलनशक्तीवर सातत्याने विशेष भर, लोकजागृतता इत्यादी विविधांगी गोष्टीने परिपूर्ण असणे आवश्यक आहे, तरच आपला भारत देश विश्वातील देशात महासत्येच्या दिशेने जाऊन जागतिक स्तरावर नावलौकीक करू शकतो. वरील अभ्यासलेले सर्वच गुण साहेवाजवळ आहे व ते त्यांच्या रक्तातच भिनलेले असुन प्रबळ इच्छाशक्तीच्या जोगवर देशाचे चांगले, अनुभवाच्या जोरावर, माध्यमाने जागतिक स्तरावर सक्षमपणे नेतृत्व करू शकेल, असा आत्मविश्वास देशातील अनेक जेष्ठ नेत्यांना, जाणकार सश्चम लोकांना या गोष्टीची जाणीव आहे. वर्तमानात राजकीय परिस्थितीचा दिवसेंदिव्रस मोठ्या प्रमाणात न्हास होत असल्याचे जाणवते आहे. म्हणुन सर्व धर्म समभाव असलेला व्यतिमत्वाची देशाला सध्यातरी गरज आहे. असा ध्यास असलेला व्यक्ती, नेता, लोकप्रतिनिधी भविष्यात देशाचे उच्चपद भुषविल्याम नवल वाटू नये? भविष्यात शितलचंद्र हगामागे जाऊन, आनंदाचा मुर्योदय झाल्यास देशातील सर्व लोकांना सर्व पश्चातील लोकांना व्यक्तींना विरोधी व पक्षांना आनंदच होईल, असे झाल्यास पूर्ण देश त्यांचे कौतुक व आनंद व्यक्त करेल.

कठोर परिश्रमातुन यश मिळविलेले असतं तेच इतरांच्या मेहनतीचे कौतुक करू शकतात.



शब्दांकन : **विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,**
लेखक/वृत्तपत्र समिश्यक
स्नेहविजय
२४, उदयनगर, गल्ली नं. ४,
नागपूर–४४००२४
मो.नं. ९३२५७३३८३६

# महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेची वाटचाल प्रगतीपथ की प्रश्नपथ?

शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मूलभूत अधिष्ठान असते. लोकशाही, सामाजिक समता, आणि आर्थिक विकास यांची पायाभरणी हे शिक्षणच करत असते. महाराष्ट्र ही एक प्रबुद्ध, प्रगत आणि विचारशील राज्य म्हणून ओळखली जाते. येथे अनेक सामाजिक सुधारणा चळवळी, विद्रोही विचारवंत, आणि गुणवत्तापूर्ण विद्यापीठांची परंपरा आहे. पण तरीही महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था आज अनेक आव्हानांच्या गर्तेत अडकलेली आहे. एकीकडे राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) लागू करण्याचा जोर आहे, तर दुसरीकडे शाळांमधील शिक्षकांची कमतरता, मुलांची घसरणारी उपस्थिती, शिक्षणातील असमानता आणि तांत्रिक/आधुनिक साधनसामुग्रीचा अभाव ही गंभीर प्रश्नचिन्हे उपस्थित करतात.

**सर्वसमावेशक शिक्षणाचा अपुरा पोत –**
महाराष्ट्रात सर्व मुलांना शिक्षण मिळावे, हे उद्दिष्ट अनेक योजना आणि धोरणांतून मांडले जाते. पण आदिवासी, दलित, भटक्या–विमुक्त जमाती, मुस्लीम आणि ग्रामीण गरीब वर्गातील विद्यार्थी अजूनही शिक्षणाच्या प्रवाहात पूर्णपणे सामावले गेलेले नाहीत. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलांची संख्या घटत असून, त्याचा परिणाम सरकारी शाळांवर होतो आहे. दुसरीकडे शहरी भागात खासगी शाळांचा बाजार बहरतो आहे. ही सामाजिक व आर्थिक शिक्षणविषयक दरी अधिक खोल होत आहे.

**शिक्षकांच्या जागा रिक्त, गुणवत्तेचा प्रश्न गंभीर**
२०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यातील हजारो शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि नक्षलग्रस्त भागांत शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे. शिक्षणाचा दर्जा चांगला असावा, यासाठी सक्षम शिक्षकवर्ग हाच कणा आहे. पण प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, तात्पुरती नियुक्ती, कॉन्ट्रॅक्ट शिक्षक व्यवस्था यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणात बाधा येते आहे.



प्रशांत विघे

**आराखड्यांमध्ये शिक्षण, पण बजेटमध्ये उपेक्षा –**
महाराष्ट्राच्या वार्षिक अर्थसंकल्पात शिक्षणासाठी मोठ्या घोषणांचा गजर केला जातो, पण प्रत्यक्षात बजेट खर्चाचा टक्का कमी असतो. एकीकडे शिक्षणात डिजिटल क्रांतीचा नारा दिला जातो, पण दुसरीकडे बहुतांश शाळांमध्ये संगणक, इंटरनेट, स्मार्ट बोर्ड यांचा अभाव दिसतो. डिजिटल शिक्षणाचा लाभ काही निवडक शहरी मुलांपुरता मर्यादित राहिला आहे. ही डिजिटल दरी ही नवी सामाजिक दरी बनत आहे.

**शालेय सोडतीचे वाढते प्रमाण अडचणीचे लक्षण**
मुलांच्या शालेय उपस्थितीत घट, आर्थिक गरिबीमुळे शिक्षण सोडणं, मजुरी–श्रमाकडे वळणं किंवा मुलींचं वयात येताच शिक्षण थांबवणं ही सामाजिक स्थिती चिंतेची आहे. काही जिल्ह्यांमध्ये ८वी–१०वीच्या विद्यार्थ्यांमध्ये शालेय सोडतीचे प्रमाण १५% पेक्षा अधिक आहे. ही बाब शिक्षण हक्क कायद्याच्या आत्म्यालाच विरोध करणारी आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण अपेक्षा की संभ्रम?**
नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे धोरण शिक्षणाच्या दर्जासाठी अनेक सकारात्मक संकल्पना घेऊन आले आहे. मातृभाषेतील शिक्षण, बहुभाषिकता, कौशल्यावर आधारित शिक्षण यांना प्रोत्साहन दिले आहे. पण महाराष्ट्रात याच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक अडचणी आहेत. शाळांच्या संकुलीकरण योजनेत ग्रामीण शाळांची विलिनीकरण प्रक्रियेबाबत संभ्रम आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणापेक्षा त्यांच्या 'सारख्या सोयीसाठी' रचना आखली जात असल्याची भावना तयार झाली आहे.

**खासगीकरण आणि शिक्षणातील बाजारीकरण**
महाराष्ट्रात दरवर्षी हजारो खासगी शाळा व महाविद्यालये उभी राहत आहेत. प्रवेशासाठी लाखो रुपये शुल्क, प्रवेश प्रक्रियेतील अपारदर्शकता, कोचिंग क्लास संस्कृती आणि गुण मिळवण्याच्या स्पर्धेने गुणवत्तेच्या शिक्षणाची अधोगती होते आहे. शासन पुरस्कृत शाळा मागे पडतात आणि शिक्षण ही सुविधा न राहता 'उत्पादन' बनते. यामुळे गरीब आणि मध्यमवर्ग शिक्षणसुधारणांपासून दूरच राहतो.

**शिक्षण क्षेत्रात राजकारणाचे घातक हस्तक्षेप**
शिक्षण संस्था, विद्यापीठ, महाविद्यालयांच्या नियुक्त्या, अनुदान निर्णय, अभ्यासक्रम सुधारणा यामध्ये राजकीय हस्तक्षेप वाढत आहेत. विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर गदा येते आहे. शिक्षक भरती प्रक्रिया, अनुदान मंजुरी व महाविद्यालय मान्यता यासारख्या क्षेत्रांत भ्रष्टाचार, निकृष्ट निर्णय व लांबणीचा धोका आहे.

**विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि मूल्य शिक्षण**
स्पर्धा, अपयश, सोशल मीडियाचा दुष्परिणाम, आणि पालक–शिक्षक–दाब यामुळे विद्यार्थी मानसिकदृष्ट्या दबावाखाली आहेत. आत्महत्यांचे वाढते प्रमाण, विशेषतः उच्च शिक्षण घेताना होणारा ताण, ही गंभीर समस्या आहे. मूल्यशिक्षण, समुपदेशन व संवेदनशील शिक्षक या गोष्टींची आता तीव्र गरज भासत आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि वैचारिक राज्यात शिक्षण ही व्यवस्था अधिक सुबक, सर्वसमावेशक, गुणवत्ताधारित आणि मूल्यनिष्ठ असली पाहिजे. शिक्षण ही केवळ आर्थिक गुंतवणूक नसून, ती सामाजिक पुनर्रचनेची आणि लोकशाही टिकवण्याची प्रक्रिया आहे. शासन, शिक्षक, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे शिक्षण क्षेत्रातील आव्हाने समजून घेत ठोस कृती करणे आवश्यक आहे.

शिक्षण ही सामाजिक समतेची गुरुकिल्ली आहे. ती गमावली तर भविष्यातील न्याय, बंधुता आणि विकास या कल्पना अपूर्ण राहतील. म्हणूनच, महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राला आज नव्याने विचार करण्याची, नव्याने दिशा ठरवण्याची गरज आहे बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारांचा पुनर्जागर करत!

# आता थायलंड – कंबोडिया यांच्यात लष्करी संघर्ष

संपूर्ण जग सध्या युद्धाच्या खाईत लोटले आहे. आशिया, युरोप, अमेरिका सर्वच खंडात कोणत्या ना कोणत्या देशात युद्ध चालू आहे. रशिया युक्रेन युद्ध दोन वर्ष झाली तरी चालूच आहे. इस्राईल हा देश तर सतत वार मोडवर असतो. कधी पॅलेस्टाईन कधी कधी हमास, कधी जॉर्डन तर कधी इराण या देशांशी इस्राईलचे युद्ध सुरूच असते. मागील वर्षी अझरबैजान आणि अल्बेनिया या देशात युद्ध झाले होते. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धाचा भडका उडाला होता. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेले ऑपरेशन सिंदूरने तर संपूर्ण जगाची चिंता वाढवली होती. भारत आणि चीन यांच्यात १९६२ पासून तणाव आहे. चीन आणि तैवान यांच्यातही कायम तणाव असतो या दोन्ही देशात कधीही युद्धाला तोंड फुटेल अशी शक्यता असते. दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया यांच्यातही तीच परिस्थिती असते आता त्यात आणखी एका युद्धाची भर पडली आहे आणि हे युद्धही आशिया खंडातील दोन देशातच सुरू झाले आहे. विशेष म्हणजे ही दोन्ही देश भारताचे सख्खे शेजारी नसले तरी शेजारी आहेत. भारताचा शेजारी असलेल्या म्यानमार या देशाच्या पलिकडे हे देश आहेत. आशिया खंडातील महत्वाचे असणाऱ्या कंबोडिया आणि थायलंड या देशात सध्या मोठा लष्करी संघर्ष सुरू आहे. या दोन्ही देशातील तणाव शिगेला पोहचला असून दोन्ही देशातील सैन्यामध्ये सीमेवर तुफान गोळीबार चालू असून त्यात आतापर्यंत दोन्ही बाजूंनी ३३ सैनिकांचा बळी गेला असून शेकडो सैनिक जखमी झाले आहेत. सोमवारी या संघर्षास सुरुवात झाली पहिल्याच दिवशी दोन्ही बाजूंचे ११ नागरिक गोळीबारात मारले गेले. थायलंडने गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप कंबोडियाने केला तर कंबोडियाने प्रथम गोळीबारास सुरुवात केल्याचा आरोप थायलंडने केला आहे. दोन्ही देश एकमेकांवर आरोप करीत असले तरी दोन्ही देश या युद्धास पूर्वी पासून सज्ज होते फक्त त्यांना युद्धास निमित्त हवे होते ते निमित्त त्यांना सोमवारी मिळाले. सोमवारी सीमेवर गोळीबार झाला आणि युद्धाला तोंड फुटले. मिळालेल्या माहितीनुसार रॉयल कंबोडियन आर्मीने सीमेवर ड्रोन तैनात केले होते. त्यांनी तोफ आणि लांब पल्ल्याच्या बीएम – २१ रॉकेटने गोळीबार केला त्याला थायलंडने चोख प्रतिउत्तर दिले. गोळीबाराने सुरू झालेला हा संघर्ष आता उग्र स्वरूप धारण करत आहे. या युद्धात ड्रोन, रॉकेट, फायटर विमान, तोफा यांचा वापर होत आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या लष्करी तळांवर हल्ला केला जात आहे. हा लष्करी संघर्ष लवकरात लवकर संपावा अशी जगाची इच्छा आहे. भारतानेही तसे बोलून दाखवले आहे. भारतीय नागरिकांनी या दोन्ही देशात प्रवास करण्याचे टाळावे असे आव्हान भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने केले आहे. अमेरिकेने नेहमीप्रमाणे या युद्धात नाक खुपसले आहे. स्वतःला आंतरराष्ट्रीय तंटामुक्ती संघटनेचे अध्यक्ष म्हणवून घेणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांनी लवकरात लवकर हा संघर्ष थांबवावा नाही तर अमेरिका या दोन्ही देशांशी होणारा व्यापार थांबवेल असा दम दिला आहे. मात्र सद्यस्थितीत दोन्ही देश ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. दोन्ही देश एकमेकांवर हल्ला करतच आहेत त्यामुळे हा संघर्ष आणखी वाढेल अशीच शक्यता आहे.

थायलंड आणि कंबोडिया या दोन्ही देशातील वाद हा आताच नाही अनेक दशकांपासून सुरू आहे. प्रिह विहार नावाचे एक मंदिर या दोन्ही देशांच्या सीमेवर आहे. या मंदिराच्या मालकी मालकी हक्कावरून दोन्ही देशांमध्ये तीव्र मतभेद आहेत. हे मंदिर आपल्याच प्रदेशात आहे असा दावा दोन्ही देशांचा आहे त्यावरून २००८ आणि २०११ साली या दोन्ही देशात असाच संघर्ष झाला होता. आता पुन्हा त्याच कारणाने या दोन्ही देशात संघर्ष सुरू आहे. या वर्षीच्या मे महिन्यात एका कंबोडियन सैनिकाला गोळ्या घालून ठार करण्यात आले होते तेंव्हा देखील असाच मोठा तणाव निर्माण झाला होता. तेंव्हाच या दोन्ही देशात युद्ध पेटेल अशी शक्यता जाणकारांनी वर्तवली होती. सुदैवाने तेंव्हा तो संघर्ष टळला आता मात्र हा संघर्ष टळू शकला नाही आणि अखेर युद्धाला तोंड फुटले.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# थायलंड–कंबोडिया युध्द दक्षिण–पूर्व आशियासाठी घातक!



थायलंड–कंबोडिया सीमा विवाद अचानक २३ जुलै २०२५ ला भयानक मोडवर पोहोचला सीमेवर तैनात एक थाई सैनिक विस्फोटमध्ये घायल झाला हा विस्फोट अशा ठिकाणी झाला की ज्या ठिकाणी मे महिन्यापासुन दोन्ही देशांची सेना आमने–सामने सीमावर्ती भागात तैनात होती.या विस्फोटचा आरोप थायलंडने कंबोडिया वर लावला.यानंतर २४ जुलै २०२५ ला थायलंड सेना अधिकाऱ्यांनी दावा केला की कंबोडिया सेनाने थायलंडच्या ४ सीमावर्ती प्रांतावर ( सुरिन,सिसाकेत,बुरीराम आणि उदोन थानी) रॉकेटने हल्ला केला यामध्ये ११ थायलंड नागरिक आणि एक सैनिक मारल्या गेला.यानंतर प्रत्युत्तर दाखल थायलंड वायुसेनाने एफ–१६ लडाकु विमानाने कंबोडियावर हल्ले केले आणि हा संघर्ष विकोपाला जाऊन पोहोचला व युध्दात परिवर्तीत झाला.११०० वर्षे जुने मंदिर विवादाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले जाते आणि याला कारणीभूत फ्रान्स असल्याचे जगजाहीर आहे.कारण थायलंड, कंबोडिया आणि लाओसच्या सीमेला एमराल्ड ट्रायंगल म्हटल्या जाते. १९०४ ला फ्रांसीसी औपनिवेशिक प्रशासनाने फ्रेंको–सियामी संधी च्या अंतर्गत सीमा मार्कींगसाठी डांगरेक पर्वत ला मुख्य आधार बनविण्यात आला.१९०७ मध्ये जेव्हा फ्रांसीसी सर्वेक्षण अधिकाऱ्यांनी नकाशा तयार केला तेव्हा प्रीह विहार मंदिर कंबोडियामध्ये दाखविण्यात आले. परंतु थायलंडने अनेक मंदिराच्या बाबतीत शंका व्यक्त केली आणि तेथूनच सीमा संघर्षाला सुरुवात झाली व हा संघर्ष फ्रान्सच्या १२१ वर्ष जुन्या चुकीमुळे निर्माण झालेला संघर्ष आज युध्दात रूपांतरीत झाल्याचे दिसून येते. गेल्या ११०० वर्षांपासून थायलंड व कंबोडियात जुन्या प्रेह विहेयर मंदिरावरून वाद सुरू आहे.हेगमधील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने १९६२ मध्ये हे मंदिर कंबोडियामध्ये असल्याचा निकाल दिला आणि थायलंडने निकाल सुध्दा मान्य केला.परंतु आताही आजुबाजुच्या जमिनींवरील वाद सुरू आहे आणि हा संघर्ष दिनांक २४ जुलै २०२५ ला दोन्ही देशांसाठी आगीचा गोळा बनली व हा वाद येवढा विकोपाला गेला की दोन्ही देश भिषण युध्दाच्या छायेत वावरत आहेत ही बाब संपूर्ण आशिया खंडासाठी चिंतेची व गंभीर विषय आहे.थायलंड व कंबोडिया यांना युद्धासाठी उकसविण्याचे काम चीन करीत आहे आणि समझोता करण्याचे काम करीत आहे.म्हणजे आग लावणे आणि विझविने हा चीनचा स्वार्थीपणाचा गुणधर्म आहे. कारण त्याचा मुख्य उद्देश म्हणजे विस्तारवादाला चालना देणे.त्यामुळे चीन दिवसेंदिवस आशिया खंडासाठी घातक सिद्ध होत आहे. कारण थायलंड–कंबोडिया यांच्यात जमीन विविद ११०० वर्षांपासूनचा आहे.परंतु आतापर्यंत येवढी भयानक युद्धजन्य परिस्थिती अजून पर्यंत निर्माण झालेली नव्हती.परंतु आता दोन्ही देशांकडून अत्याधुनिक शस्त्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे यात बीएम–२१ रॉकेट,एफ–१६ विमानांनी सैन्य ठिकाणांवर हल्ले आणि एफ –१६ विमानांची थायलंडची तयारी हा अत्यंत गंभीर विषय आहे.दोन्ही देशांचा वाढता संघर्ष पहाता दोन्ही देशांनी एकमेकांच्या राजदूतांची हकालपट्टी सुध्दा केली आहे.कंबोडियाने थायलंडवर बीएम –२१ रॉकेटने कारवाई केली तर थायलंडने एफ–१६ ने प्रत्युत्तर दिले व खुनी संघर्ष सुरू झाला.या संघर्षाचे मुख्य कारण म्हणजे डंगरेक पहाडावर स्थापित ११०० वर्षे जुने शिव मंदिर आहे (प्रासात ता मुएन थोम)या मंदिरावर दोन्ही देश आपला हक्क सांगतात. मंदिर भलेही थायलंडच्या सध्याच्या नकाशामध्ये येते, परंतु कंबोडिया या मंदिराला आपली पृष्ठभुमि मानते. त्यामुळे हा संघर्ष वाढता–वाढता आता युद्धामध्ये परिवर्तीत झाला आहे याचा गंभीर परिणाम थायलंड–कंबोडियाला तर भोगावाच लागेल सोबतच याचे प्रायश्चित्त संपूर्ण आशिया खंडातील देशांना सुध्दा भोगावे लागेल. त्यामुळे यावर ताबडतोब तोडगा निघणे गरजेचे आहे.असे सांगितले जाते की ११०० वर्षे जुने शिव मंदिर ज्याला प्रेह विहेयरच्या नावाने ओळखले जाते हे मंदिर खमेर सम्राट सूर्यवर्मन यांनी भगवान शिव साठी बनविले होते.परंतु वेळेनुसार हे मंदिर आता फक्त आस्थेचे केंद्र नसून राष्ट्रवाद, राजनीती आणि सैन्य ताकदीचा आखाडा बनला आहे.त्यामुळेच कंबोडिया आणि थायलंड यांचा संघर्ष विकोपाला गेला असुन झगड्याचे मोठे कारण बनले आहे. थायलंड–कंबोडिया वाढता संघर्ष पहाता सीमावर्ती भागातील थायलंडमधील एक लाखाहुन अधिक लोक आपले घर सोडण्यास मजबूर झाले आहेत.दिनांक २६ जुलैला सीमावाद आणि शिवमंदिर वादांमुळे आणखी भयावह स्थिती दिसून आली दोन्ही बाजूंनी प्रतीहल्ले सुरूच आहे यात ३६ लोक मारल्या गेले व ९० नागरिक जखमी झाले.आतापर्यंत दोन्ही देशांच्या विवादात ७८ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीररीत्या जखमी आहेत.दोन्ही देशाची युध्द परिस्थिती पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने आपातकाल बैठक घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरू केली आहे.परंतु यात अमेरिका व चीनची मध्यस्थी थायलंड व कंबोडियाने नाकारली आहे.त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघानेच हा संघर्ष स्वतः मध्यस्थी करून ताबडतोब थांबवावा व दक्षिण–पूर्व आशिया खंडात शांतता प्रस्थापित करावी.कारण जगात अनेक भागात युद्धजन्य परिस्थिती व गृहयुद्ध सुरू आहे त्यात जर दक्षिण–पूर्व आशियामध्ये युध्दाची चिंगारी वाढली तर संपूर्ण आशिया खंडात मोठा भडका उडुन भयावह स्थिती निर्माण होऊ शकते त्यामुळे याचे निवारण संयुक्त राष्ट्रसंघाने करावे.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

## अशोकायन...

### शिव प्रार्थना

ब्रम्हा विष्णू महेश
सृष्टी चक्राचे मुलाधार
निर्मिती पोषण संहार
करती जगाचे पालनहार ..

असुरत्वाचे वाढले प्राबल्य
कामातुरांनी घातले थैमान
त्रिनेत्रधारी विनविती महीला
भस्म करावे हे हैवान ..!

जगी नांदो सुख शांती
वैराग्य येऊ द्या शरीरी
परोपकारी वृत्तीचा संचार
होऊ द्या आमच्या अंतरी ..!



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# उंच गणेशमुर्त्यांचे विसर्जन व्यवस्थितच व्हायला हवे!

सार्वजनिक गणेशमूर्ती विसर्जनाबाबत अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला निर्णय उच्च न्यायालयाने अखेर दिला आहे. नवीन निर्णयानुसार ६ फुटांपर्यन्तच्या गणेशमूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावांत करणे बंधनकारक असणार आहे, तर ६ फुटापेक्षा अधिक उंची असलेल्या गणेशमूर्त्या समुद्र आणि नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव हा मुंबईतील सर्वांत मोठा उत्सव. गणेशोत्सव काळात गिरगाव, लालबाग आणि परळ या भागांत रात्रीचा दिवस झालेला असतो.

सर्वत्र विद्युत रोषणाईचा झगमगाट आणि गणेशभक्तांची वर्दळ या दहा दिवसांत दिसून येते. भक्ती आणि जल्लोष यांचा संगम असलेला हा उत्सव पाहण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी आणि मनात त्याच्या आठवणी कायमच्या कोरण्यासाठी हजारो विदेशी पर्यटक या दिवसांत मुंबईत दाखल होतात. गणेशभक्तांना आकर्षित करण्यासाठी मुंबईतील अनेक मंडळांत उंच गणेशमूर्ती आणण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. काही मंडळे सजावटीवर अधिक खर्च न करता मंडळात केवळ उंच मूर्ती बसवण्यावर भर देतात. मुंबईतील हा उत्साह पाहून गेल्या काही वर्षांपासून समुद्र किनारा लाभलेल्या मुंबई बाहेरील जिल्ह्यांतही उंच मुर्त्या बसवण्यात येऊ लागल्या आहेत. गणेशमुर्त्यांच्या उंचीबाबत बाजूबाजूच्या मंडळांमध्ये दरवर्षी स्पर्धा रंगलेली पाहायला मिळते. वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या यांमध्ये या उंच मुर्त्यांची छायाचित्रे झळकत असल्याने त्या जवळून पाहण्यासाठी गणेशभक्त मित्रमंडळी आणि नातेवाईकांसह दिवस–दिवसभर रांगेत उभे राहतात. १० दिवस मंडपात राजासमान विराजमान झालेल्या श्री गणेशमूर्ती विसर्जनाचा दिवस जेव्हा येतो तेव्हा तिला समुद्रापर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांना चांगलीच कसरत करावी लागते. रस्त्यातील अडथळे आणि गर्दीतून वाट काढत श्रींची मूर्ती समुद्रापर्यंत आणताना त्यांची चांगलीच दमछाक होते. उंच गणेशमूर्त्या खरेतर खोल समुद्रात विसर्जित करणे अपेक्षित असते; मात्र अनेक मंडळे विसर्जनाच्या वेळी मुर्त्या अर्ध्या पाण्यात अक्षरशः ढकलून पाडतात. त्या बुडण्यासाठी कार्यकर्ते मुर्त्यांवर उभे राहतात. त्यांचे पूर्णपणे विसर्जन झाले कि नाही याकडे मागे वळून न पाहता तिथून पळ काढतात. तर काही मंडळे उंच मुर्त्या तशाच अर्धवट पाण्यात सोडून निघून जातात. ओहोटीच्या वेळी पाणी किनाऱ्यापासून दूर गेल्यावर या मुर्त्या समुद्र किनाऱ्यावर तशाच उभ्या असलेल्या दिसून येतात. अनेक मुर्त्यांचे भग्न अवशेष किनाऱ्यावर आलेले पाहायला मिळतात. ज्या गणेशमूर्तीमध्ये प्रत्यक्ष श्रीगणेश विराजमान आहेत या भावाने आपण १० दिवस तिची मनोभावे पूजा करतो, त्या मूर्तीची विसर्जनाच्या वेळेस होणारी अवहेलना कोणत्याही गणेशभक्तांच्या डोळ्यात पाणी आणणारी असते. लक्षावधी गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या लालबागच्या राजा गणेशोत्सव मंडळातील श्रीच्या मूर्तीचे विसर्जन दरवर्षी तराफांच्या साहाय्याने खोल समुद्रात केले जाते. तो दिव्य सोहळा पाहताना आणि बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्याचे पारणे फिटते. जर लालबागच्या राजा मंडळाच्या उंच मूर्तीचे विसर्जन खोल समुद्रात केले जाऊ शकते तर इतरांना ते का शक्य नाही. आणि ज्यांना उंच गणेशमूर्त्यांचे विसर्जन विधिवत आणि भावपूर्ण करता येत नसेल अशा मुर्त्यांनी उंच गणेशमूर्त्या बसवून श्रीगणेशाची अवहेलना तरी करू नये. श्रीगणेशमूर्ती ही सजावटीची किंवा देखाव्याची वस्तू नव्हे, जी दहा दिवस सजवून मंडपात बसवली आणि अनंत चतुर्दशीला समुद्रावर सोडून दिली. गणेश भक्तांच्या श्रद्धेमुळे गणेशोत्सवादरम्यान गणेशमुर्तीमध्ये श्री गणेशाचे तत्व मोठ्या प्रमाणात अवतरित झालेले असते त्यामुळे त्या मूर्तीचा योग्य तो आदर–सन्मान राखला जायला हवा. तिचे विसर्जन शास्त्रशुध्दच व्हायला हवे अन्यथा श्री गणेशाच्या कृपेपेक्षा अवकृपेसच आपण पात्र होऊ.



**जगन घाणेकर**
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# एआय आणि नाविन्यता एकत्र: सॅमसंगकडून मुंबईमध्ये फ्यूचर-फॉरवर्ड बिझनेस एक्सपेरिअन्स स्टुडिओ लाँच

**मुंबई, २७ जुलै :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने मुंबईतील गोरेगाव पूर्व येथील इंटरनॅशनल बिझनेस पार्कमधील ओबेरॉय कॉमर्झ-२ च्या २व्या मजल्यावर अत्याधुनिक बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओ (बीईएस) लाँच केला आहे.

हा भविष्य-केंद्रित स्टुडिओ बी२बी सहयोगींना एकीकृत व्यवसाय सोल्यूशन्सची व्यापक श्रेणी देण्यासाठी अत्याधुनिक सॅमसंग डिवाईसेसदरम्यान असलेल्या विनासायास परस्पर कार्यक्षमतेला दाखवतो. ६,५०० चौरस फूट जागेवर विस्तारलेले शोरूम व्यवसायांना व्यावसायिक क्षेत्रांच्या व्यापक श्रेणीमध्ये शोध, नियोजन व नाविन्यता आणण्यास साह्य करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. बीईएस, मुंबई गुरूग्राममधील सॅमसंगच्या विस्तृत एक्झिक्युटिव्ह ब्रिफिंग सेंटर (ईबीसी) नंतर दुसरे केंद्र आहे, जे कंपनीची नाविन्यपूर्ण उत्पादने व बी२बी सोल्यूशन्सना दाखवते.

सॅमसंगमध्ये आमचा विश्वास आहे की व्यवसायांचे भविष्य सर्वोत्तम अनुभवांशी संबंधित आहे, जे मानवी-केंद्रित, कनेक्टेड व शाश्वत आहे. मुंबईतील बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओमधून हा दृष्टिकोन दिसून येतो. या शोरूममध्ये उद्योजक वास्तविक विश्वातील वातावरणामध्ये आमच्या सर्वात प्रगत एआय-समर्थित नाविन्यतांशी संलग्न होऊ शकतात. स्मार्ट क्लासरूम्सपासून ऑटोमेटेड हॉटेल्सपर्यंत, सर्वोत्तम आरोग्यसेवा साधनांपासून पेपरलेस बँकिंगपर्यंत आम्ही डिजिटल परिवर्तन सक्षम करत आहोत, जे अर्थपूर्ण, कार्यक्षम असण्यासोबत मोठ्या प्रगतीसाठी डिझाइन करण्यात आले आहे. हा स्टुडिओ तंत्रज्ञानाला दाखवतो, तसेच या स्टुडिओमधून भारतातील व जगभरातील आमच्या सहयोगींसोबत सहयोगाने उद्योजकांचे भविष्य घडवण्याप्रती आमची कटिबद्धता देखील दिसून येते,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले.




मुंबईमध्ये बीईएसच्या लाँचबाबत मत व्यक्त करत महाराष्ट्र सरकारचे माननीय माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार म्हणाले, आम्ही डिजिटल भारत मिशनला गती देत असताना एआय व व्हीआर सारखे उदयोन्मुख तंत्रज्ञान उद्योगांच्या कार्यसंचालन करण्याच्या, संस्थांच्या सेवा देण्याच्या आणि नागरिकांच्या विश्वाचा अनुभव घेण्याच्या पद्धतींना नवीन आकार देत आहेत. मुंबई या परिवर्तनामध्ये अग्रस्थानी आहे, तसेच नाविन्यता, सहयोग व भविष्यासाठी सुसज्ज परिसंस्थांना चालना देत आहे. सॅमसंगचा बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओ या प्रवासामध्ये महत्वपूर्ण भर आहे, जो आमच्या व्यवसायामध्ये जागतिक तंत्रज्ञान नेतृत्व आणेल आणि डिजिटल नाविन्यतेसाठी आघाडीचे हब म्हणून महाराष्ट्राचे स्थान अधिक दृढ करेल.''

मुंबईतील बीईएस स्टार्टअप्स, शाळा, हॉटेल्स, हॉस्पिटल्स व बँका अशा क्षेत्रांमधील क्लायण्ट्सना झोन्सच्या माध्यमातून सर्वोत्तम वॉकथ्रू अनुभव देतो. हे झोन्स वास्तविक विश्वातील स्थितींना दाखवतात, ज्यामुळे ते सर्वसमावेशक व्यवसाय वातावरणांमध्ये डिजिटल परिवर्तनाला चालना देण्यास सक्षम होतील.

उदाहरणार्थ, झोन १ मध्ये अभ्यागतांना शिक्षण, रिटेल व फायनान्स आणि आरोग्यसेवा अशा उद्योग क्षेत्रांसाठी डिझाइन करण्यात आलेले सर्वोत्तम सोल्यूशन्स पाहायला मिळतील. स्मार्ट क्लासरूम्स व कॅम्पस सोल्यूशन्समध्ये सॅमसंगचे नेक्स्ट-जनरेशन इंटरॲक्टिव्ह डिस्प्ले, टॅब्लेट्स आणि डिजिटल नोटिस बोर्ड्सचा समावेश आहे, जे एकमेकांशी सुसंगत राहत काम करतात. तसेच डिजिटल जाहिरात सोल्यूशन्समधील नाविन्यता, सॉफ्ट पीओएस सिस्टम्स, इंटेलिजण्ट एआर क्वॉलिटी मॅनेजमेंट सिस्टम्स आणि प्रगत डायग्नोस्टिक इक्विपमेंट रिटेल व फायनान्स आणि आरोग्यसेवा क्षेत्रांमधील सोल्यूशन्सना साह्य करतात.

झोन २ ची थीम युनिफाईड सोल्यूशन्स आहे, जेथे सॅमसंग स्मार्ट थिंग्ज प्रो कनेक्टेड एआय-पॉवर्ड सिस्टम्ससह मीटिंग रूम्स व हॉटेल रूम्सच्या भविष्याला दाखवते, तर सॅमसंगचा क्रांतिकारी डिस्प्ले द वॉल' ऑटोमोटिव्ह, सरकार, आदरातिथ्य आणि कॉर्पोरेटमध्ये अनेक स्थितींसाठी स्क्रिनिंग सोल्यूशन्स डिझाइन करतो.

तसेच, मुंबईतील बीईएसच्या झोन मध्ये ग्राहकांना सॅमसंग उत्पादने मायक्रोवेव्ह, साइड-बाय-साइड रेफ्रिजरेटर्स, टीव्ही, एसी, फ्रण्ट लोड वॉशिंग मशिन्स असलेले सोल्यूशन्स पाहायला मिळतील, जेथे सह-राहणीमान व स्आर्टअप्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यवसायांच्या गरजांची पूर्तता होईल, तसेच व्यावसायिक क्षेत्रांसाठी सिस्टम एसीचे प्रदर्शन देखील आहे. स्मार्ट होम सोल्यूशन्सचा शोध घेत असलेल्या ग्राहकांना झोन ४ मध्ये कनेक्टेड बेडरूम्स, किचन्स व लिव्हिंग रूम्ससंर्भातील सोल्यूशन्स पाहायला मिळतील. तसेच सर्वोत्तम गेमिंग व होम सिनेमा झोन्समध्ये आधुनिक इनोव्हेशन्स पाहायला मिळतील, जे सर्वाधिक मागणी करणाऱ्या तंत्रज्ञान उत्साहींना अचंबित करतील.

## क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडने ५,000 कोटी उभारण्यासाठी सेबी कडे यूडीआरएचपी दाखल केले

**मुंबई, २७ जुलै :** क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (कंपनी) ही एक भारतीय शैक्षणिक वित्त संस्था असून, भारतात आणि परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्यावर लक्ष केंद्रित करते. कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस भाग भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड कडे दाखल केला आहे. कंपनीची योजना प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री (आयपीओ) द्वारे निधी उभारण्याची असून, एकूण ५,००० कोटींच्या इश्यूमध्ये ३,००० कोटींचा नवीन समभाग विक्री प्रस्ताव आणि २,००० कोटी मूल्याचे ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे. हे सर्व समभाग १० दर्शनी मूल्यासह असतील.

५,००० कोटींच्या प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्रीतून (आयपीओ) होणाऱ्या २,००० कोटींच्या ऑफर फॉर सेलमध्ये, कोपवून बी.व्ही. (प्रमोटर विक्री करणारे भागधारक) कडून ९५० कोटी आणि एचडीएफसी बँक लिमिटेड (इतर विक्री करणारे भागधारक) कडून १,०५० कोटींचा समभाग समाविष्ट आहे. सर्व समभागांचे दर्शनी मूल्य १० आहे. २००६ मध्ये स्थापन झालेली ही कंपनी उद्योग अहवालानुसार, भारतातील अनेक निकषांवर आघाडीची शैक्षणिक वित्त संस्था म्हणून ओळखली जाते.

कंपनी आपल्या निव्वळ उत्पन्नाचा वापर भांडवली गरजा पूर्ण करण्यासाठी, व्यवसाय आणि मालमत्तेच्या वाढीमुळे उद्भवणाऱ्या भविष्यातील गरजांसाठी भांडवली तळ अधिक मजबूत करण्यासाठी करणार आहे.

कंपनीने ६०० कोटींपेक्षा जास्त नसलेल्या एकूण रकमेसाठी रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस आरओसीकडे दाखल करण्यापूर्वी, बीआरएलएमशी सल्लामसलत करून निर्दिष्ट सिक्युरिटीजचे प्री-आयपीओ प्लेसमेंट केले जाऊ शकते. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट केले गेले तर, बीआरएलएमशी सल्लामसलत करून कंपनीने ठरवलेल्या किंमतीवर असेल. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट केले गेले तर, प्री-आयपीओ प्लेसमेंटमधून उभारलेली रक्कम नवीन इश्यूमधून कमी केली जाईल, जो ऑफरने सुधारित सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) नियम, १९५७ च्या नियम १९(२)(बी) चे पालन केले पाहिजे. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट केले गेले तर, नवीन इश्यूच्या २०% पेक्षा जास्त नसावे.

उद्योग अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२४ ते २०२५ दरम्यान नेट कर्जवाढीच्या वर्षानुवर्ष वाढीच्या दृष्टीने ४७.६७% वाढ नोंदवत, क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक वेगाने वाढणारी शैक्षणिक-केंद्रित नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी आहे.

ही कंपनी सध्या भारतातील सर्वात मोठी शैक्षणिक-केंद्रित आहे (ती, आणि एकूण तीन कंपन्यांचा समावेश असलेल्या पीअर सेटमध्ये), ज्याचे ३१ मार्च २०२५ पर्यंतचे नेट कर्ज ४१,४६९ कोटी आहे. कंपनीचा पुनर्रचित करानंतर नफा आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ९९० कोटी इतका होता. त्याचबरोबर, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १४,०८९ कोटींचे सर्वाधिक वितरण नोंदविणारी ही कंपनी ठरली आहे. (कारण आर्थिक वर्ष २०२५ साठी इतर समकक्ष कंपन्यांचा डेटा उपलब्ध नाही.)

उद्योग अहवालानुसार, क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ही (तीस कंपन्यांच्या पीअर सेटसह) भारतातील सर्वात वेगाने वाढणारी शैक्षणिक-केंद्रित नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी ठरली आहे. या कंपनीने आर्थिक वर्ष २०२३ ते २०२५ दरम्यान नेट कर्ज मध्ये ६४.९६% चा वार्षिक संमिश्र वाढ दर नोंदविला आहे, तसेच ३१ मार्च २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता मध्ये ८४.२६% ची वर्षानुवर्ष वाढ दर्शविली आहे. (ही तुलना आर्थिक वर्ष २०२४ साठी करण्यात आली आहे, कारण आर्थिक वर्ष २५ साठी पीअर डेटाची अनुपलब्धता आहे.)

या आयपीओ इश्यूसाठी ॲक्सिस कॅपिटल लिमिटेड, सिटीग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, गोल्डमन सॅक्स (इंडिया) सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड, आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड (पूर्वी आयआयएफएल सिक्युरिटीज लिमिटेड) आणि जेफरीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्या बुक रनिंग लीड मॅनेजर्स म्हणून कार्यरत आहेत.


## आज का अंदाज

सोमवार २८ जुलै २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 3 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 246 | 346 | 790 | 234 |
| 390 | 490 | 880 | 379 |
| 480 | 580 | 600 | 478 |
| 21 | 31 | 60 | 90 |
| 27 | 37 | 68 | 98 |
| 24 | 34 | 65 | 95 |

मुंबई बाजार

| 2 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|
| 129 | 258 | 268 | 124 |
| 200 | 780 | 367 | 278 |
| 345 | 690 | 466 | 340 |
| 24 | 54 | 61 | 71 |
| 20 | 58 | 63 | 73 |
| 28 | 50 | 69 | 79 |

२८ जुलै २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 73 | 83 |
| 12 | 42 | 75 | 85 |
| 16 | 46 | 79 | 89 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## कुमकुम भाग्यमध्ये मेघा प्रसादचा झंझावाती प्रवेश, साकारणार सोनालिका ही भूमिका!



**मुंबई, २७ जुलै :** झी टीव्हीवरील सर्वांची आवडती मालिका कुमकुम भाग्य आपल्या सतत बदलणाऱ्या नात्यांमधील गुंतागुंत आणि भावना यांच्या प्रवाहातून प्रेक्षकांचे लक्ष कायम वेधून घेत आहे. प्रत्येक वळणावर नवे खुलासे आणि प्रचंड नाट्य पाहायला मिळत आहे. अलीकडेच जेव्हा शिवांश (नमिक पॉल) आणि प्रार्थना (प्रणाली राठोड) आपले जुने मतभेद बाजूला ठेवून नव्या सुरुवातीकडे वाटचाल करू लागले होते, तेव्हाच सोनालिकाच्या पुनरागमनामुळे त्यांच्या भूतकाळाची सावली पुन्हा त्यांच्या आयुष्यात आली. या वेळी सोनालिकाची भूमिका साकारत आहे प्रसिद्ध अभिनेत्री मेघा प्रसाद, जिने या मालिकेत झंझावाती प्रवेश केला आहे. याआधी ही भूमिका रूपम शर्माने साकारली होती, आणि आता मेघा या ताकदवान भूमिकेला नव्या उंचीवर नेण्यास सज्ज आहे.

आपल्या प्रभावी भूमिकांसाठी ओळखली जाणारी मेघा प्रसाद ही भूमिका खूपच सहजतेने साकारत आहे. बळकट स्क्रीन उपस्थिती, भावनिक खोली आणि अनेक स्तर असलेल्या व्यक्तिरेखेचा आत्मविश्वासपूर्ण अभिनय यांसह मेघा नवीन आणि तरीही गहन ऊर्जेसह सोनालिका साकारणार आहे. सोनालिकाचे पुनरागमन केवळ शिवांश आणि प्रार्थनाच्या आयुष्यात वादळ घेऊन येणार नाही, तर ती रौनक (अक्षय देव बिंद्रा) सोबत एक गुप्त करारही करते, कारण रौनक आधीच राग आणि सूडाच्या भावनेने पेटून उठलेला आहे. रौनकची कारस्थाने आणि सोनालिकाच्या योजना, शिवांश आणि प्रार्थनाच्या नव्या नात्याला मोठ्या संकटात टाकणार आहेत.

आपल्या भूमिकेबद्दल मेघा प्रसाद म्हणाली, सोनालिकाची व्यक्तिरेखा माझ्यासाठी खूप खास आहे. ती निडर आहे, भावनिक आहे आणि जे हवे असते ते मिळवण्यासाठी बिनधास्त आहे. मला तिच्यातली ही गोष्ट आवडते की ती परफेक्ट होण्याचा प्रयत्न करत नाही तिला आपल्या कमतरता माहिती आहेत आणि त्याच ती आपल्या ताकदीने वापरते. रौनकसोबत तिची जी जोडी झाली आहे, त्यात केवळ ड्रामा नाही तर त्यात रणनीति आहे, भावना आहेत आणि थोडेसे धाडसही आहे. कलाकार म्हणून सोनालिकामधील असूया, तिचे धैर्य आणि तिच्या अनेक छटा साकारणे माझ्यासाठी रोमांचक आणि आव्हानात्मक होते. ही अशी व्यक्तिरेखा आहे जी सतत बदलते, चकित करते आणि खूप खरी वाटते. प्रेक्षक पुढे काय पाहणार आहेत याची मला उत्सुकता आहे.

सोनालिकाचे भावनिक पुनरागमन आणि रौनकच्या नीट आखलेल्या योजना यामुळे कुमकुम भाग्य आता एका थरारक वळणावर पोहोचली आहे. पण काय सोनालिका तिला कायमच आपले वाटलेले प्रेम पुन्हा मिळवू शकेल?

## राष्ट्रीय पालक दिनानिमित्त झी टीव्हीच्या कलाकारांनी शेअर केल्या बालपणीच्या आठवणी

**मुंबई, २७ जुलै :** राष्ट्रीय पालक दिन आपल्याला आईवडिलांच्या शांत ताकदीची, अढळ प्रेमाची आणि आयुष्याला आकार देणाऱ्या संस्कारांची जाणीव करून देतो जे त्यांच्या शब्दांत, कृतीत आणि रोजच्या छोट्या मोठ्या त्यागांमधून आपल्या आयुष्यात उतरतात. ते आपल्या सुरुवातीच्या आठवणींचे आधारस्तंभ असतात आणि भविष्यातील व्यक्तिमत्व घडवणारे शिक्षकही. या खास दिवशी झी टीव्हीवरील काही लोकप्रिय कलाकार सरू मधील मोहक मटकर, वसुधा मधील प्रिया ठाकूर, जाने अनजाने हम मिले मधील भरत अहलावत, जागृति एक नयी सुबह मधील सागर पारिख, जमाई नंबर १ मधील सिमरन कौर आणि तुम से तुम तक मधील निहारिका चौक्सी हे त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या आयुष्यात काय स्थान आणि भूमिका बजावली याबाबत सांगत आहेत. स्वयंपाकघरात आईसोबतचे प्रेमळ क्षण असोत किंवा ऑडिशननंतर वडिलांकडून मिळालेली कठोर शिकवण हे कलाकार आजही त्यांच्या आईवडिलांच्या त्या नात्यामुळे रोज प्रेरणा घेतात आणि त्यांच्या आठवणी शेअर करत आहेत.

झी टीव्हीवरील 'सरू' मालिकेत सरूची भूमिका साकारणारी मोहक मटकर म्हणाली, माझ्यासाठी सगळे काही आमच्या छोट्याशा लिव्हिंग रूममध्ये सुरू झाले, जिथे मी आई-बाबांच्या समोर चित्रपटांमधले सीन सादर करायचे. तोच माझा पहिला स्टेज होता आणि तेच माझे पहिले प्रेक्षक. जेव्हा त्यांना वाटायचे की मी अजून चांगले करू शकते तेव्हा त्यांचे प्रोत्साहन आणि त्यांचा प्रामाणिकपणा यांनीच मला एक अभिनेत्री म्हणून घडवले. एक आठवण जी माझ्या मनात कायमची घर करून राहिली आहे ती म्हणजे आमच्या घरी साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाची धामधूम. त्या दिवसांत सगळा परिवार एकत्र यायचा हशा, संगीत, आईच्या हातचे मोदक आणि घरभर आनंदाचे वातावरण. लहानपणी जेव्हा कुणी पाहत नसायचे तेव्हा मी चोरून जास्त मोदक खायचे! या पालक दिनानिमित्त मला फक्त त्यांच्यासोबत बसून एक चित्रपट पाहायचा आहे, घरचे छान जेवण जेवायचे आहे आणि खूप गप्पा मारायच्या आहेत.

झी टीव्हीवरील 'वसुधा' मालिकेत वसुधाची भूमिका साकारणारी प्रिया ठाकूर म्हणाली, माझे आई-वडील नेहमीच माझे सर्वात मोठे पाठीराखे राहिले आहेत. जेव्हा जेव्हा ते मला सेटवर भेटायला येतात, त्यांच्या डोळ्यातला अभिमान पाहून वाटतं की सगळे संघर्ष सार्थकी लागले. माझ्या सगळ्यात आवडत्या आठवणींपैकी एक म्हणजे त्यांच्यासोबत साजरी केलेली दिवाळी लवकर उठून आईसोबत दिवे लावणे, रांगोळी काढणे, आणि बाबा आमच्या आवडत्या दुकानातून छान गोडधोड आणायचे. आम्ही सगळे छान कपडे घालून संध्याकाळी एकत्र फटाके वाजवायचो तो आनंद आणि एकत्र येण्याची भावना अजूनही मनात ताजी आहे. या पालक दिनी मी आमच्या जुन्या कौटुंबिक फोटोपैकी एक पुन्हा निर्माण करायचा प्लॅन करत आहे तीच पोझ, तोच ऊबदारपणा, फक्त या वर्षांमध्ये वाढलेले भरभरून प्रेम त्यात अधिक असेल.

झी टीव्हीच्या 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत राघवची भूमिका साकारणारा भरत अहलावत म्हणाला, माझी आई ही माझ्या आयुष्यातली सर्वात मोठी प्रेरणा आहे. तिने जेव्हा जेव्हा जीवनातल्या गोष्टींना संयम, समतोल आणि प्रेमाने हाताळले, तेव्हा तिने मला अशा अनेक गोष्टी शिकवल्या ज्या कोणत्याही शाळेत शिकवल्या गेल्या नसत्या. मला अजूनही आठवतंय शाळेतून घरी आल्यावर मी माझी बॅग एका कोपऱ्यात फेकायचो आणि तिच्या शेजारी बसायचो, ती मला राजमा-चावल भरवायची. मी टेलिव्हिजन पाहताना दिवसभरात काय काय झालं ते न थांबता बोलायचो आणि ती फक्त हसत हसत शांतपणे ऐकत राहायची. त्या दुपारी खरं सांगायचं तर त्या निव्वळ जादू होत्या. या 'राष्ट्रीय पालक दिना'च्या निमित्ताने मी एवढंच सांगू इच्छितो आपल्या आई-वडिलांसाठी वेळ काढा. आयुष्य कितीही धावपळीचे असो, हे छोटे क्षण महत्त्वाचे असतात. कारण शेवटी त्यांचे अस्तित्व, त्यांचे प्रेम आणि त्यांनी केलेल्या त्यागांचेच खरे मोल असते.

झी टीव्हीच्या 'जमाई नं. १' या मालिकेत रिद्धीची भूमिका साकारणारी सिमरन कौर म्हणाली, आज मी जे काही आहे त्याचे संपूर्ण श्रेय माझ्या आई-वडिलांना - त्यांच्या मूल्यांना, त्यांच्या पाठिंब्याला आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला आहे. मला अजूनही आठवतंय, लहानपणी आईसोबत गेलेली शॉपिंगची ट्रिप्स ती मला ड्रेस निवडायला मदत करायची, वेगवेगळे लुक्स एक्सप्लोर करायला लावायची आणि मला स्वतःला व्यक्त करू द्यायची. ती केवळ फॅशन नव्हती, तर तिचा माझा आत्मविश्वास वाढवण्याचा आणि माझ्यातली सर्जनशीलता फुलवण्याचा एक सुंदर मार्ग होता, ज्यामुळे मी शेवटी अभिनयाकडे वळले. या पालक दिनानिमित्त, मी त्यांना कुठेतरी छोट्याशा ट्रिपवर घेऊन जाण्याचा विचार करतेय फक्त हसण्यासाठी, रिलॅक्स होण्यासाठी आणि नवीन आठवणी निर्माण करण्यासाठी. त्यांच्या प्रेमासारखा दुसरा आशीर्वाद माझ्यासाठी नाही.

झी टीव्हीच्या 'जागृति: एक नयी सुबह' या मालिकेत आकाशची भूमिका साकारणारा सागर पारेख म्हणाला, मी पाटण्याचा आहे, जिथे अभिनय ही पारंपरिक करिअर निवड नव्हती. पण माझ्या १२ वीच्या परीक्षेनंतर माझ्या आई-वडिलांनी मला पूर्णपणे पाठिंबा दिला ना कोणतेही प्रश्न, ना शंका, फक्त विश्वास. त्यांच्या त्या विश्वासामुळे मला मोठे स्वप्न पाहायची हिंमत मिळाली. एक आठवण मला कधीच विसरता येणार नाही उन्हात खेळून घरी आल्यावर आईने दिलेला थंडगार सत्तूचा शरबत, त्या एका ग्लासमध्ये जणू जादू असायची. अजूनही, शूटिंगच्या लांब दिवसांमध्ये मला त्याची चव आठवते. तो केवळ एक पेय नाही, तर प्रेमाची आठवण आहे. या पालक दिनानिमित्त, मला फक्त त्यांच्यासोबत बसून थोडे हसायचे आहे, एकत्र जेवायचे आहे, आणि त्यांना सांगायचे आहे की ते माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहेत.

## सॅमसंग ॲड्स आणि कांतार यांनी केलेल्या संशोधनामधून खरेदी उद्देशाला चालना देण्यामध्ये कनेक्टेड टेलिव्हिजन्सची वाढती भूमिका दिसून येते

**मुंबई, २७ जुलै :** सॅमसंग ॲड्सने कांतारसोबत सहयोगाने बीयॉण्ड अवेअरनेस नावाची उल्लेखनीय श्वेतपत्रिका जारी केली, जिचा महत्त्वपूर्ण ब्रँड केपीआयना चालना देण्यामध्ये कनेक्टेड टीव्ही (सीटीव्ही) जाहिरात परिसंस्थेची भूमिका निदर्शनास आणण्याचा मनसुबा आहे. ओईएम कनेक्टेड टीव्ही कंपनीकडून पहिल्यांदाच अशाप्रकारचे संशोधन करण्यात आले आहे, जे मध्यम-ते-अल्प फनेल मेट्रिक्समधील प्रबळ, डेटा-संचालित माहिती देते, तसेच जाहिरातदारांना कनेक्टेड टीव्ही ब्रँडची अनुकूलता आणि खरेदी उद्देशाला देत असलेल्या चालनेबाबत स्पष्ट पुरावा देते.



या संशोधनामध्ये विविध उद्योग व भौगोलिक क्षेत्रांमध्ये सॅमसंग स्मार्ट टेलिव्हिजन्सवरील मोहिमांसाठी कांतारने केलेल्या १०० हून अधिक ब्रँड लिफ्ट स्टडींचे विश्लेषण करण्यात आले. कांतारकडून स्वतंत्र प्रमाणीकरणासह हे संशोधन कनेक्टेड टीव्हीमध्ये गुंतवणूक करणाऱ्या जाहिरातदारांना अभूतपूर्व स्पष्टता आणि आत्मविश्वास देते. ब्रँड अनुकूलता, संदेश सहयोग, ऑनलाइन जाहिरात जागरूकता आणि खरेदी उद्देश यांसारख्या ब्रँड लिफ्ट मेट्रिक्सचा वापर करून मोहिमांचे मूल्यांकन करण्यात आले, ज्यामुळे वास्तविक ग्राहक वर्तनावर प्रभाव पाडण्यात कनेक्टेड टीव्हीची क्षमता दिसून आली.

आपले मत व्यक्त करत सॅमसंग ॲड्स इंडियाच्या इनसाइट्स अँड क्लायण्ट सोल्यूशन्सच्या प्रमुख भावना सैंचर म्हणाल्या, 'बीयॉण्ड अवेअरनेस' संशोधन जागरूकता आणि विचारशीलतेला चालना देण्यासाठी महत्त्वाचे टचपॉइण्ट म्हणून कनेक्टेड टेलिव्हिजन्सच्या वाढत्या महत्त्वावर भर देते, तसेच दृश्यमानता वाढवते आणि मोठ्या स्क्रिन्सवर प्रेक्षकांशी संलग्न होणाऱ्या ब्रँड्ससाठी सकारात्मक निष्पत्ती देते. मला विश्वास आहे की, जनरेशन झेडचा उच्च सहभाग डिजिटल-प्रेमी, स्वावलंबीपणे निर्णय घेणाऱ्या प्रेक्षकांसह प्रभाव घडवून आणण्यास उत्सुक असलेल्या ब्रँड्ससाठी मोठी संधी आहे.

'कांतारच्या इनसाइट्स डिव्हिजनचे उपाध्यक्ष एबू इसाक म्हणाले,' कनेक्टेड टीव्ही संपूर्ण फनेल मार्केटिंग चॅनेलमध्ये बदलत असताना हे संशोधन त्याच्या धोरणात्मक मूल्याचे, विशेषतः तरुण प्रेक्षकांमध्ये अनुकूलता आणि खरेदीचा हेतू वाढवण्याचे आकर्षक पुरावे सादर करते. जाहिरातदार जनरेशन झेडशी अर्थपूर्ण संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत असताना कनेक्टेड टीव्ही महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून उदयास येत आहे, जे अचूकता, प्रमाण आणि मोजता येण्याजोगा प्रभाव देते.''

## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही प्रकारचा वाद टाळा. तुमच्या भावनांना योग्य दिशा द्या. कामाच्या ठिकाणी संयमाने काम करणे फायदेशीर ठरेल. व्यवसायातील अडथळे कमी होतील. राग टाळा.

**वृषभ :** आज नवीन व्यवसाय सुरू करणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. तुमच्या नोकरीत तुम्हाला हवे असलेले काम करायला मिळेल. वरिष्ठ अधिकाजयांशी जवळीक वाढेल.

**मिथुन :** व्यवसायात नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने नफा होईल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना पगार पॅकेजमध्ये वाढ होण्याची चांगली बातमी मिळेल.

**कर्क :** कामाच्या बाबतीत घाईघाईत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. व्यवसायात नवीन स्रोत उघडतील. नोकरीत बढतीची शक्यता असेल. प्रिय व्यक्तीमुळे सामान्य आदर आणि प्रतिष्ठा वाढेल.

**सिंह :** भागीदारीच्या कामात जास्त काळजी घेण्याची गरज असेल. व्यवसायाच्या बाबतीत अचानक नफा मिळण्याची शक्यता आहे. कला आणि अभिनय क्षेत्रात तुम्हाला मोठे यश आणि आदर मिळेल.

**कन्या :** न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल.व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल. दूरच्या देशात सहलीला जाण्याची शक्यता असेल.

**तूळ :** आज, तुमचं महत्वाचं काम पूर्ण होईपर्यंत कोणालाही सांगू नका. अन्यथा, काम बिघडू शकतं. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. कठोर परिश्रम करून परिस्थिती सुधारेल.

**वृश्चिक :** आज तुमच्या महत्त्वाच्या कामांबद्दल तुमच्या विरोधकांना सांगू नका. तुमच्या योजना गुप्तपणे पूर्ण करा. विरोधक त्यात अडथळे निर्माण करतील. कामाच्या ठिकाणी सहकाजयांशी समन्वय साधा.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा आणि प्रगतीचा असेल. तुमचे प्रलंबित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. विरोधकांशी व्यवहार करताना काळजी घ्या.

**मकर :** आज तुम्हाला तुमच्या कामात काही महत्त्वाचे यश मिळेल. प्रत्येक परिस्थितीत तुमच्या कामाबद्दल गंभीर रहा. प्रलंबित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. संयम ठेवा. व्यवसायात नवीन भागीदार मिळतील.

**कुंभ :** तुमच्या समस्या जास्त वाढू देऊ नका. त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी संघर्ष वाढू शकतो. शहाणपणाने काम करा. उगाच वाद घालू नका.

**मीन :** तुमचे मन कामात व्यस्त ठेवण्याचा प्रयत्न करा. मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. राजकारणातील तुमचे विरोधक सक्रिय होऊ शकतात. व्यवसायात नवीन भागीदार तुमची फसवणूक करू शकतात.

## शब्दकोडे क्रमांक २१७६



**आडवे शब्द :-**
१) देवकीचा पुत्र, श्रीकृष्ण
५) रक्तवाहिवानी, धमनी
८) थोडेसे नुकसान किंवा दुखापत फुगवून सांगणे
१०) बाण
११) फिकीर
१२) युद्धातील एक घोषणा
१५) सुसर
१८) सारखा
२०) सापाची एक जात
२१) हाणामारी
२२) आवाजांचा गोंधळ
२३) विचार, सल्ला, चर्चा
२५) मत देणारा
२७) दारूचा एक प्रकार
२८) बारीक केस
३०) साखरेचा रस
३१) शिखराचे टोक
३२) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
३३) मजबूत
३५) रव्याचा एक गोड पदार्थ
३६) एक शस्त्र
३८) पाठविलेला
४०) निकट
४२) रसाने भरलेले
४६) तहाचे कागद
५०) पैसा, ममता
५१) एक मिश्र धातू
५३) करारातील दोन शब्द
५५) पूर्वेकडील एक राज्य
५७) नेत्र
५८) त्वरीत
६०) कसाबसा
६१) दहाचा समूह
६२) अभिनेता
६३) टाळता न येणारे
६४) वाहून नेण्याची क्रिया
६५) विद्या
६७) दया, करुणा
६८) भगर
६९) श्रीमंत दैववान
७१) आसक्त होनारा
७३) लाकूड कापण्याचे हत्यार
७५) अवस्था
७७) सापाने टाकलेली त्वचा
७८) खस
७९) लहानथोर
८०) वेगाने चालणे

**उभे शब्द :-**
१) राष्ट्र
२) शरमणे
३) मग, मागाहून
४) एक श्वासरोग
५) नरसिंह
६) च्या बरोबर
७) यज्ञ
८) डोळ्यात पाणी आणणारा कंद (अ व)
९) सुनील ***** एक थोर क्रिकेटपटू
१३) रक्त सांडणे
१४) सोनेरी शाई
१६) उष्ण
१७) वर वधूची मिरवणूक
१९) ढाक्याचे प्रसिद्ध कापड
२०) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२१) धनी
२४) समतल
२५) चामखीळ
२६) वैरी
२९) दावानल
३१) भयंकर
३४) कापडी भिंत
३७) नवी, न वापरलेली
३९) साडीचा काठ
४१) ताठा, अहंकार
४३) ऐक्य, पूर्ण भरतीची वेळ
४४) भयंकर
४५) तृषित
४७) उपस्थित
४८) मातीचा वास येऊ लागलेला
४९) व्रत
५२) स्तोत्र
५४) रसवान
५५) संगीतातील एक राग
५६) श्रीकृष्णाचे एक नाव
५९) बडबड, वटवट
६३) दुर्दशा, दुश्चिन्ह तेजोहीनता
६५) हात
६८) भारताच्या दक्षिणेकडील राष्ट्र
७०) दिवस
७२) विश्वास, अब्रू
७४) व्रत
७५) मगज
७६) होडी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ‘अक्षय ऊर्जा अभियांत्रिकी’ विषयी पुस्तकाचे
## कुलगुरू डॉ.शरद गडाख यांच्या हस्ते विमोचन



**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** कृषि विद्यापीठातर्गत शैक्षणिक, संशोधनपर कार्यासह विस्तार शिक्षण आणि बिजोत्पादनाचे उद्दिष्टांवर सेवारत विदर्भातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. आजवर सुमारे दीड लाखाहून अधिक कृषि पदवी-पदविका धारक निर्माण करीत तब्बल १९७ पीक वाण, १७२० विविध पीक तंत्रज्ञान शिफारशीसह ६४ शेतीपयोगी यंत्र-अवजारे संशोधित करीत शाश्वत शेती संपन्न शेतकरी संकल्पना कृतीत येण्यासाठी आपले सर्वोत्तम योगदान समर्पित केले आहे. दरम्यान कृषिचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना कृतियुक्त शिक्षण देण्याकडे विद्यापीठाचा भर आहे. याचं उपक्रमात कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयास नुकतीच भेट दिली व महाविद्यालयाचे शैक्षणिक व संशोधनपर कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी कृषी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय तसेच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयासमोरील परिसरात मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे यांचे सह सर्व विभाग प्रमुखांचे शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण संपन्न झाल्यानंतर महाविद्यालयातील सुरु असलेले उपक्रम, संशोधन तसेच शैक्षणिक कार्यक्रम आदींचा आढावा बैठकीत घेण्यात आला. सभेच्या सुरुवातीला अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी माननीय कुलगुरू डॉ.शरद गडाख यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले त्यानंतर विभाग प्रमुख डॉ. सूचित गुप्ता यांनी अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. माननीय कुलगुरू डॉ.गडाख यांनी म हाविद्यालयातील विविध कार्यक्रम, संशोधन, नाविन्यपूर्ण उपक्रम, शैक्षणिक सोयीसुविधा या सर्व गोष्टींचा आढावा घेतला. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी पावर पॉईट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून सखोल माहिती सादर केली.

# ग्रामीण भागात शेत रस्त्यांची स्थिती बिकट



**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये,विशेषतः ग्रामीण भागात, शेतातजाणासाठी वापरण्यात येणाऱ्या शेत रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.. अशाच एका शेत रस्त्याची बिकट अवस्था दाखवणारा व्हिडिओ समोर आला आहे.. पावसामुळे रस्त्यांवर मोठा चिखल झाल आहे.. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात ये-जा करणे तसेच ट्रॅक्टर वाहन बाहेर काढणे खूप कठीण झाले आहे. अकोला जिल्ह्यातील तामसी बटवाडी शेत रस्त्यावरील ही दयनीय अवस्था आपल्याला पाहायला मिळेल.

अनेक शेतकऱ्यांचे या रस्त्यावर ट्रॅक्टर चिखलामूळे फसत आहे.तर काही ट्रॅक्टर अजूनही तिथेच उभे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता पावसात शेती करणे कठीण झाले. या समस्याकडे जिल्हा प्रशासनाने दखल द्यावी, अशी मागणी आता शेतकरी करत आहेत. पावसाळ्यापूर्वी ही कामे केली जावी अशी मागणी वारंवार केली गेली परंतु त्याकडे दुर्लक्ष झाले असा आरोप केला जात आहे.

# काटेपूर्णा ४२ टक्क्यांवर, निर्गुणा शंभरी पार !

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून दमदार पावसाने विश्रांती घेतली असतानाच पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार, प्रमुख जलस्रोतांच्या पातळीत समाधानकारक वाढ झालेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. २६ जुलै रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत नोंदविलेल्या स्थितीनुसार, काटेपूर्णा प्रकल्प ३४३.६० मी. पातळीवर असून, साठा फक्त ४२.२० टक्के आहे. तर शनिवारी ५ मिमी पावसाची नोंद झाली.वान प्रकल्प (ता. तेल्हारा ) मध्ये पाणी साठा केवळ ३५.७२% असून शनिवारी १५ मिमी पाऊस झाल्याची नोंद आहे. मोर्णा प्रकल्प (ता. पातूर) मात्र ६८.४१ टक्क्यांवर पोहोचला असून, ६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे निर्गुणा प्रकल्प (ता. पातूर) १००% क्षमतेने भरला असून सांडव्यातून ०.९०६ क्यूसेक्स विसर्ग सुरू आहे; मात्र येथे एकही मिमी पावसाची नोंद नाही. उमा प्रकल्प (ता. मूर्ती) केवळ १७.८५% भरलेला असून, आज १० मिमी पाऊस झाला. त्याठिकाणी कोणताही विसर्ग सुरू नाही. दगडपारवा प्रकल्प फक्त २८.३६% भरलेला असून, पातळी ३१४.८५ मीटर आहे. कोणतेही गेट उघडण्यात आलेले नाही. जिल्ह्याच्या काही भागांत हलकासा पाऊस झालेला असला तरी एकंदरित जलसाठ्यांची स्थिती संमिश्र आहे. निर्गुणा प्रकल्प पूर्ण भरलेला असला तरी काटेपूर्णा, वान, उमा, दगडपारवा प्रकल्प अद्यापही कमी क्षमतेवर आहेत, त्यामुळे शेतीसाठी आवश्यक पाणीपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# कारगिल विजय दिनानिमित्त अकोल्यात अश्रूंनी ओथंबलेला सन्मान सोहळा

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** कारगिल युद्धातील बलिदानी जवानांच्या स्मरणार्थ, अकोल्यात झालेला कारगिल विजय दिन साजरा करताना शहिदांच्या त्यागास अकोलावासीयांनी अश्रूंनी ओथंबलेली मानवंदना अर्पण केली. देशभक्त आजी-माजी सैनिक सेवाभावी संस्था अकोला आणि तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा स्मारक येथे झालेल्या श्रद्धांजली सोहळ्याला जिल्हाधिकारी अजित कुंभार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कारगिल युद्धात शहीद झालेल्या ५२७ जवानांसह अकोल्यातील



सर्व वीर शहिदांना मानाचा मुजरा करत, उपस्थितांनी सामूहिकरित्या श्रद्धांजली अर्पण केली देशभक्त आजी-माजी सैनिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ मनोहर गोकुळ चव्हाण,सुभेदार अर्जुन बुधनेर, मेजर दीपक गाडगे, शहीद पुत्र दीपक पातोंड,ऍड. संजय सेंगर, आणि विष्णुदास मोंडोकार व सर्व आजी-माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत हुतात्मा स्मारक येथून, भर पावसात वीर जवानांच्या सन्मानार्थ सैनिकांच्या मोटरसायकल रॅलीला ई सी एच एस अधिकारी कर्नल शर्मा , यांनी हिरवा झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात केली. ही रॅली आळंदा येथे पोहोचल्यावर जिल्ह्यातील शहीद कुटुंबीयांचा - वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी, वीरपुत्र अशा सर्वांचा सन्मान करण्यात आला. या भावनिक सोहळ्याला प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे, ऍड. संजय सेंगर,डॉ. मनोहर चव्हाण, सुभेदार मेजर अर्जुन बुधनेर, शहीदपुत्र दीपक पतोंड, आणि सरपंच कोमल दीपक पतोंड , व जिल्ह्यातील सर्व आजी-माजी सैनिक व सैनिक परिवार यांची उपस्थिती लाभली.

# अकोट-पूर्णा रेल्वे विभागात तिकीट तपासणी मोहीम
## प्रवाशांकडून ७४ हाजारांचा दंड वसूल

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** २५ आणि २६ जुलै रोजी दक्षिण मध्य रेल्वेच्या अकोट पूर्णा रेल्वे विभागातील सर्व प्रवासी गाड्यांमध्ये संयुक्त तिकीट तपासणी आली. मोहीम मोहीम राबविण्यात अकोला नांदेड डिविजनचे - सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक एन. सुब्बाराव यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला फ्लाइंग स्कॉडचे प्रभारी मुख्य तिकीट निरीक्षक संदीप दुबे यांनी अकोला आणि पूर्णा दरम्यान धावणाऱ्या सर्व प्रवासी गाड्यांमध्ये तिकीट तपासणी मोहीम राबविली. तसेच २६ जुलै रोजी अकोला ते अकोट धावणाऱ्या डेमू पॅसेंजर ट्रेनमध्येही तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. सर्व प्रवासी आणि एक्सप्रेस गाड्यांमध्ये तिकीट नसलेल्या आणि अनधिकृत पद्धतीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दंड ठोठावण्यात आला.ही मोहीम प्रामुख्याने अकोला ते



वाशिम, हिंगोली स्थानकावरून जाणाऱ्या सर्व गाड्यांमध्ये राबविण्यात आली.ज्यामध्ये प्रवाशांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांना यूटीएस मोबाईल ॲपवरून तिकिटे बुक करण्याबाबत माहिती देण्यात आली. ही मोहीम सकाळी ६ वाजल्यापासून राबविण्यात आली. ज्यामध्ये इंटरसिटी एक्स्प्रेस, हमसफर एक्सप्रेस, भगत की कोठी एक्सप्रेस यांचा समावेश आहे. ९३ प्रवाशांकडून एकूण ६३६१५/- रुपये दंड वसूल करण्यात आला. आणि अकोला अकोट पैसेंजरमध्ये १४३ तिकीट नसलेल्या प्रवाशांकडून एकूण १११२० रुपये दंड वसूल करण्यात आला. नांदेड विभागाचे स. वाणिज्य प्रबंधक एन. सुब्बाराव आणि अकोल्याचे मुख्य तिकीट निरीक्षक संदीप दुबे यांच्यासह प्रशांत बुचुंडे, गजानन पहुरकर, अनिल चतुरकर, आणि व्यावसायिक निरीक्षक आशुतोष मिश्रा, कमल नयन आणि आरपीएफ दिव्या यांनी मोहिमेत भाग घेतला. या मोहिमेचा मुख्य उद्देश तिकीट नसलेला प्रवास कमी करणे आणि लोकांना तिकीट खरेदी करण्यास प्रोत्साहित करण्याची गरज अधोरेखित करणे हा होता.

## लाखपुरीच्या तिर्थक्षेत्र लक्षेश्वर संस्थान मध्ये वृक्षारोपणाचा अभिनव उपक्रम
# सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी वृक्षारोप

**▪लाखपुरी,दि २७ (प्रतिनिधी) :** मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी येथे वृक्षारोपनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्वप्रथम लक्षेश्वर संस्थान येथे लक्षेश्वर महाराजाचे दर्शन घेऊन वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली .यावेळी शाखा व्यवस्थापक किशोर पंडितकर यांनी वृक्षारोपणाचे महत्व सागितले त्यामध्ये हवा लवकर शुद्ध होते, वातावरणातील प्रदूषण कमी होते , एक झाड प्रत्येकांनी लावावे, व बैकिंग बद्दल विविध माहीती नागरिकांना सागितली. यावेळी ग्रुप लोन डिपार्टमेंट चे गौरव राठोड, उमेश जामनिक, संदीप उके, आकाश गुजर, नितीन लांडे, योगेश मडावी,अक्षय चिकणे, विशाल वकोडे ,आरती निमकर, रिंकू भटकर, मनीषा काकोडे , अश्विनी तायडे , दीप्ती महल्ले ,



अमोल उके , सनी सुखसोहळे सह पत्रकार अतुल नवघरे , आकाश जामनिक , गजानन गवई,फिलीप जामनिक , सह अक्षय अवघड, गौरव दहापुते ,पवन चव्हाण,जानराव श्रीनाथ, शुभम उघडे सह लक्षेश्वर संस्थांची सेवाधारी सह ग्रामस्थ उपस्थित होते. वृक्षारोपण करताना मान्यवरांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला. संचालन रिंकू भटकर यांनी केले व लक्षेश्वर संस्थान मध्ये कार्यक्रम घेण्याची परवानगी दिली.

# स्वातंत्र्यवीर चंद्रशेखर आजाद व लोकमान्य टिळक जयंती साजरी

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** राष्ट्रवादी कांग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महानगर कार्यालय येथे स्वातंत्र्यवीर चंद्रशेखर आजाद व लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम स्वातंत्र्यवीर चंद्रशेखर आजाद व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला हारअर्पण करण्यात आले व विनम्र अभिवादन करण्यात आले.जयंती कार्यक्रम महानगर उपाध्यक्ष पापाचंद्र पवार यांच्या अध्यक्षते खाली येथे



मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी कांग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे महानगर अध्यक्ष मो.रफिक सिद्धिकी,पश्चिम विधानसभा अध्यक्ष मेहमुद खान पठाण , महानगर कार्याध्यक्ष देवाभाऊ ताले,पूर्व ब्लॉक अध्यक्ष काशिनाथ बागडे, उत्तर ब्लॉक अध्यक्ष रमेश नाईक, माजी महानगर संघटक सचिव शेख रम जान,भाऊराव साबळे,शाहीद सिद्धिकी,सोहील खतीब यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे महानगर प्रसिद्धीप्रमुख अमन घरडे यांनी कळिवले आहे.

# भोपळे विद्यालयात केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न



**▪तेल्हारा,दि २७ (प्रतिनिधी) :** तालुक्यातील हिवरखेड व खंडाळा केंद्राच्या शिक्षण परिषदेचे सहदेवराव भोपळे विद्यालय,हिवरखेड येथे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या फोटोंचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच कारगिल शौर्य दिनानिमित्त वीर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तेल्हारा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुनीता तळोकार यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या या परिषदेच्या अध्यक्षस्थानी भोपळे विद्यालयाचे प्राचार्य संतोषकुमार राऊत, प्रमुख मार्गदर्शक तेल्हारा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी रवींद्र चोथमल, प्रमुख उपस्थितीत महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या संचालिका सौ.साधनाताई भोपळे, उच्चश्रेणी मुख्याध्यापक प्रमोद पोके हे होते.या परिषदेच्या प्रास्ताविकात केंद्रप्रमुख गजानन राऊत यांनी परिषदेतील विषयावर विवेचन केले.

# साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीच्या आयोजना संदर्भात

**पातूर :** साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या आयोजना संदर्भात पातुर येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीचे आयोजन



लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष लहूश्री विष्णूभाऊ कसबे यांच्या मार्गदर्शनामध्ये तसेच लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश अध्यक्ष लहूश्री कैलासदादा खंडारे यांच्या मार्गदर्शनात येणाऱ्या साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १६ ऑगस्टला भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. सोबतच विविध सामाजिक उपक्रमाचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने ही आढावा बैठक घेण्यात आली होती. ही आढावा बैठक लहुजी शक्ती सेनेचे पश्चिम विदर्भ महासचिव विष्णूभाऊ शेलारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

# प्रभातमध्ये सीबीएसई शिक्षकांची संशोधन पेपर्स स्पर्धा संपन्न

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** सीबीएसई संलग्न शाळांमधील शिक्षकांसाठी पुण्याच्या सीबीएसई सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या वतीने प्रभात किड्स स्कूलने आयोजित जिल्हास्तरीय ‘स्टेम’ (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग, आर्टसब आणि गणित) कार्यशाळा शिक्षकांना शैक्षणिक संशोधनात सशक्त करणारी व नवोन्मेषाला प्रेरणा देणारी आहे’ असे विचार या कार्यशाळेसाठी प्रमुख परीक्षक म्हणून उपस्थित असलेले श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला येथील शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. नितीन मोहोड यांनी व्यक्त केले.‘स्टेम’ शिक्षणावर सीबीएसई संलग्न शाळेतील शिक्षकांनी सादर केलेले संशोधन खरोखरच प्रशंसनीय आहे, यामुळे या कार्यशाळेची गुणवत्ता आणि गुणवत्ता विकास हा दृष्टीकोन अधोरेखित होतो, असे ते पुढे म्हणाले.या प्रसंगी प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक डॉ. गजानन




नारे, संचालिका सौ. वंदना नारे, प्राचार्या सौ. वृषाली वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना प्राचार्या सौ. वृषाली वाघमारे म्हणाल्या की, ‘ही ‘स्टेम कार्यशाळा अकोला जिल्हास्तरीय शैक्षणिक समुदाय संशोधनासंदर्भात विकसित करणे, ‘स्टेम’ शिक्षणपध्दतींचा प्रसार करणे आणि नवोपक्रमशीलतेला चालना देणे हा होय’.या कार्यशाळेत जिल्ह्यातील सात सीबीएसई शाळांमधील शिक्षकांनी सहभाग नोंदवून ‘स्टेम’ शिक्षणाअंतर्गत गुणवत्तापूर्ण संशोधन पेपर सादर केले. त्यामध्ये मंदार जोशी (आर. डी.जी. पब्लिक स्कूल, अकोला); शिरीन कुरेशी व सौ. अनघा लोथे (स्कूल ऑफ स्कॉलर्स, कौलखेड, अकोला); राकेश कुलकर्णी (कोठारी कॉन्व्हेंट, अकोला); सौ. मिता इंगळे (प्रभात किड्स स्कूल, अकोला) आणि सिया जसवाणी.

# जिल्हा अन्न पुरवठा अधिकाऱ्यांकडे तक्रार !

**बाळापूर :** स्वत धान्य दुकानामध्ये मिळत असलेल्या धान्यामधील गहू, तांदूळ घेऊन राशनधारक आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी महिनाभर लावून ठेवतात; परंतु राशन दुकानाच्या आवारातच ठान मांडून त्या गरीब जनतेकडून कमी मोबदल्यात विकत घेऊन त्यांना फसवत असल्याची तक्रार वाडेगाव सोफी चौक येथील मो. साजिद गुलाम खाजा यांनी तक्रार जिल्हा अन्न पुरवठा अधिकाऱ्याकडे केली. हे राशन माफिया जनतेकडून राशनचा गहू, तांदूळ गोळा करून आठवड्यातील ठराविक दिवशी आपल्या स्वतःच्या पिकअप किंवा आयशरमध्ये भरून ते राशन घेऊन जातात.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन

**▪पातूर,दि २७ (प्रतिनिधी) :** उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेसचे प्रदेश सचिव मोहम्मद फरहान अमीन यांच्या संकल्पनेतून ‘मोफत आरोग्य तपासणी अभियान‘ राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत एड्यूव्हिला पब्लिक स्कूल, पातूर येथे एक दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारच्या वैद्यकीय तपासण्या आणि आरोग्य विषयक सल्ला देण्यात आला. शिबिराला पालक, शिक्षक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या उपक्रमात डॉ. वंदनाताई जगन्नाथ ढोणे ग्रामीण आयुर्वेदिक महाविद्यालय, पातूर यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांच्या टीमने मोलाची वैद्यकीय सेवा आणि व्यवस्थापनात सहभाग नोंदवला.

शिबिर प्रसंगी राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेसचे प्रदेश सचिव फरहान अमीन, महाविद्यालयाच्या संचालिका



विद्या निलेश गाडगे, डॉ. अब्दुल वसीम, सय्यद फैजान, अविनाश पोहरे, मोहम्मद कैसर, आवेज आदी मान्यवर उपस्थित होते.हा उपक्रम सामाजिक आरोग्यविषयक जनजागृतीसाठी एक स्तुत्य पाऊल ठरले असून, भविष्यात अशा उपक्रमांचे अधिक प्रमाणात आयोजन करण्यात येईल, अशी माहिती आयोजकांनी दिली.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९६००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४६९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# एक फोन आला आणि...

जयपूरमधील पंचतारांकित हॉटेलमध्ये लग्नाची जोरदार तयारी सुरू होती. बँडच्या तालावर वऱ्हाडी नाचत होते. पंडीत लग्नाचे मंत्र म्हणत होते. वधू वर सप्तपदीसाठी आले अन् तेवढ्यात वराला फोन आला. त्यानंतर वधूला मंडपातच सोडून वराने धूम ठोकली.

गेल्या अनेक दिवसांपासून अंमलबजावणी संचालनालय (ईडी) वराच्या शोधात होते. प्रसिद्ध महादेव बेटिंग ॲप प्रकरणातील सौरभ आहुजा म्हणजेच हा वर होता. 'ईडी'ला आरोपी सौरभ गुप्तपणे लग्न करत असल्याचे कळले होते. ही माहिती मिळतातच त्याला पकडण्यासाठी 'ईडी'ने योजना आखली. लग्नाच्या दिवशी छापा टाकून सौरभ आहुजाला पकडण्याचे ठरले.' ईडी'ला लग्नाच्या विधींनंतर सौरभ आहुजाला पकडायचे होते. पण सौरभला 'ईडी'च्या योजनेबद्दल कळले. 'ईडी'च्या तावडीत सापडण्यापूर्वी सौरभ मध्येच मंडपातून वधूला सोडून पळून गेला.

लग्नाच्या विधींपूर्वी सौरभ पळून गेल्याने त्याची वधू आणि इतर पाहुणे आश्चर्यचकित झाले. त्यांना नेमके काय घडले याबद्दल काही समजत नव्हते; पण 'ईडी'ने लग्नाला आलेल्या त्याच प्रकरणातील आरोपी प्रणवेंद्रसह तीन जणांना पकडताच सर्वांना या प्रकरणाची माहिती समजली आणि सौरभबद्दल सगळे सत्य समोर आले. नंतर 'ईडी' अधिकाऱ्यांनी वधूचीही चौकशी केली; पण त्यांच्या हाती काही लागले नाही. एवढेच नाही तर 'ईडी'ने वधू आणि वर दोघांच्याही कुटुंबांकडून माहिती गोळा केली असून ते सौरभच्या शोधात आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या महादेव बेटिंग ॲपद्वारे कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर व्यवहारासंदर्भात रायपूर अंमलबजावणी संचालनालयाचे पथक जयपूरला पोहोचले होते. तिथे त्यांनी आरोपी सौरभ आहुजा याला पकडण्यासाठी छापा टाकला; पण 'ईडी' अधिकाऱ्यांना चुकवून आरोपीने मंडपातून पळ काढला. भोपाळचा रहिवासी असलेल्या आरोपी सौरभ आहुजाच्या कुटुंबाने रायपूरमधील मुख्य आरोपीच्या दुबईतील लग्नाच्या पार्टीसाठी विमान बुक करण्यात भूमिका बजावली. त्यानंतर रायपूर 'ईडी'ची टीम सौरभ आहुजाच्या मागे लागली. पण 'ईडी'ला सौरभ स्वतःच्या लग्नासाठी जयपूरला पोहोचला असल्याची माहिती मिळाली तेव्हा 'ईडी'चे अधिकारीही त्याच्या मागे लागले. यानंतर 'ईडी'चे अधिकारी पूर्ण तयारीने आहुजा कुटुंब जिथे राहत असलेल्या हॉटेलमध्ये पोहोचले. तरीही सौरभने 'ईडी' अधिकाऱ्यांना चकवा दिला. पण 'ईडी'ने इतर तीन आरोपींना अटक केली असून त्यांना विमानाने रायपूरला नेले आहे.

## कॅलिडोस्कोप

# आधी मारले, मग जावई बनवले !

मध्यरात्रीची वेळ होती. एका तरुणाने चोरून घरात प्रवेश केला. अचानक दिवे लागले आणि घरातील लोक जागे झाले. त्या तरुणाला पाहताच त्यांनी 'चोर-चोर' असे ओरडून त्याला मारहाण केली. तो तरुण म्हणू लागला, 'एकदा माझे ऐका.' मग त्याने स्वतःबद्दल असे काही सांगितले, की दुसऱ्या दिवशी सकाळी कुटुंबाने त्याला त्यांचा जावई बनवले. आता या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.

ही घटना उत्तर प्रदेशातील जौनपूर येथील आहे. खरे तर ज्या घरात तो तरुण शिरला होता तिथे त्याची मैत्रीण राहत होती. तो मध्यरात्री त्याच्या प्रेयसीला भेटण्यासाठी पोहोचला होता. पण नशीब वाईट होते. प्रेयसीच्या कुटुंबाने त्याला चोर समजून मारहाण केली. नंतर मुलाने खरे सांगितले तेव्हा दुसऱ्या दिवशी कुटुंबाने त्याचे लग्न त्यांच्या मुलीशी लावून दिले. ही विचित्र घटना जसरापाटन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील करीमपूर खुर्द गावातील आहे. पनौली गावात राहणारा विकास पासवान प्रेयसी रुबीच्या घरात तिला भेटण्यासाठी गुप्तपणे शिरला. रात्रीच्या अंधारात त्याला कोणीतरी पाहिले, चोर समजून आरडाओरडा केला. घरातील लोकही जागे झाले. त्यानंतर सर्वांनी मिळून विकासला पकडले आणि मारहाण केली.



पकडल्यानंतर तरुणाची चौकशी केली असता तो विकास पासवान असल्याचे समजले. तरुणाने आपण चोर नसून रुबीला भेटायला आल्याचे संगीतले. रुबीने तो आपला प्रियकर असल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे लग्न झाले. आता या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.



# गर्लफ्रेंड चक्क भाड्याने!

आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात जगदेखील झपाट्याने बदलत आहे. आजच्या डिजिटल युगात नात्यांची व्याख्यादेखील बदलू लागली आहे. काही देशांमध्ये गर्लफ्रेंड भाड्याने मिळते. एवढेच नाही, तर यासाठी अनेक देशांमध्ये ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सदेखील आहे. त्यावर काही प्रक्रिया पूर्ण करून भाड्याने गर्लफ्रेंड मिळवू शकता. यामागचे कारणदेखील हैराण करणारे आहे.

भाड्याने गर्लफ्रेंड ही संकल्पना जपानमधून सुरू झाली; पण आज चीन, दक्षिण कोरिया आणि थायलंडसारख्या आशियाई देशांमध्ये भाड्याने गर्लफ्रेंड ही संकल्पना खूप प्रसिद्ध आणि सामान्य झाली आहे. या देशांमध्ये, तुम्ही वेगवेगळ्या ॲप्सद्वारे तुमच्या आवडीनुसार काही काळासाठी भाड्याने गर्लफ्रेंड बुक करू शकता. या गर्लफ्रेंड पूर्णपणे प्रोफेशनल असतात. सुरुवातीला ही सेवा जपानमधील काही कंपन्यांनी सुरू केली होती. या कंपन्या ग्राहकांसोबत वेळ घालवणाऱ्या प्रोफेशनल मुलींना प्रशिक्षण देतात. यामध्ये फक्त सामाजिक संवादाची सुविधा दिली जाते. म्हणजे गर्लफ्रेंड ग्राहकासोबत डिनर डेट, कौटुंबिक कार्यक्रम, सिनेमा पाहणे, शॉपिंग करणे फिरायला जाणे किंवा फक्त गप्पांपर्यंत मर्यादित होत्या.

ग्राहक थेट ॲपवर जाऊन या मुलींचे फोटो, आवडी-निवडी, सवयी आणि भाषेच्या आधारे स्वतःसाठी टेंपरेरी गर्लफ्रेंड निवडू शकतात. यानंतर, एक वेळ बुक केली जाते आणि मुलगी त्या निश्चित वेळी क्लायंटला भेटते. मुलीचा अनुभव आणि तुम्ही कोणत्या उद्देशाने गर्लफ्रेंड बुक करत आहात, हे लक्षात घेऊन भाडे ठरवले जाते. मिळालेल्या माहितीनुसार, भाड्याच्या गर्लफ्रेंडसाठी एका तासासाठी ग्राहकाला चार हजार येन म्हणजे दोन हजार ५०९ रुपये मोजावे लागतात, तर क्लायंटला प्रवास, चित्रपट तिकिटे, जेवण आणि पेये यासारख्या सुविधांच्या खर्चासाठी वेगळे पैसे द्यावे लागतात.

जपान आणि चीनसारख्या देशांमधील लोक एकाकीपणा, ब्रेकअप किंवा तणावाच्या वेळी स्वतःला बरे वाटण्यासाठी या सेवेचा वापर करतात, तर काही व्यक्ती कुटुंब आणि नातेवाइकांच्या दबावामुळे असे करतात. लग्नापासून दूर पळण्यासाठीदेखील भाड्याच्या गर्लफ्रेंडचा पर्याय स्वीकारला जातो. गर्लफ्रेंला भाड्याने घेण्याची ही पद्धत योग्य आहे की नाही यावर लोकांची वेगवेगळी मते असू शकतात.

# रोबो बोलतो १०० भाषा

सध्याचा जमाना रोबोंचा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले बरेच रोबो लक्षवेधी ठरत आहेत. 'सोफिया' नावाच्या रोबोला सौदी अरेबियाने नागरिकत्त्व बहाल केलं आहे. असे अनेक रोबो चर्चेचा विषय ठरत असतात. इराणमधल्या तेहरान विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी असाच एक अनोखा रोबो तयार केला आहे. 'सुरेना' असं या रोबोचं नाव आहे. 'सुरेना'चं वजन ७० किलो तर उंची १७० सेंटीमीटर आहे. 'सुरेना'ला एक, दोन नाही तर १०० भाषा ज्ञात आहेत. म्हणजेच हा रोबो १०० भाषांमध्ये लोकांशी संवाद साधू शकतो. इतकंच नाही, तर तो १०० प्रकारच्या वस्तू ओळखू शकतो. त्याला माणसाचे चेहरेही ओळखता येतात. 'सुरेना' या भाषांचा अनुवादही करू शकतो. 'सुरेना' फुटबॉलही खेळू शकतो. तो बॉलला किकही मारू शकतो. या विद्यापीठातल्या इंजिनिअरींग विभागाने चार वर्षांच्या मेहनतीने हा रोबो तयार केला आहे. हा रोबो हस्तांदोलनही करू शकतो. 'सुरेना' एका तासात ७०० मीटर चालू शकतो.





# वीजनिर्मिती करणारा मासा

या जगात विविध प्रजातींचे जीव-जंतू आहेत. प्रत्येकाचं काही ना काही वैशिष्ट्य आहे, काही ना काही गुणधर्म आहेत. कोणी जलद धावतं, कोणी उलटं उडू शकतं तर कोणी रात्रीच्या अंधारातही बघू शकतं. मात्र एका माशाचं वैशिष्ट्य ऐकून कोणीही चाट पडेल! हा मासा विजेची निर्मिती करतो. अमेरिकेतल्या टेनेस्सी राज्यातल्या चट्टानूगा मत्स्यालयात हा मासा ठेवण्यात आला आहे.

या माशापासून तयार होणाऱ्या विजेमुळे मत्स्यालयातलं ख्रिसमस ट्रीही उजळतं. इलेक्ट्रिक ईल असं या माशाचं नाव आहे. सध्या हा मासा सोशल मीडियावर बराच लोकप्रिय ठरला आहे. ख्रिसमसच्या निमित्ताने या मत्स्यालयात एक ख्रिसमस ट्री ठेवण्यात आलं आहे. त्यावर रोषणाई करण्यात आली आहे. इलेक्ट्रिक ईलच्या शरीरातल्या ऊर्जेमुळे या ट्रीवर लावण्यात आलेल्या इलेक्ट्रिकच्या माळा प्रकाशित होतात. या मत्स्यालयात सेन्सर बसवण्यात आले आहेत.

या सेन्सर्सच्या मदतीने इलेक्ट्रिक ईलने तयार केलेली वीज ख्रिसमस ट्रीपर्यंत पोहोचते आणि हा ट्री दिव्यांनी उजळून निघतो. उत्तेजित झालेला किंवा अन्नाच्या शोधात असताना हा मासा विजेची निर्मिती करतो. या माशाचा हा गुण म्हणजे निसर्गाचा चमत्कारच म्हणायला हवा.

# रशियन तरुणी बनली भारतीय

बिहारमधील कटिहार येथील एक खास प्रेमकहाणी सध्या 'सोशल मीडिया'वर ट्रेंड होत आहे. रशियातील डॉ. अनुभव शाश्वत आणि अनास्तासिया यांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओ इंटरनेटवर सर्वत्र चर्चेत आहेत. कटिहारच्या दुर्गा मंदिरात पारंपारिक हिंदू विधींनी पार पडलेला हा विवाह संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे.

रशियातील रहिवासी अनास्तासियाने पूर्ण भक्तीने सात फेरे घेतले, कपाळावर टिकली लावली. साडी नेसली आणि हातावर मेंदीही लावली. डॉ. अनुभव शाश्वत यांची २०२० मध्ये रशियामध्ये अनास्तासियाशी भेट झाली. अनुभव तिथे वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेत होता आणि नंतर कोविडच्या काळात दोघांची मैत्री झाली. हळूहळू ही मैत्री प्रेमात बदलली आणि नंतर पाच वर्षांच्या दीर्घ नात्यानंतर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. अनास्तासियाला भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी अनुभवने तिला भारतात बोलावले. दिल्लीत राहून तिने तिथल्या परंपरा आणि भाषा शिकली आणि ती पूर्ण स्वीकारली. यामुळेच लग्नाच्या दिवशी मंदिरात सर्व विधी पार पडले तेव्हा ती अगदी भारतीय वधूसारखीच दिसत होती.



अनुभवच्या पालकांनीही हे नाते खुल्या मनाने स्वीकारले आणि आज त्यांना त्यांच्या परदेशी सुनेचा खूप अभिमान वाटत आहे. या लग्नाची परिसरातही खूप चर्चा होत आहे. 'सोशल मीडिया'वर मोठ्या संख्येने लोक नवविवाहित जोडप्याचे अभिनंदन करत आहेत.

# पृथ्वीवरची सर्वात खोल जागा

कॅलिफोर्निया विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी अंटार्क्टिकाच्या डेनमान ग्लॅशियरजवळच्या जमिनीवर जगातली सर्वात खोल जागा शोधण्यात आली आहे. ही जागा समुद्रसपाटीपासून ३.५ किलोमीटर म्हणजेच ११,५०० फूट खोल आहे. अंटार्क्टिका खंडावर अनेक गुपितं दडली आहेत. ही गुपितं शास्त्रज्ञांनाही गोंधळात टाकतात, आश्चर्यचकित करतात. या प्रकल्पावर गेल्या सहा वर्षांपासून काम सुरू आहे. डेनमान ग्लॅशियर २० किलोमीटर रुंद आहे. या शोधातून जागतिक तापमानवाढीचे परिणाम समोर येत आहेत. बर्फ समुद्रसपाटीपासून ३५०० मीटर पेक्षाही खाली जाऊ लागला आहे. त्यामुळे येत्या काळात दक्षिण ध्रुवावर वेगळं चित्र पहायला मिळू शकतं. शास्त्रज्ञांनी शोधलेलं स्थान या पृथ्वीवरची सर्वात खोल जागा आहे. मात्र या जगातली सर्वात खोल जागा पॅसिफिक महासागराच्या पश्चिम भागात आहे. या भागाला 'मारियाना ट्रेंच' असं म्हटली जाते.



# कुत्रा होता म्हणून...

हिमाचल प्रदेशात पावसाचा जोर कायम असून भूस्खलन, पूर आणि ढगफुटी अशा घटना घडत आहेत. सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले असताना अनेक ठिकाणी लोकांना डोक्यावरील छप्पर गमवावे लागले आहे. मात्र मंडी जिल्ह्यातील एका गावात कुत्र्याने भुंकून धोक्याची घंटा वाजवली आणि वीस कुटुंबातील ६७ जणांचा जीव वाचवला.



मंडीच्या धरमपूर भागातील सियाठी गाव ढिगाऱ्यात अडकले. सियाठी येथील रहिवासी नरेंद्र यांनी सांगितले, कुत्रा घराच्या दुसऱ्या मजल्यावर झोपला होता. सतत पाऊस पडत असल्याने रात्री अचानक तो जोरजोरात भुंकू लागला. त्याच्या भुंकण्याच्या आवाजाने मला जाग आली. मला भिंतीमध्ये मोठी भेग पडल्याचे दिसले. त्यातून पाणी येत होते. मी कुत्र्यासह खालच्या मजल्यावर धावत गेलो आणि सर्वांना उठवले.

नरेंद्र यांनी नंतर गावातील इतर ग्रामस्थांनाही जागे केले आणि सुरक्षित ठिकाणी धाव घेण्याचे आवाहन केले. पाऊस इतका जोरात होता की लोक सर्व काही मागे सोडून धावत सुटले. यानंतर काही वेळातच भूस्खलन झाले आणि त्यात डझनभरापेक्षा जास्त घरे गाडली गेली. गावातील फक्त चार ते पाच घरे आता दिसत आहेत. इतर सर्व घरे आता भूस्खलनाच्या ढिगाऱ्याखाली आहेत. बचावलेल्या लोकांनी गेल्या दहा दिवसांपासून त्र्यंबळा गावात बांधलेल्या नैना देवी मंदिरात आश्रय घेतला आहे. दरम्यान या दुर्घटनेमुळे अनेक गावकरी रक्तदाब आणि नैराश्याने ग्रस्त आहेत. या दुर्घटनेनंतर इतर गावातील लोकांनी मदतीचा हात पुढे केला असून सरकारही मदत करत आहे.

# सौदी अरेबियातलं सुनसान शहर

अरबस्थानातला बराचसा भूभाग वाळवंटी आहे. या भागात इस्लाम धर्माचा प्रभाव आहे. या देशांमधले बहुसंख्य लोक इस्लामचे अनुयायी आहेत. मात्र इस्लामचा इतिहास फार जुना नाही. इस्लामच्या प्रभावाआधी या भागात इतर धर्म तसंच संस्कृती गुण्यागोविंदाने नांदत असत. यापैकीच एक संस्कृती म्हणजे नेबेतियन संस्कृती. सौदी अरेबियापासून पॅलेस्टाईनमधल्या गाझापट्टीपर्यंत नेबेतियन संस्कृतीचा प्रभाव होता. नेबेतियन लोक वाळूतून पाणी काढणं आणि त्याच्या संरक्षणाचं काम करत असत. भारत आणि पूर्व आशियातून युरोपमध्ये मसाल्यांची ने-आण होत असे. नेबेतियन लोक मसाला व्यापाऱ्यांकडून कर वसूल करत असत. अरबी देशांमध्ये आजही नेबेतियन संस्कृतीच्या खुणा आढळतात. त्या काळातली शहरं, वाडे तसंच इतर इमारतींचे अवशेष या भागात आजही पहायला मिळतात. जॉर्डन पेत्रा शहर खूपच प्रसिद्ध आहे. सौदी अरेबियातल्या मदैन सालेह या शहरात नेबेतियन संस्कृतीच्या खुणा आहेत. हे नेबेतियन संस्कृतीच्या काळातलं दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर होतं. युनेस्कोने या स्थानाला जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. हे शहर बिगरइस्लामी लोकांनी वसवलं होतं. आज या भागात कोणीही फिरकत नाही. मदैन सालेहच्या देदीप्यमान इतिहासाची ग्वाही देणाऱ्या इतिहासाच्या खुणा आजही इथे पहायला मिळतात. एके काळी गजबजलेलं हे शहर आज अगदीच सुनसान भासू लागलं आहे.



### आरोग्यसेवेच्या क्षेत्रात डायग्नोस्टिक सेंटर ठरेल मैलाचा दगड : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

आरोग्याच्या क्षेत्रात सेवेसोबतच संवेदनेलाही तेवढेच महत्त्व आहे. नितीनजींकडे सेवा आणि संवेदना या दोन्ही गोष्टी आहेत. त्यामुळेच आईच्या नावाने डायग्नोस्टिक सेंटर सुरू करून गरिबांची सेवा करण्याचा विचार त्यांनी केला आणि तो प्रत्यक्षातही उतरवला. हे केंद्र आरोग्य सेवेच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



लष्करीबाग येथील कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी होते. तर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्ष कांचन गडकरी यांची विशेष उपस्थिती होती. बेंगलुरू येथील महाबोधी सोसायटीचे जनरल सेक्रेटरी पुज्य भंते श्री. आनंद थेरा, नागपूर येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष राघवेंद्र स्वामी, महाराष्ट्राच्या माजी मंत्री अ‍ॅड. सुलेखा कुंभारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महानगर संघचालक राजेश लोया, विशाखापट्टणम येथील एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा, भाजपचे नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार संदीप जोशी, आमदार प्रवीण दटके, आमदार आशीष देशमुख, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार टेकचंद सावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, स्व. भानुताई गडकरी यांच्याकडून नितीनजींना समाजकार्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच ते देशात मोठ्या प्रमाणात काम करू शकत आहेत.

समाजातील शेवटच्या व्यक्तीचे कल्याण हा नितीनजींच्या कायार्चा केंद्रबिंदू राहिला आहे. उपेक्षितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते सातत्याने काम करीत आहेत. उद्योग, कृषी, आरोग्य क्षेत्रात त्यांचे विशेष कार्य आहे. याच मालिकेत डायग्नोस्टिक सेंटरचा समावेश होतो.

#### आईच्या संस्कारांमुळेच डायग्नोस्टिक सेंटरची प्रेरणा : गडकरी

नितीन गडकरी म्हणाले, आईचा आशीर्वाद कायम माझ्यासोबत आहे. आजपर्यंत मी जे काही करू शकलो ते आईचे आशीर्वाद आणि तिच्या संस्कारांमुळेच शक्य झाले. प्रतिकुल परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गरिबांची सेवा करण्याचे संस्कार आईने मला दिले. त्यामुळे मी पहिल्यांदा आमदार झाल्यापासून आजपर्यंत हजारो हार्ट ऑपरेशन्स करू शकलो. समाजातील वंचितांची, शेवटच्याच्या माणसाची सेवा करण्याचे, त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा अंत्योदयाचा विचार पं. दिनदयाल उपाध्याय यांनी दिला. त्या मार्गावर सातत्याने कार्य करीत आहे. राष्ट्रकारण, समाजकारण आणि सेवाकारण, हाच राजकारणाचा खरा अर्थ आहे. त्यामुळे आपल्या कार्यातून गरिबांचे जीवन कसे बदलू शकतो, याचा विचार मी करत असतो. त्याच प्रेरणेतून अनेकांच्या सहकार्याने स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरची स्थापना होऊ शकली आहे. ज्या आईने जन्म दिला तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकलो याचे समाधान आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

आरोग्यसेवेच्या क्षेत्रात हे खूप मोठे पाऊल आहे. एकीकडे वैद्यकीय क्षेत्रात विकसित तंत्रज्ञानाचा वापर वाढला असताना सेवांचे शुल्क देखील जास्त आहे. अशात एमआरआय आणि सिटी स्कॅनच्या मशीन्स भारतीय बनावटीच्या असतील तर सेवांचे शुल्क देखील कमी राहील, असेही ते म्हणाले. त्याचवेळी भविष्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हॉस्पिटल्सची संख्या वाढवावी लागणार असल्याचाही त्यांनी उल्लेख केला. प्राथमिक आरोग्य सुविधांच्या दृष्टीने प्रत्येक तीन किलोमीटरमध्ये आरोग्यसेवांचे नेटवर्क निर्माण करण्याचे नियोजन झाले आहे. पुढील चार वर्षांत देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात असेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. तसेच सिकलसेल, थॅलेसिमियावरील महागड्या उपचारासाठी एक नवीन योजना तयार करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. कांचन गडकरी यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. रिचा सुगंध यांनी आभार मानले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून

# विदर्भात महा स्माईल मोहीम

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २७ :

बालकांच्या चेहऱ्यावरील दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट) व फाटलेले टाळू (पॅलेट) या जन्मजात विकारावर उपचार आणि जनजागृती करून या बालकांच्या निरागस चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महा स्माईल विशेष मोहीम राबवली जाणार आहे.



विदर्भातील अशा बालकांवर उपचार आणि जनजागृतीची गरज ओळखत स्माईल ट्रेन इंडिया ही स्वयंसेवी संस्था आणि बजाज फिनसर्वच्या शेफाली बजाज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. सामाजिक उत्तरदायित्वातून ही मोहीम पूर्णपणे मोफत राबवली जाईल. अकोल्यासह विदर्भातील चार जिल्ह्यांमध्ये बालकांवर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. महा स्माईल्स क्लेफ्ट जनजागृती आणि उपचार मोहीम हजारो बालकांना नवजीवन देणारी एक आशावादी चळवळ ठरणार आहे.

आगळ्यावेगळ्या मोहिमेला नागपूर येथे ३१ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत स्वामी विवेकांनद मेडिकल मिशन रुग्णालय येथील प्रारंभ होणार आहे. या उपक्रमांतर्गत पुढील ९० दिवसांत तीन विशेष मोबाईल व्हॅन विदर्भातील संपूर्ण ११ जिल्ह्यात क्लेफ्ट विकाराविषयी माहिती देणार आहेत. यामध्ये लवकर निदान, उपचाराची शिफारस आणि गरजू बालकांसाठी मोफत शस्त्रक्रियांची नोंदणी असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. या बालकांवर अकोला, नागपूर, गोंदिया, वर्धा येथील रूग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

क्लेफ्ट विकार हा जन्मजात असून यात ओठ आणि टाळू हे दुभंगलेले असतात. जवळपास ७०० मुलांपैकी एका मुलांमध्ये हा विकार दिसून येतो. यावर शस्त्रक्रिया करूनच हा विकास दूर करता येतो. वेळीच उपचार केले नाहीत, तर कान बधिर होणे, बोलण्यात अडथळा येणे अशा वेगवेगळ्या व्यंगासोबत सामाजिक एकटेपणा येऊ शकतो. या विकारावर उपचार असून सहा ते सात शस्त्रक्रियेनंतर यावर पूर्णपणे मात करता येते. या सर्व शस्त्रक्रिया खर्चिक असल्याने आर्थिक दुर्बल कुटुंबातील व्यक्तींना ते परवडणारे नाही.

# न तपासता रुग्णास केले मृत घोषित

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २७ :

विषबाधा झालेल्या रूग्णास न तपासताच मृत घोषित केल्यानंतर शवविच्छेदनाची तयारी सुरू असताना रुग्णाने हालचाल केली. त्यानंतर त्या रुग्णास यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. आता या रुग्णाची प्रकृती सुधारत आहे. ही खळबळजनक घटना दारव्हा येथील उपजिल्हा रुग्णालयात घडली. मद्यप्राशन करून कर्तव्य बजावणाऱ्या डॉक्टरच्या कारनाम्यामुळे हा प्रकार घडल्याचे समोर आले. दारव्हा तालुक्यातील गोरेगाव येथील विषबाधा झालेल्या एका रुग्णाला दारव्हा उपजिल्हा रुणालयात उपचाराकरीता आणण्यात आले.

त्यावेळी सेवेत असलेल्या डॉक्टरने कोणतीही प्राथमिक तपासणी न करता रुग्णाचा मृत्यू झाल्याचे सांगितले व डेथ मेमो तयार करून शवविच्छेदन करण्याची तयारी सुरू केली. रूग्णाच्या नातेवाईकांना हा प्रकार जरा संशयास्पद वाटत होता. मात्र, डॉक्टरने रुग्णाला शवविच्छेदन गृहाकडे नेण्याच्या हालचाली सुरू केल्या. त्याच दरम्यान रुग्णाने हलचाल केली.

डॉक्टरच्या वागण्यामुळे तो नशेत असल्याचा संशय नातेवाइकांना आला. त्यांनी डॉक्टरला रूग्णाची पुन्हा तपासणी करण्यास सांगितले, तेव्हा रूग्ण जिवंत असल्याचे आढळले. त्यामुळे घाबरलेल्या डॉक्टरने डेथ मेमो फाडून तातडीने रूग्णाचे रेफर पेपर तयार केले. या प्रकाराने नातेवाईक चांगलेच संतापले होते. मात्र, रूग्णाची प्रकृती बघता त्याला तातडीने यवतमाळ येथे उपचाराकरीता आणण्यात आले. या रुग्णाला यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले असून येथे रूग्णाची प्रकृती सुधारत असल्याचे त्याच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले.

## पावसाचा जोर ओसरणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

मागील तीन - चार दिवसांपासून राज्यात सर्वत्र मुसळधार पाऊस कोसळत आहे. काही भागात गेल्या २४ तासांत जोरदार पाऊस पडला. त्यामुळे धरणांतील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र राज्यात सोमवारपासून पावसाचा जोर ओसरणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले. गेल्या तीन दिवसांपासून मुंबईत, तसेच इतर भागात पावसाचा जोर कायम आहे. कोकण, तसेच विदर्भात पावसाचा जोर अधिक होता. या भागात मागील दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडला. दरम्यान, उत्तर बंगालच्या उपसागरातील कमी दाब क्षेत्राची तीव्रता कमी होणार आहे.

त्यामुळे राज्यात सोमवारपासून पावसाचा जोर कमी होणार आहे. काही भागात अधूनमधून हलक्या सरी बरसतील. मात्र, मुसळधार पावसाची शक्यता कमी असेल, असे हवामान विभागाने सांगितले.

# संपूर्ण कुटुंबाला ठार करण्यासाठी घराभोवती सोडला वीज प्रवाह

## महिलेचा मृत्यू पती बचावला

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २७ :

गाव गाड्याच्या राजकारणात संपूर्ण कुटुंबालाच विजेच्या धक्क्याने ठार करण्याचा कट रचण्यात आला. या घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला असून, तिचा पती थोडक्यात बचावला. सविता मनेश पवार (३७) असे मृत महिलेचे नाव आहे.

ही घटना आर्णी तालुक्यातील अंजी नाईक या गावात घडली. गावागावात ग्राम पंचायत निवडणुकीचे वाद सुरू असतात. अंजी नाईक या गावात पवार कुटुंबियांचे काही वर्षापासून गावातील राठोड, चव्हाण कुटुंबियांशी राजकीय वाद सुरू आहेत. सविता मनेश पवार तिचा पती मनेश पवार (४४), मुलगा चंदन (१३) आणि मुलगी परीदी ही शुक्रवारी रात्री जेवण करून झोपी गेले. बाथरूम घराबाहेर असल्याने पहाटे २:३० वाजता सविता उठली. घराबाहेर पडल्यानंतर अचानक जागेवर कोसळली. आवाज आल्याने पती मनेश बाहेर आला. त्यालाही जोरदार विजेचा धक्का बसला. शेजाऱ्यांनी दोघांनाही आर्णी रुग्णालयात हलविले. तेथे डॉक्टरांनी सविताच्या उजव्या हाताला वीज तारेचा स्पर्श होऊन मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेने गावात एकच खळबळ उडाली. आपल्या कुटुंबाला ठार करण्यासाठी घराभोवती वीज तारांमधून वीज प्रवाह सोडण्यात आल्याचा आरोप पवार कुटुंबीयांनी केला. या प्रकरणी मनेश देवराव पवार याच्या तक्रारीवरून घाटंजी पोलिसांनी इंदल मोतीराम राठोड (४७), सूदाम जयराम चव्हाण (६५), गणेश केशव राठोड (५९), विनोद राकृष्ण चव्हाण (४८), राजू कवडू जाधव (३५), चेतन निवृत्ती चव्हाण (२८) सर्व रा. अंजी नाईक, ता. आर्णी या सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार खुनाचा गुन्हा दाखल केला.

## वाहनाच्या धडकेत बिबटया ठार

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २७ :

गोंडपिंपरी - चंद्रपूर मार्गावरील आकसापूर गावाजवळ एका वाहनाचा धडकेत बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना रविवार २७ जुलै रोजी सकाळी घडली. जंगलाच्या मार्गात भरधाव वेगात वाहने धावत असल्याने ही घटना घडली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सकाळच्या सुमारास गोंडपिंपरी - चंद्रपूर मार्गावर वाहनाने बिबट्याला धडक दिली. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे पथक घटनास्थळी पोहचले. यावेळी बिबट्या मृतावस्थेत पडलेला होता वन अधिकारी व कर्मचारी बिबट्याला धडक देणाऱ्या वाहनाचा शोध घेत आहे.

### प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी

# महावितरणचा बिझनेस टायटन्स पुरस्काराने सन्मान

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

घरगुती वीजग्राहकांना सुमारे २५ वर्ष मोफत वीज उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा रेडिओ सिटी बिझनेस टायटन्स अवॉर्डने शनिवारी (दि. २६) फुकेत (थायलंड) येथे गौरव करण्यात आला. या सन्मानाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



विकसित भारतचे उद्दिष्ट व भविष्यातील भक्कम अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या सुमारे १५० खासगी कंपन्या व सार्वजनिक उपक्रमाच्या कंपन्यांचे संचालक व प्रतिनिधींसाठी फुकेत येथे परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी यांच्याहस्ते महावितरणला पुरस्कार प्रदान करण्यात आला. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार व विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी हा पुरस्कार स्विकारला.

देशातील १ कोटी घरगुती ग्राहकांना मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी भारताचे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना जाहीर केली आहे. सुमारे ७५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणूकीतून स्वतःची वीज निर्मिती करण्यासाठी निवासी कुटुंबांना सक्षम करण्यात येत आहे. मुख्यमंत्री व ऊजामंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात तसेच अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

आतापर्यंत महाराष्ट्रात २ लाख ४२ हजार ७१४ घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याची क्षमता ९१९ मेगावॅट आहे. तर या योजनेत सहभागी ग्राहकांना आतापर्यंत तब्बल १६८५ कोटी ४२ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या या उल्लेखनीय राष्ट्रीय कामगिरीची दखल घेत महावितरणचा गौरव करण्यात आला.

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत घरगुती ग्राहकांना छतावरील १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिटपर्यंत वीज मोफत मिळविण्याची संधी आहे. एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट व त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे. विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे. गृहनिर्माण संस्था, घरसंकुलांसाठी विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन व कॉमन उपयोगासाठी ५०० किलोवॅटपर्यंत प्रति किलोवॅट १८ हजार रुपये असे कमाल ९० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे.

## लोकार्थ

## इंटिग्रेटेड इंडस्ट्रीजची २०२५ साठी उत्कृष्ट कमाई

Integrated Industries Limited

इंटिग्रेटेड इंडस्ट्रीज लिमिटेड (BSE: 531889) ही सेंद्रिय आणि अजैविक अन्न उत्पादने, बेकरी उत्पादने आणि इतर प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या व्यवसायात गुंतलेली एक कंपनी आहे. यापूर्वी, कंपनीने आर्थिक वर्ष २०२५ च्या चौथ्या तिमाही आणि आर्थिक वर्ष २०२५ च्या चांगल्या निकालांची नोंद केली होती आणि कंपनीच्या व्यवसाय कामगिरीची माहिती दिली होती.

आर्थिक वर्ष २०२५ (तोटे) साठी, कंपनीने एकूण उत्पन्न INR ७६९.३५ नोंदवले, जे वार्षिक १३२.२५% वाढले. EBITDA INR ७२.२८ कोटी झाला, जो वार्षिक १४५.५२% वाढला. आर्थिक वर्ष २०२५ साठी निव्वळ नफा INR ६७.८२ कोटी झाला, जो वार्षिक १७१.९३% वाढला.

कंपनीचे एकूण उत्पन्न आर्थिक वर्ष २०२५ च्या चौथ्या तिमाहीत २४२.६४ कोटी रुपये होते, जे आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत १९९.३७ कोटी रुपयांपेक्षा २१.७०% जास्त आहे. ही वाढ उत्पादनांना असलेली मजबूत मागणी आणि ग्राहकांच्या पसंतीच्या उत्पादनांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे झाली आहे. सातत्याने वाढणारा हा विस्तार गतिमान बाजारपेठेतील वातावरणात शाश्वत वाढ करण्याची कंपनीची क्षमता पुन्हा एकदा सिद्ध करतो. तिमाहीसाठी EBITDA २४.६७ कोटी रुपये होता, जो मागील तिमाहीतील १७.८१ कोटी रुपयांपेक्षा ३८.५२% जास्त आहे.

हा मार्जिन विस्तार चांगला ऑपरेटिंग लीव्हरेज, खर्च ऑप्टिमायझेशन उपाय आणि सुधारित उत्पादन मिश्रणाचा थेट परिणाम आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२५ च्या चौथ्या तिमाहीत २२.६१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला, जो आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीतील १७.७४ कोटी रुपयांपेक्षा २७.४५% जास्त आहे. कंपनीने उत्तर प्रदेशातील सिकंदराबाद येथे दुसरे उत्पादन युनिट स्थापन करून बिस्किट उत्पादन क्षमता वाढवण्याचा धोरणात्मक निर्णय जाहीर केला आहे. ■ ■ ■



## रेपोनो लिमिटेडचा आयपीओ आजपासून होणार खुला

संपूर्ण ३६०-डिग्री वेअरहाऊसिंग आणि लिक्विड टर्मिनल सोल्यूशन्स प्रदान करणाऱ्या रेपोनो लिमिटेड (कंपनी, रेपोनो)चा आयपिओ (इनिशियल पब्लिक ऑफरिंग) सोमवार, २८ जुलै २०२५ पासून खुला होत आहे. कंपनी २६.६८ कोटी (उच्च किंमत पट्टीवर) उभारण्याचा उद्देश ठेवत असून शेअर्स बीएसइ एसएमइ प्लॅटफॉर्मवर लिस्ट केले जातील.या आयपीओ अंतर्गत एकूण २७,७९,२०० इक्विटी शेअर्स १० दर्शनी मूल्यासह किंमत पट्टी ९१ ते ९६ दरम्यान ठेवण्यात आली आहे.या आयपीओमधून उभारण्यात येणाऱ्या निधीचा उपयोग फोर्कलिफ्ट्स, हँड पॅलेट ट्रॉलीज, रीच स्टॅकर्स यांची खरेदी,वेअरहाऊस रॅकिंग सिस्टिम्सची उभारणी,वेअरहाऊस मॅनेजमेंट सॉफ्टवेअरचा विकास कार्यकारी भांडवली गरजा आणि इतर सामान्य कॉर्पोरेट हेतू केला जाणार आहे:अँकर पोर्शन २५ जुलै रोजी खुला होईल आणि आयपीओ ३० जुलै रोजी बंद होईल. ■ ■

## सॅटिन क्रेडिटकेअरचा मिझोरममध्ये प्रवेश

भारतातील आघाडीच्या मायक्रोफायनान्स संस्थांपैकी एक असलेल्या सॅटिन क्रेडिटकेअर नेटवर्क लिमिटेडने ऐझॉलमध्ये आपली पहिली शाखा उघडून मिझोरममध्ये आपली उपस्थिती दर्शविली आहे, ज्यामुळे त्यांची एकूण संख्या २६ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांपर्यंत पोहोचली आहे. यामुळे एससीएनएल राज्यात प्रवेश करणारी पहिली आघाडीची एमएफआय म्हणून स्थापित झाली आहे, ज्याचे उद्दिष्ट आर्थिक समावेशनाला चालना देणे आणि देशभरात आर्थिक विकासाला चालना देणे आहे.

या प्रवेशामुळे ईशान्येकडील एससीएनएलचे नेतृत्व देखील मजबूत होते, जिथे ते आता सात राज्यांमध्ये कार्यरत आहे, आणि या प्रदेशातील सर्वात मोठी आघाडीची मायक्रोफायनान्स संस्था म्हणून त्याचे स्थान मजबूत करते. एससीएनएल रु. पेक्षा जास्त रकमेचा एक मजबूत पोर्टफोलिओ व्यवस्थापित करते. ३० जून २०२५ पर्यंत, १,५०० कोटी रुपये आणि केवळ ईशान्येकडे १६५ सक्रिय शाखा चालवतात.भारतभरात १,६०० हून अधिक शाखांच्या नेटवर्कसह, एससीएनएलचे ध्येय ग्रामीण आणि अर्ध-शहरी भागात कर्ज उपलब्धता सुधारण्याचे आहे. आज, त्यांच्या ७६% कामकाज ग्रामीण भारतात केंद्रित आहेत, ज्याचा परिणाम १,००,००० हून अधिक गावांवर होत आहे. मिझोरममधील विस्तार ही नवीन भौगोलिक क्षेत्रांमध्ये समावेश आणि स्थानिक उद्योगांना चालना देण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाची एक नैसर्गिक प्रगती आहे. ■

## लोटस डेव्हलपर्स अँड रिॲल्टीचा आयपीओ ३० जुलै रोजी उघडणार



श्री लोटस डेव्हलपर्स अँड रिॲल्टी लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी १ रु. दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी १४० रु. ते १५० रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे. कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) बुधवार, ३० जुलै रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, १ ऑगस्ट रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १०० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १०० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

कर्मचारी आरक्षण भागात बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअर्स १४ रु. प्रति इक्विटी शेअरची सवलत दिली जात आहे.

हा आयपीओ पूर्णपणे ७९२ कोटी रुपयांपर्यंतच्या शेअर्सचा एक नवीन इश्यू आहे, ज्यामध्ये विक्रीसाठी कोणताही प्रस्ताव नाही. लोटस डेव्हलपर्स अँड रिअल्टी ही मुंबई, महाराष्ट्रातील निवासी आणि व्यावसायिक परिसरांची विकासक आहे, ज्याचे लक्ष पश्चिम उपनगरातील अल्ट्रा लक्झरी सेगमेंट आणि लक्झरी सेगमेंटमध्ये पुनर्विकास प्रकल्पांवर लोटस डेव्हलपर्स ब्रँड अंतर्गत आहे.कंपनीचे प्रकल्प खालील तीन (३) श्रेणींमध्ये विभागले जाऊ शकतात, ग्रीनफील्ड प्रोजेक्ट्स, पुनर्विकास प्रकल्प, संयुक्त विकास प्रकल्प. कंपनीने ३० जून पर्यंत निवासी आणि व्यावसायिक अशा दोन्ही मालमत्तांचा समावेश असलेले ०.९३ दशलक्ष चौरस फूट विकासयोग्य क्षेत्र पूर्ण केले आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


